सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १६ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १८७ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



जगात फक्त दोन प्रकारचे लोक आहेत- आज आपल्या कामाला उत्तेजन व सहकार्य देणारे आणि दुसरे म्हणजे भविष्यात आपल्या कामाला उत्तेजन व सहकार्य देणारे.

**एकनाथ रानडे**

रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## महत्त्वाचे

### बांके बिहारी मंदिर कॉरिडोरला मंजुरी

**नवी दिल्ली** : बांके बिहारी कॉरिडोरला सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली आहे. ५०० कोटी रुपयांच्या योजनेसाठी जमीन खरेदी केली जाणार असून मंदिराचा निधी वापरण्याची परवानगी उत्तर प्रदेश सरकारला दिली आहे. मंदिराच्या आजूबाजूची पाच एकर जमीन अधिग्रहन करण्याची परवानगीही न्यायालयाने दिली आहे. ही जमीन भूमी देवता या नावाने नोंदणी केली जाणार आहे. इलाहाबाद उच्च न्यायालयाने मंदिराच्या आजूबाजूची जमीन खरेदी करण्यास परवानगी दिली नव्हती.

### मिस वर्ल्ड्स स्पर्धक देणार नरसिंह मंदिराला भेट

**हैदराबाद** : मिस वर्ल्ड २०२५ च्या स्पर्धक गुरुवारी येथून जवळच असलेल्या यादगिरिगुट्टा येथील प्रसिद्ध भगवान नरसिंह मंदिराला भेट देतील. हैदराबादपासून सुमारे ६० किमी अंतरावर असलेल्या या मंदिराचे मागील बीआरएस राजवटीत भव्य प्रमाणात नूतनीकरण करण्यात आले. स्पर्धक हातमागासाठी प्रसिद्ध असलेल्या पोचमपल्ली गावालाही भेट देतील आणि हातमागाच्या कपड्यांच्या निर्मितीचे साक्षीदार होतील. हे गाव यादगिरिगुट्टाच्या जवळ आहे. त्यांच्या व्यापक दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, तेलंगणा सरकारने जागतिक कार्यक्रमाचा फायदा घेऊन राज्याला पर्यटन स्थळ म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी, राज्याचे आंतरराष्ट्रीय स्थान वाढविण्यासाठी आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी एक कृती योजना तयार केली आहे.

### सौदी अरबने केली भिकाऱ्यांची हकालपट्टी

**मुंबई**: खाडी देशांमध्ये भीक मागण्यासाठी दरवर्षी हजारो पाकिस्तानी जात असतात. यामुळे अनेक देश त्रस्त झाले आहेत. सौदी अरेबियाने या भिकाऱ्यांविरोधात कडक पाऊल उचलले असून जवळपास ५ हजार जणांची हकालपट्टी केली आहे. पाकिस्तानच्या संसदेत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. पाकिस्तान सरकारचे गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी संसदेत डेटा सादर केला. त्यामध्ये भीक मागण्याच्या आरोपाखाली परदेशातून किती पाकिस्तानींना परत पाकिस्तानात पाठवण्यात आले हे समोर आलं. जानेवारी २०२४ पासून सौदी अरब, इराक, मलेशिया, ओमान, कतार आणि संयुक्त अरब अमिराती मधून एकूण ५,४०२ पाकिस्तानी नागरिकांना हद्दपार करण्यात आले आहे.

# राष्ट्रपतींच्या अधिकाराची मर्यादा न्यायालय ठरवू शकते का?

## ● द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला विचारले १४ प्रश्न ● घटनापीठ देणार उत्तर

◆ **नवी दिल्ली, १५ मे**



संसदेत अथवा विधीमंडळात पारित झालेल्या विधेयकाच्या मंजुरीवर राष्ट्रपती, राज्यपालांनी तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल महिन्यात एका प्रकरणावर सुनावणी करताना स्पष्ट केले होते. न्यायासनाच्या निर्णयाच्या आधारावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायालयाला पत्र पाठवित राष्ट्रपतींच्या अधिकाराची मर्यादा न्यायालय निश्चित करू शकते का, असा प्रश्न विचारला आहे. यासह एकूण १४ प्रश्न राष्ट्रपतींनी विचारले आहेत.

राष्ट्रपती मुर्मू यांनी पत्रातून राष्ट्रपती आणि राज्यपालांसाठी अंतिम मुदत निश्चित करण्यावर प्रश्न उपस्थित केले. पत्रातून मुर्मू यांनी विचारले की, संविधानात अशी कोणती तरतूद आहे, ज्याआधारे सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांना मंजुरी देण्यासाठी वेळ मर्यादा ठरवू शकते. तसेच राष्ट्रपती आणि राज्यपालांचे अधिकार, न्यायालयीन हस्तक्षेप आणि कालमर्यादा निश्चित करणे यासारख्या मुद्यांवर स्पष्टीकरण मागितले आहे. सरन्यायाधीश भूषण गवई आता किमान पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाची स्थापना करून या प्रश्नांवर मत देणार आहेत. दरम्यान तामिळनाडूचे राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील वादातून हे प्रकरण उद्भवले आहे. राज्य सरकारची विधेयके राज्यपालांकडून रोखली जात असल्याचा आरोप तामिळनाडू सरकारने केला होता. यावर सर्वोच्च न्यायालयाने ८ एप्रिल रोजी राज्यपालांना विधेयके रोखण्याचा अधिकार नाही, राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकावर राष्ट्रपतींना ३ महिन्यांच्या आत निर्णय घेण्याचे आदेश दिले होते.

**या निर्णयाने वाद झाला सुरू**

८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल आणि राज्य सरकारच्या अधिकारांच्या मर्यादा निश्चित केल्या. न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या न्यायासनाने म्हटले होते की, राज्यपालांना व्हेटो पॉवर नाही. याच निर्णयादरम्यान, न्यायालयाने राज्यपालांनी राष्ट्रपतींना पाठवलेल्या विधेयकावरील भूमिकादेखील स्पष्ट केली होती. (वृत्तसंस्था)

### सर्वोच्च न्यायालयाकडे पाठविलेले १४ प्रश्न

१. राज्यपालांसमोर विधेयक येते तेव्हा त्यांच्याकडे कोणते संवैधानिक पर्याय असतात?

२. राष्ट्रपतींच्या निर्णयांवरही न्यायालय कालमर्यादा ठरवू शकते का?

३. निर्णय घेताना राज्यपाल मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने बांधील असतात का?

४. राज्यपालांच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येते का?

५. कलम २०० अंतर्गत राज्यपालापुढे विधेयक सादर झाल्यानंतर त्यांच्यासमोर कोणते घटनात्मक पर्याय उपलब्ध असतात?

६. कलम २०० अंतर्गत राज्यपालांनी वापरलेल्या घटनात्मक विवेकाधिकाराची न्यायिक तपासणी शक्य आहे ?

७. कलम ३६१ न्यायिक पुनरावलोकनावर पूर्णतः बंदी घालते का, विशेषतः राज्यपालांच्या कलम २०० अंतर्गत कारवायांबाबत?

८. कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींनी वापरलेले विवेकाधिकार न्यायालयीन तपासणीस पात्र आहेत का?

९. राज्यपालाने विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवल्यास, राष्ट्रपतींनी कलम १४३ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेणे आवश्यक आहे?

१०. कलम २०० आणि २०१ अंतर्गत राष्ट्रपती व राज्यपालांचे निर्णय कायदा लागू होण्याच्या आधीच न्यायिक पुनरावलोकनासाठी पात्र आहेत?

११. कलम १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपती व राज्यपालांचे निर्णय रद्द करू शकते?

१२. कलम १४५(३) नुसार, घटनात्मक व्याख्या आवश्यक असल्यास कोणतेही खंडपीठ तो मुद्दा किमान पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवू शकते का?

१३. कलम १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालय केवळ प्रक्रिया-संबंधी बाबीसाठीच आदेश देऊ शकते का, की कायद्याच्या प्रत्यक्ष कलमांशी विसंगत आदेशही देऊ शकते?

१४. कलम १३१ व्यतिरिक्त सर्वोच्च न्यायालय केंद्र सरकार आणि राज्य सरकारांमधील वाद निकाली काढण्यासाठी इतर कोणता मार्ग वापरू शकते का?

# मराठा आरक्षण याचिकेवर तत्काळ निर्णय घ्या

## नव्याने खंडपीठ स्थापन करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचा हायकोर्टाला आदेश

◆ **नवी दिल्ली, १५ मे**

राज्य सरकारने मराठा बांधवांना एससीबीसी कायद्याअंतर्गत दिलेल्या मराठा आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात प्रलंबित असल्याने मराठा विद्यार्थ्यांचे प्रवेश लटकले आहेत. याची गंभीर दखल सुप्रीम कोर्टाने घेतली आहे. वैद्यकीय प्रवेशात १० टक्के मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर तत्काळ निर्णय घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने मुंबई हायकोर्टाला देत नव्याने खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देशही दिले आहेत.



फेब्रुवारी २०२४ मध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरवत मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने निर्णय घेतला. हे आरक्षण देताना सरकारने एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली असून घटनाबाह्य मराठा आरक्षण कायदा रद्द करण्यात यावा यासाठी मुंबई उच्च न्यायालयात गेल्या वर्षी एप्रिलमध्ये विविध याचिका करण्यात आल्या. तसेच आरक्षणाच्या समर्थनार्थही याचिका दाखल झाल्या. या याचिकांवर तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोष पुनीवाला यांच्या पूर्णपीठासमोर सुनावणी सुरू होती. मात्र तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांच्या बदलीची अधिसूचना न्यायालयाने जारी केली. त्यामुळे आरक्षणावरील सुनावणी रखडली. मुख्य न्यायमूर्ती आराधे यांच्या पूर्णपीठासमोर या याचिकांवर सुनावणी होणार आहे, मात्र अद्याप मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या अध्यक्षतेखालील नव्या पूर्णपीठाची नेमणूक न झाल्याने सुनावणी रखडली. (वृत्तसंस्था)

### १० टक्के आरक्षणाचा मुद्दा

शैक्षणिक सत्र जवळ येत असल्याने याचिकाकर्त्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या न्यायपीठासमोर ही सुनावणी झाली. वैद्यकीय प्रवेशात मराठा उमेदवारांना देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर तत्काळ नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे आणि त्यावर जलद निर्णय घेण्याचा निर्देश दिला.

# त्यांनी धर्म विचारून मारलं, आम्ही कर्म बघून बदला घेतला : राजनाथ सिंह

◆ **श्रीनगर, १५ मे**



ऑपरेशन सिंदूर हे प्रत्येक जवानाच्या डोळ्यांमध्ये दिसणारे स्वप्न होतं. दहशतवाद्यांच्या प्रत्येक ठिकाणांवर हल्ला करून शत्रूची छाती फोडत दहशतवादाचा तळ उद्ध्वस्त करूनच माघारी फिरू, असेच साऱ्यांचे स्वप्न होते. ते स्वप्न आम्ही पूर्ण केले असून त्यांनी धर्म विचारून मारले आम्ही कर्म बघून बदला घेतला. पाकिस्तानने अशा क्रूरकर्मा दहशतवाद्यांना आश्रय दिला म्हणून आम्ही त्यांना भारतीय धर्म दाखवून दिला, असा जबरदस्त हल्लाबोल भारताचे संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी आज गुरुवारी केला. श्रीनगर येथील हवाई दलाच्या तळाला भेट दिल्यानंतर ते बोलत होते.

ऑपरेशन सिंदूरनंतर संरक्षण मंत्री राजनाथसिंह आज पहिल्यांदाच जम्मू-काश्मीरमध्ये दाखल झाले. यावेळी त्यांनी श्रीनगरमधील बदामी बाग छावणीलाही भेट दिली. येथे त्यांनी पाकिस्तानने डागलेले मोर्टार आणि गोळ्यांचे तुकडे पाहिले.

राजनाथसिंह पुढे म्हणाले, ऑपरेशन सिंदूर हे केवळ एका मोहिमेचे नाव नसून तो आमचा निर्धार आहे. हा असा निर्धार आहे ज्यात केवळ आम्ही स्वसंरक्षणच करत नाही, तर गरज पडल्यावर आम्ही कठोर निर्णय घेतो आणि कठोर कारवाई देखील करतो. दहशतवाद्यांनी आमच्या माथ्यावर वार केला आम्ही त्यांची छाती फोडली. माझ्या माहितीनुसार ऑपरेशन सिंदूर ही आतापर्यंतच्या दहशतवादी विरोधी कारवाईतील सर्वांत मोठी मोहीम होती. (वृत्तसंस्था)

# सोलापुरात सलग तिसऱ्या दिवशी पावसाची हजेरी; उकाड्यापासून दिलासा

**सोलापूर** : सलग तीन दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या सोलापूरकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. गुरुवारी रात्री देखील उशीराने शहरात पावसाची हजेरी लावल्याने हवेत गारवा निर्माण झाला होता.

यंदाच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा विक्रमी म्हणजेच ४४.७ अंशावर गेला होता. मे महिन्यात तापमान सातत्याने ४० अंशाच्या वर राहिल्याने सोलापूरकर पुरते हैराण झाले होते. ए.सी., कुलर, पंखे देखील काम करीत नसल्याचे दिसून आले होते. तर दुपारच्या वेळी रस्त्यांवर सामसूम होती. सायंकाळी सातच्या नंतर मात्र घरातून बाहेर पडून लोक थंड हवेत फिरताना दिसत होते. यंदा मे महिन्यातच पाऊस सुरु झाल्याने उन्हाळा लवकरच संपल्याचा आनंद सोलापूरकर उत्साहाने लुटत आहेत.

# काश्मीर खोऱ्यात ४८ तासांमध्ये सहा दहशतवाद्यांचा खात्मा

**जम्मू, १५ मे**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी जम्मू आणि काश्मीरमधून दहशतवाद पूर्णपणे नष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षा दल संपूर्ण राज्यात दहशतवाद्यांच्या शोधात सतत शोध मोहीम राबवत आहेत आणि चकमकीत दहशतवाद्यांना ठार मारत आहेत.

गुरूवारी त्राल येथे लष्कराने तीन दहशतवाद्यांना ठार केले. मंगळवारीही तिघे ठार झाले होते. गुरुवारी जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील त्राल येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. या चकमकीत ३ दहशतवादी ठार झाले आहेत. वास्तविक, सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये ही चकमक जम्मूकाश्मीरमधील त्रालमधील नादिर गावात झाली. हा परिसर दक्षिण काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात येतो. सुरक्षा दलांना या भागात २ ते ३ दहशतवादी लपल्याची माहिती मिळाली होती. मंगळवारी जम्मू काश्मीरमधील शोपियानमध्ये सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांना ठार मारले.

### 'बेटा सरेंडर कर...' आईची आर्त हाक

जम्मू-काश्मीरमधील अवंतीपोरा येथील त्राल येथे आज म्हणजेच गुरुवारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. यावेळी सुरक्षा दलांनी जैश-ए-मोहम्मदच्या तीन दहशतवाद्यांना ठार मारले. त्रालमध्ये अजूनही गोळीबार सुरू आहे. लपलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, चकमकीत मारला गेलेला आमिर वाणीचा एक व्हिडीओ समोर आला आहे ज्यामध्ये तो त्याच्या कुटुंबाशी व्हिडीओ कॉलवर बोलत आहे. व्हिडीओमध्ये आमिर वाणीची आई त्याला सरेंडर करण्याची तसेच परत येण्याची विनंती करताना दिसत आहे. परंतु त्याने त्याच्या आईचे ऐकण्यास नकार दिला. त्याच्या आईसोबतच्या व्हिडीओ कॉलच्या स्क्रीन रेकॉर्डिंगमध्ये, तो स्थानिक भाषेत त्याला 'बेटा, शरण जा', असे म्हणत असल्याचे दिसून येते. परंतु तिचे न ऐकता सैन्यावर गोळीबार करतो. शेवटी तो सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत मारला गेला. व्हिडीओ कॉलवर बोलत असताना, आमिरची आई त्याला शरणागती पत्कर, असे म्हणते. उत्तरात तो सेनेला पुढे येऊ द्या, मग मी बघेन, असे आमिर म्हणताना दिसत आहे.




## शिवसैनिकाचे अनोखे देशप्रेम...

सोलापूर : भारत सरकारने पाकिस्तान विरुद्ध यशस्वीपणे राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात शिवसेना नेते अमोलबापू शिंदे यांनी आपल्या 'थार' या गाडीवर **'ऑपरेशन सिंदूर'** साकारत जवानांना अनोखी मानवंदना दिली आहे.


## पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत** साठी सोलापूर **शहरात कॅम्पेनिंग** करण्यासाठी दहावी, बारावी, पदवीपर्यंत शिक्षण झालेले २० युवक पाहिजेत. आकर्षक मानधन दिले जाईल. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह खालील पत्त्यावर कार्यालयात समक्ष भेटावे अथवा खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क: ९८८११९१४४३**

**पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.**





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



**शिवतेज प्रतिष्ठान जुळे सोलापूर संचलित, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त श्रींच्या प्रतिमेची पूजा नगरसेवक शिवा बाटलीवाले यांच्या हस्ते झाले. यावेळी महेश घाडगे, हाजिमलंग नदाफ, परमेश्वर कलशेट्टी, ॲड. बापूसाहेब देशमुख, बसवराज सोन्नद, मारूती गोरे, निंबरगी, भोसले आदी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मान्यवर उपस्थित होते**



### केंद्रीय माध्यमिक बोर्ड परीक्षेत ग्रीन फिंगर्स स्कूलची १००% यशाची परंपरा कायम

**अकलूज, दि. १५ मे-**

शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट संचलित, द ग्रीन फिंगर्स स्कूलचा २०२४- २५ चा केंद्रीय माध्यमिक बोर्ड परीक्षेचा निकाल १००% लागला आहे. या परीक्षेत वैभवी पापाशेठ शिंदे - ९७.२% कार्तिकी देविदास जाधव- ९४.८% आदित्य अशोक वाघमोडे - ९३.६% गुण मिळवीत अनुक्रमे प्रथम, व्दितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला. या वर्षी एकूण २८ विदयार्थी बोर्ड परीक्षेस बसले होते. ०६ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळविले, तर ११ विद्यार्थ्यांनी ८०,% पेक्षा जास्त गुण प्राप्त केले, तसेच ९ विद्यार्थ्यांनी ७०% पेक्षा गुण संपादन केले आहेत. सिमरन सुनिल घोडके हिने संगणक या विषयात १०० गुण प्राप्त केले, तसेच चार विद्यार्थ्यांनी मराठी विषयात ९९ गुण संपादन केले आहेत, अशी माहिती स्कूलचे प्राचार्य श्री उमाकांत बराल यांनी दिली. या यशस्वी विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष रणजीतसिंह मोहिते - पाटील, वरिष्ठ विश्वस्त सत्यप्रभादेवी रणजीतसिंह मोहिते - पाटील, सचिव धैर्यशील मोहिते - पाटील, विश्वस्त विश्वतेजसिंह मोहिते - पाटील, स्कूलचे चेअरमन नितीन महादेवराव इंगवले - देशमुख यांनी अभिनंदन केले आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

### शहरात आज तिरंगा यात्रा; सावरकर पुतळ्यापासून सुरुवात

**सोलापूर, दि.१५ मे-**

भारतीय शक्तीशाली सैन्य दलाला नमन करण्यासाठी सोलापूर शहरात उद्या शुक्रवारी दि.१६ मे रोजी सकाळी नऊ वाजता सैनिकोंके सन्मानमें, हर भारतीय मैदानमें शीर्षकाखाली तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही तिरंगा यात्रा अशोक चौकातील मार्कंडेय उद्यान येथील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्यापासून निघणार आहे. तिरंगा यात्रेत देशप्रेमी बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन आमदार देंवेंद्र कोठे यांनी केले आहे.



### महापालिकेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त येथील श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयामध्ये श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवि पवार,विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, ईशानी ओम्बासे, मध्यवर्ती महामंडळाचे राम जाधव , प्रकाश ननवरे , नितीन जाधव,विजय भुईटे, आभीजली जाधव कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, श्याम कन्ना, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

### बारावी परीक्षेत निखील बोने व दहावी परीक्षेत पूजा जक्का हिचे यश

**सोलापूर, दि. १५ मे-**

येथील पी. एस. इंग्लिश मीडियम जुनियर कॉलेजचा शैक्षणिक वर्ष बारावी कॉमर्स वार्षिक निकाल ८३.३३% लागला आहे. बोने



निखिल प्रभाकर याने ८२.१७% गुण मिळवून यश संपादन केले. त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, करण शहा, वरिष्ठ दीप्ती शहा, प्राचार्य विलास लेंगरे यांनी अभिनंदन केले. तसेच अरीहंत इंग्लिश मिडीयंम स्कूलच्या पुजा श्रीनिवास जक्का हिने इयत्ता दहावी मध्ये ६१.६० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.

# सुरक्षित प्रवासासाठी एसटीच्या 'स्मार्ट बस' येणार

### परिवहन मंत्री सरनाईक

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई १५ मे-**

भविष्यात एसटीच्या प्रवाशांना सुरक्षित प्रवासा बरोबरच वक्तशीर बस सेवा देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेली एसटीच्या '' स्मार्ट बसेस '' घेण्यात येणार आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी दिली. नव्या ३ हजार बसेस खरेदीच्या अनुषंगाने बोलावलेल्या बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

बैठकीला एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व संबंधित खाते प्रमुखां सह बस बांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी



उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन लालपरी सह येणाऱ्या सर्व बसेस मध्ये ए. आय तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे, जी.पी.एस. तंत्रज्ञान एल.ई.डी. टीव्ही, वाय-फाय, चालक ब्रेथ ॲनालाइज यंत्रणा, याबरोबरच चोरी-प्रतिबंध तंत्रज्ञान वर आधारित बस लॉक सिस्टम असे आधुनिक तंत्रज्ञान एकात्मिक पद्धतीने लावण्यात येणार असून या बसेस प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित आणि आरामदायी असतील.

स्वारगेट बसस्थानकावरील घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेला यापुढे अत्यंत महत्त्व दिले जाणार असून , प्रवासात बसेस मध्ये प्रवाशांसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात येणार असून, चालकाच्या गाडी चालवण्याच्या पद्धतीवर देखील या कॅमेराचा '' तिसरा डोळा '' लक्ष ठेवून असणार आहे. तसेच बसस्थानक व परिसरामध्ये '' पार्किंग '' मध्ये उभ्या असलेल्या बसेस देखील पूर्णतः बंद राहतील अशी यंत्रणा बस मध्ये बसविण्यात येणार आहे. असे सांगून ते म्हणाले, नवीन बसेस मध्ये लावण्यात येणाऱ्या एल.ई.डी. टीव्हीच्या माध्यमातून जाहिराती बरोबर विविध महत्त्वाच्या घडामोडी तसेच सन्माननीय पंतप्रधान, मुख्यमंत्री यांचे संदेश तातडीने प्रवाशांच्या पर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासात देखील प्रवासी जगभरातील घडामोडी बाबत '' अपडेट '' राहतील. तसेच बसच्या बाहेरील बाजूस देखील जाहिरात प्रसिद्धी करीता एल.ई.डी पॅनल लावण्यात येणार आहेत.

#### फोम बेस आग प्रतिबंधक यंत्रणा

तापमान वाढीमुळे एसटी बसेसला आग लागण्याच्या घटना घडत आहेत. त्याला प्रतिबंधासाठी फोम बेस आग प्रतिबंधक यंत्रणा लावण्यात येणार असून बस मध्ये ज्या ठिकाणी आग प्रज्वलित होईल, त्याचा शोध घेऊन त्या ठिकाणी संबंधित फोम वापरून आग तात्काळ विजवण्याची व्यवस्था या यंत्रणेत करण्यात आली आहे.

## कोयनाधरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन आणि जमीनवाटपाबाबत विभागीय आयुक्तांनी तातडीने कार्यवाही करावी : अजित पवार

**तभा वृत्त सेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१५ मे-**

कोयनाधरण प्रकल्पग्रस्तांनी राज्यासाठी मोठा त्याग केला आहे. त्यांना पर्यायी जमिन देणं शासनाचे कर्तव्य असून, या धरणग्रस्तांना पर्यायी जमिन देण्यासंदर्भात आलेले प्रस्ताव पुणे, सातारा, सांगली, सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ तपासून महिनाअखेपर्यंत पुणे विभागीय आयुक्तांकडे पाठवावेत. विभागीय आयुक्तांनी अर्जांची पडताळणी करावी. जूनच्या पहिल्या पंधरवड्यात धरणग्रस्तांच्या संघटनांसोबत बैठक घेऊन पात्र धरणग्रस्तांना जमीन वाटपाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी अधिकाऱ्यांना दिले.

मंत्रालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, वित्त विभागाचे प्रभारी अपर मुख्य सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, कोकणचे विभागीय



आयुक्त विजय सुर्यवंशी, धरणग्रस्तांचे नेते तथा श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, कोयना धरणग्रस्त-अभयारण्यग्रस्त संग्राम संघटनेचे संघटक चैतन्य दळवी आदींसह प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोयना धरणग्रस्तांचे संपूर्ण पुनर्वसन आणि पर्यायी जमिन वाटपाचा प्रश्न प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असून तो सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. यापूर्वीही अनेकदा बैठका घेऊन त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी दूर केल्या आहेत. आजमितीस सातारा जिल्ह्यात ३१० आणि सांगली जिल्ह्यात २१५ पात्र प्रकल्पग्रस्तांची यादी तयार असून त्यांना जमिनवाटपाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. उर्वरीत जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनीही त्यांच्याकडील प्रस्तावांची तपासणी करुन आपापल्या जिल्ह्यांचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी विभागीय आयुक्तांकडे पाठवावेत. विभागीय आयुक्त त्यांच्या स्तरावर निर्णय घेतील, जे प्रश्न शासनस्तरावर सोडवायचे असतील, ते शासनाकडे पाठवावेत. त्याबाबत तातडीने निर्णय घेतला जाईल, असा विश्वास अजित पवार यांनी बैठकीत दिला.बैठकीला पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्हीसीद्वारे बैठकीत सहभाग घेतला.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांसाठी वैधता प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ मे -**

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीयांसाठी राखीव जागांवर निवडणूक लढवायची असल्यास, त्या व्यक्तींनी जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ही वैधता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी आणखी १२ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली असून याबाबतचा अध्यादेश राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याद्वारा निर्गमित करण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढवायची असल्यास, त्या व्यक्तींनी जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. मात्र, अनेकदा उमेदवारांनी वेळेवर अर्ज करूनसुद्धा पडताळणी समितीकडे कामाचे ओझे अधिक असल्यामुळे प्रमाणपत्र मिळायला वेळ लागतो. त्यामुळे अनेक निवडून आलेल्या सदस्यांना वेळेत वैधता प्रमाणपत्र मिळत नाही आणि ते अपात्र ठरवले जातात. ही अडचण लक्षात घेऊन, महाराष्ट्र (ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अधिनियम २०२३ याद्वारे १२ महिन्यांकरता मुदतवाढ देण्यात आली होती.मात्र अद्यापही अकरा हजारांपेक्षा अधिक सदस्यांचे अर्ज समितीकडे प्रलंबित आहेत, आणि फक्त पडताळणी समितीने वेळेत प्रमाणपत्र न दिल्यामुळे त्यांना पदावरून हटवले जाण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती अन्यायकारक आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात अडथळा निर्माण करते. त्यामुळे, या सदस्यांना आणखी १२ महिने मुदत द्यावी जेणेकरून ते आपले वैधता प्रमाणपत्र सादर करू शकतील. तसेच केवळ जात पडताळणी समिती कडून वेळेत वैधता प्रमाणपत्रे देण्यात न आल्याच्या कारणावरुन अशी पदे धारण करण्यापासून वंचित केले जाणार नाही याची सुनिश्चिती करणे आवश्यक असल्याने हा अध्यादेश निर्गमित केला आहे.

## धर्मवीर प्रतिष्ठान बार्शीमार्फत संभाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात साजरा

### विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ मे-**

धर्मवीर प्रतिष्ठान बार्शी आयोजित छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव २०२५ श्री शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळ्यासमोर संपन्न झाला. याप्रसंगी संभाजी महाराजांची मूर्ती प्रतिष्ठापना व पूजन डॉ. बी. वाय. यादव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख व ज्योती डोळस हे उपस्थित होते. डॉ. यादव म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य अद्वितीय होते. स्वराज्य रक्षणासाठी त्यांनी हाती घेतलेल्या मोहिमा त्यांच्या कार्याचे द्योतक आहे. समाजात एकोपा वृद्धिंगत होण्यासाठी युवकांनी पुढे येण्याची गरज आहे. डॉ. पालके यांनी संभाजी महाराजांच्या साहित्यिक प्रतिभेचा दाखला देऊन शैक्षणिक विकासातून सामाजिक जडणघडणीचा पाया भक्कम होतो त्यासाठी कर्मवीरांचे विचारधन जोपासले पाहिजे, असे मत व्यक्त केले. किरण मस्तानी यांनी तृतीयपंथीयांच्या समस्या यावर प्रकाश टाकला व त्यासाठी समाजाचे सहकार्य अपेक्षित आहे यावर भर दिला. कोल्हाळे महाराज यांनी अनाथ मुलांच्या मदतीसाठी समाजाने मदत करावी यासाठी आवाहन केले. कुल्हाणे सर यांनी शैक्षणिक



विकासात भर घालण्याची भूमिका मांडली. पूनम कदम यांनी महिला सशक्तीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर कार्य करण्याचा संकल्प सोडला. बालशाहीर आरोही शहाणे हिने पोवाडा गाऊन संभाजी महाराजांच्या कार्याचा गौरव केला. यावेळेस समाजातील विविध क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रा. सचिन वायकुळे (सामाजिक कार्य), प्रा. डॉ. राहुल पालके (शैक्षणिक कार्य), प्रा. नवनाथ गुल्हाने (शैक्षणिक कार्य), हभप.सागर कोल्हाळे महाराज (श्री गुरुदेव दत्त ब. वारकरी संस्था), किरण मस्तानी (तृतीयपंथी), श्रीमती पूनम कदम (युवा उद्योजिका),आरोही शहाणे (बाल शाहीर), प्राणी सेवक फाउंडेशन, बार्शी, श्री तुळजाई दुर्ग प्रतिष्ठान भूम, स्वामी विवेकानंद केंद्र कन्याकुमारी, शाखा-बार्शी यांचा समावेश आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धर्मवीर प्रतिष्ठानातील कार्यकर्ते गणेश रावळ, मिताली गरड, अमृता रंगदाळ, यश कदम, आनंद दादा, पाडे सर आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता मिताली गरड यांनी छत्रपती संभाजींना मानवंदना देवून केली.

## नगरसेविका टेळेंनी स्वखर्चाने काढला विहिरीतील गाळ

### जोपासली सामाजिक बांधीलकी

### नागरिकांतून व्यक्त होत आहे समाधान

**सदाशिव नगर, दि.१५ मे-**

नगरसेविका रेश्मा टेळे यांनी महाबळेश्वर, माळशिरस येथील पाणी पुरवठा विहिरीतील गाळ काढून पाण्याची सोय करून सामाजिक बांधीलकी जोपासली असून पाण्याची सोय झाल्याने नागरिकातून समाधान व्यक्त होत आहे.

माळशिरस शहरातील काही भागात फुलेनगर येथील तलावामधून पाणीपुरवठा होतो. तलावात पाणी असल्याने शहरात एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरु आहे. व काही भागात महाबळेश्वर विहिरीतून पाणीपुरवठा केला जातो. हि पाणी पुरवठा विहीर फार जुनी असून अनेक वर्षापासून या विहिरीतील गाळ न काढल्याने बराच गाळ



साठला होता. विहिरीचे पाणी कमी झाले त्यामुळे प्रभाग ११, ५, ६ व १५ च्या काही भागात पाण्याची तीव्र टंचाई भासत होती. नगर पंचायतीने या प्रभागात टँकर सुरु केला. परंतु तो पुरेसा होत नसल्याने पाण्याची कमतरता जाणवत होती. नागरिकांची गैरसोय पाहून प्रभाग अकरा मधील नगरसेविका रेश्मा टेळे यांनी पाणीपुरवठा विहिरीतील गाळ काढण्यासाठी पुढाकार घेतला. प्रसानाकडून टेंडर होऊन गाळ काढण्यास फार विलंब होणार हे जाणून त्यांनी स्वखर्चातून विहिरीतील गाळ काढला . त्यामुळे विहिरीचे पाणी वाढले असून नागरिकांची पाण्याची गैरसोय दूर झाली असल्याने सर्व स्तरातून समाधान व्यक्त होत आहे.



या पाणी पुरवठा विहिरीतील अनेक वर्षापासून साठलेला गाळ काढणे आवश्यक होते. प्रशासकीय प्रोसेस करून गाळ काढण्यास विलंब लागणार होता. त्याची वाट न पाहता स्वखर्चातून गाळ काढला. गाळ काढल्याने नागरिकांची पाण्याची चांगली सोय करता आली यामध्ये मला समाधान आहे.

**- रेश्मा टेळे, नगरसेविका, माळशिरस नगरपंचायत**

## पंढरपुरातील लक्ष्मी टाकळी येथे ऐतिहासिक बुरुज बांधकाम कार्याचा शुभारंभ

### सर्वपक्षीय नेतेमंडळींकडून सरपंच संजय साठे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१५ मे -**

पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महेश साठे यांच्या निधीतुन ऐतिहासिक बुरुज जतन व संवर्धन कामाच्या बांधकाम कार्याचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

या कार्यक्रमासाठी आमदार समाधान आवताडे, शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, युवक नेते प्रणव परिचारक, माजी जि.प सदस्य रामदास ढोणे उपस्थित होते.शिवसेनेचे मुख्य नेते



तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यातून व शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख व जिल्हा नियोजन समिती सदस्य महेश साठे यांच्या विशेष प्रयत्नातून निधी मंजूर झालेल्या पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी येथील शेकडो वर्षाची ऐतिहासिक परंपरेचा ठेवा असलेल्या हुडा बुरुज जतन व संवर्धन बांधकाम कार्याचा शुभारंभ कार्यक्रम येथील हनुमान मंदिरासमोर बुधवारी मोठ्या दिमाखात पार पडला.

यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की लक्ष्मी टाकळी येथील ऐतिहासिक असलेल्या बुरुज बांधकाम करू त्याचे जिर्नोध्दार करण्याच्या चांगल्या निर्णयाचे मी सरपंच व ग्रामपंचायतीचे स्वागत करतो. पुढील काळात विकास कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असा विश्वास देत. ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी राबवण्यात आलेल्या उपक्रमाबद्दल महेश नाना व सरपंच संजय साठे यांचे कौतुक केले.

याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे म्हणाले की शासन स्तरावर प्रयत्न करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून टाकळी गावच्या सर्वांगीण विकासासाठी मोठा निधी खेचून आणला आहे. पुढील काळातही निधी कमी पडू दिला जाणार नाही असा विश्वास दिला.

यावेळी बोलताना युवक नेते प्रणव परिचारक म्हणाले की लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत पंढरपूर शहरा लगत असल्याने इतर ग्रामपंचायतीप्रमाणे निधी दिला जातो मात्र हा निधी कमी पडत असल्याने गावची संख्या पाहता ज्यादा निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी महेश साठे यांनी वेळोवेळी डिपीडीसीच्या बैठकीत प्रयत्न केल्याचा मी साक्षीदार आहे असे म्हणाले. सरपंच संजय साठे यांनी टाकळी गावच्या सर्वांगीण विकासासाठी मोठे योगदान दिले असल्याचे सांगितले.

यावेळी टाकळी ग्रामपंचायत सरपंच संजय साठे यांनी प्रास्ताविकामध्ये बुरुज बांधकामाची रचना कशा पद्धतीने असेल याची माहिती दिली. कार्यक्रमास लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# तुर्कीसोबतच्या करारांचा भारताकडून आढावा

## ● परराष्ट्र मंत्रालयाची माहिती ● पाकिस्तानला मदत करणाऱ्यांना धडा शिकविण्याची तयारी





◆ **नवी दिल्ली, १५ मे**

पाकिस्तानला लष्करी मदत करणाऱ्या तुर्कीला धडा शिकविण्याची तयारी भारताने केली आहे. या देशासोबत भारताचे वर्षानुवर्षे असलेले व्यापार आणि धोरणात्मक संबंध आता एका नवीन दिशेने वाटचाल करीत आहे. ऑपरेशन सिंदूर नंतर केंद्र सरकारने तुर्की कंपन्यांशी संबंधित सर्व करार आणि प्रकल्पांचा आढावा घेण्यास सुरुवात केल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

भारतातील बांधकाम, उत्पादन, विमान वाहतूक, मेट्रो रेल्वे आणि आयटी यासारख्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या तुर्की कंपन्यांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन केले जात आहे. काश्मीर मुद्यावर तुर्की सरकारने वारंवार केलेल्या टिप्पण्या आणि पाकिस्तानशी त्यांची वाढती जवळीक लक्षात घेता हे पाऊल उचलण्यात आले. पाकिस्तानसोबत झालेल्या संघर्षाविळी तुर्कीने पाकिस्तानला ड्रोन्स उपलब्ध करून दिले होते. या ड्रोन्सचा वापर भारतावर हल्ल्यासाठी करण्यात आला. यामुळे देशभरात तुर्कीविरोधात संताप आहे. यामुळेच भारताने तुर्कीसोबत झालेल्या कराराचा आढावा घेण्यास सुरुवात केली आणि यासंदर्भात लवकरच भारत आपली अधिकृत भूमिका जाहीर करणार असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

### द्विपक्षीय व्यापार १०.४ अब्ज डॉलर्सचा

इंडिया ब्रँड इक्विटी फाउंडेशनच्या फेब्रुवारी २०२५ च्या अहवालानुसार, भारत-तुर्की यांच्यातील द्विपक्षीय व्यापार २०२३-२४ या आर्थिक वर्षात १०.४ अब्ज डॉलर्स इतका होता. त्याचवेळी एप्रिल २००० ते सप्टेंबर २०२४ पर्यंत तुर्की येथून एकूण २४०.१८ दशलक्ष डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक भारतात आल, ज्यामुळे थेट परकीय गुंतवणूकीच्या प्रवाहात तुर्की ४५ व्या क्रमांकावर आहे. ही गुंतवणूक गुजरात, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि राजधानी दिल्ली यासारख्या राज्यांमध्ये विस्तारली आहे.

### मेट्रोपासून, बांधकाम क्षेत्रात गुंतवणूक


मेट्रो रेल्वे, बोगदा बांधकाम आणि विमानतळ सेवांपासून ते शिक्षण, माध्यमे आणि सांस्कृतिक सहकार्यापर्यंत अनेक क्षेत्रात तुर्कीची भारतातील कंपन्यांसोबत भागीदारी आहे. २०२० मध्ये, अटल बोगद्याचा इलेक्ट्रोमेकॅनिकलचे काम एका तुर्की कंपनीला देण्यात आले, तर २०२४ मध्ये रेल्वे विकास निगम लिमिटेडने तुर्की कंपनीसोबत करार केला. लखनौ, पुणे आणि मुंबई यासारख्या शहरांमध्ये मेट्रो प्रकल्पांमध्ये तुर्की कंपन्या भागीदार आहेत. तुर्की विमान कंपनी भारतीय विमानतळांवर सेवा देत आहे.

### तुर्की लष्कराचे पाकसोबत साटेलोटे

तुर्कीने पाकिस्तानला केवळ लष्करी ड्रोनच दिले नाहीत तर तुर्की ऑपरेटर्सनी पाकिस्तानला त्यांच्या लष्करी कारवायांमध्ये मदत केल्याचेही समोर आले. यामुळेच तुर्की कंपन्यांशी संबंधित सर्व प्रकल्पांची आता सखोल समीक्षा केली जात आहे. प्रत्येक करार आणि प्रकल्पाचा संपूर्ण डेटा गोळा केला जात आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. (वृत्तसंस्था)

# भारतात आयफोनचे उत्पादन करू नका

## डोनाल्ड ट्रम्प यांचा ॲपलच्या सीईओला सल्ला



◆ **दोहा, १५ मे**

ॲपलने आयफोनचे उत्पादन भारतात करू नये, त्याऐवजी अमेरिकेत आपले उत्पादन वाढवावे. भारत स्वतःची काळजी घेण्यासाठी समर्थ आहे, असा सल्ला अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी ॲपल कंपनीचे सीईओ टिम कुक यांनी दिला.

आयफोन आणि आयपॅड तयार करणारी कंपनी ॲपल भारतात उत्पादन करत आहे. येत्या काही काळात त्याचा विस्तारही केला जाणार आहे. परंतु आता ट्रम्प यांनी त्यावर आक्षेप घेतला. दोहा येथील कार्यक्रमात ॲपलचे सीईओ उपस्थित होते. यावेळी आपल्या संबोधनात ट्रम्प म्हणाले, माझी इच्छा आहे की, ॲपलने भारतात उत्पादन करू नये, भारताला त्यांच्या हिताची काळजी घेऊ द्या.

मी ऐकले की, तुम्ही भारतात ५०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करीत आहात. पण माझी इच्छा आहे की, तुम्ही भारतात गुंतवणूक करू नये. भारत हा जगातील सर्वाधिक शुल्क आकारणारा देश आहे. त्या ठिकाणी विक्री करणे कठीण आहे. भारताने आम्हाला आमच्या काही सामानांवर शुल्क न आकारण्याची ऑफर दिली आहे. (वृत्तसंस्था)

### मेक इन इंडिया उपक्रमासाठी आव्हान

ट्रम्प यांचे विधान त्यांच्या अमेरिका फर्स्ट धोरणाचे प्रतिबिंब आहे. ॲपलसारख्या बड्या ब्रँडने अमेरिकेत गुंतवणूक करावी जेणेकरून तिथे नोकऱ्या वाढतील, अशी त्यांची इच्छा आहे. भारतात ॲपल फॉक्सकॉन आणि टाटा यांच्या सहकार्याने आयफोन बनवत आहे. २०२५ मध्ये भारतात तयार होणाऱ्या आयफोनपैकी १५ टक्के आयफोन अमेरिकेत पाठवले जाणार आहेत. ट्रम्प यांची टिप्पणी भारताच्या मेक इन इंडिया उपक्रमासाठी आव्हान ठरू शकते.

# वन जमीन वापरासाठी देणे बेकायदेशीर

## सर्वोच्च न्यायालयाचा पुण्यातील प्रकरणावर निर्णय ● राज्ये, केंद्रशासित प्रदेशांना दिला चौकशीचा आदेश



◆ **नवी दिल्ली, १५ मे**

जंगल परिसर अथवा या परिसराच्या शेजारी असलेली जमीन कोणत्याही संस्थेला वापरासाठी किंवा बांधकामासाठी देणे बेकायदेशीर असल्याचा निर्णय गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी अशा जमिनी खाजगी व्यक्तींना गैरजंगल उपयोगासाठी दिली आहे का, याची चौकशी करावी, असा आदेशदेखील यावेळी देण्यात आला. पुणे येथील कोंढवा भागातील जंगलजमिन प्रकरणात १९९८ मधील जमीन हस्तांतरणाचा निर्णय रद्द करीत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

देशाचे नवनियुक्त सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेत दोन न्यायमूर्तींनी पुणे येथील जंगलजमीन घोटाळ्याप्रकरणी सुनावणी घेतली. यावेळी न्यायासनाने हा घोटाळा राजकारणी, नोकरशहा आणि बिल्डर यांच्यातील संगनमताचा नमुना आहे. जुलै ते ऑगस्ट १९९८ या दोन महिन्यांत जमिनीच्या वापरात मोठ्या वेगाने बदल झाला, यावरून त्यावेळचे महसूल मंत्री या प्रक्रियेत थेट सहभागी असल्याचे दिसून येते, असे निरीक्षण यावेळी न्यायासनाने नोंदविले. पुण्यातील कोंढवा बुद्रुक भागातील जंगलाशेजारी असलेली ११.८६ एकर जमीन १९९८ मध्ये रिची रिच कॉलनी या खासगी प्रकल्पासाठी दिली होती. याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर न्यायासनाने सुनावणी घेतली. (वृत्तसंस्था)

### वनविभागाकडे हस्तांतरित करा

कोणतीही राखीव वनाची आणि वनाशेजारी असलेली जमीन कोणत्याही कामासाठी दिली गेली असेल, तर ती तातडीने वनविभागाकडे हस्तांतरित करावी. या जमिनीचा वापर करण्यासाठी तिची गैरजंगल अशी नोंद केली असल्यास ती तातडीने रद्द करून तिथे वृक्षलागवड करावी आणि त्यासाठीचा खर्च निश्चित करावा. वनाशेजारी राखीव जमीन कोणत्याही व्यक्ती, संस्थेला भाडेपट्ट्याने देण्यासाठी केंद्र सरकारची पूर्वसंमती आवश्यक असल्याचे दिशानिर्देश यावेळी न्यायासनाने दिले.

### काय आहे हे संपूर्ण प्रकरण

- पुण्याच्या कोंढवा भागातील ३० एकर जागा वन विभागाची असताना ती चव्हाण नावाच्या व्यक्तीला देण्याचा निर्णय १९९८ मध्ये तत्कालीन महसूल मंत्र्यांनी घेतला
- जमिनीचा ताबा मिळताच चव्हाण यांनी ही जागा रिची रीच सहकारी संस्थेला दोन कोटींना विकली
- पुण्याचे विभागीय आयुक्त , जिल्हाधिकारी, उपवन संरक्षक यांनी ही जागा बिगर शेती असल्याचे प्रमाणपत्र दिले. ज्यामुळे बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा झाला
- पुण्यातील सजग चेतना मंचने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करीत वनजमीन बांधकामासाठी दिल्याने पर्यावरणाचे नुकसान होत असल्याचा दावा याचिकेतून केला.
- मे २००२ मध्ये तपासासाठी सेंट्रली एम्पॉवर्ड कमिटी अर्थात सीईसी स्थापन केली, समितीने दिलेल्या अहवालात महसूल मंत्र्यांसह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची शिफारस केली.

### अनधिकृत परवानग्या रद्द

न्यायासनाने स्पष्टपणे म्हटले की, रिची रिच कॉलनीला दिलेली पर्यावरणीय परवानगी बेकायदेशीर होती. हा निर्णय केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून, इतर राज्यांनाही लागू होतो. जागेबाबतचे सर्व निर्णय बेकायदेशीर ठरवून ही जागा वन विभागाला परत देण्याचा निर्णय सरन्यायाधीश गवई यांनी दिला आहे. पर्यावरण रक्षण व शासनातील पारदर्शकता या दृष्टीने हा निर्णय ऐतिहासिक मानला जात आहे.

# टीजेएसबी सहकारी बँकेने पूर्ण केला १५० शाखांचा टप्पा

**सावंतवाडी, १५ मे**

टीजेएसबी सहकारी बँकेने सावंतवाडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या यशस्वी विलीनीकरणासह १५० व्या शाखेचे भव्य उद्घाटन केले. यासह एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या धोरणात्मक विस्तारामुळे बँकेची सेवा क्षमता अधिक बळकट झाली. वाढत्या ग्राहकवर्गासाठी अधिकाधिक मूल्यवर्धित सेवा पुरवण्याची तयारी बँकेने केली आहे.




या विलीनीकरण प्रक्रियेची अंमलबजावणी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आली. सहकारी बँकिंग क्षेत्राच्या मजबुतीसाठी रिझर्व्ह बँकेने सुचवलेले धोरणात्मक उपाय म्हणून हे विलीनीकरण केले गेले. टीजेएसबी सहकारी बँकेने पाच राज्यांतील पारदर्शक व परिणामकारक बँकिंग कार्यपद्धतीच्या जोरावर हे विलीनीकरण यशस्वीपणे पूर्णत्वास नेले आहे. संपूर्ण नियामक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, सावंतवाडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सर्व नऊ शाखा मंगळवारपासून टीजेएसबी सहकारी बँकेच्या शाखा म्हणून कार्यरत झाल्या आहेत. त्यामुळे टीजेएसबी बँकेच्या शाखांची संख्या १५८ पर्यंत वाढली आहे. यामध्ये सावंतवाडी येथील मुख्य शाखेचे उद्घाटन टीजेएसबी बँकेच्या १५०व्या शाखा म्हणून करण्यात आले. हे विलीनीकरण हा केवळ विस्तार नाही, तर आम्ही कोऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्रातील आमची उपस्थिती अधिक व्यापक करत आहोत.

सिंधुदुर्ग जिल्हा व कोकण विभागातील आमचा विस्तार आता अधिक बळकट झाला आहे. या भागातील नागरिक, व्यावसायिक, उद्योजक यांना उत्तम बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. हा टप्पा आम्हाला सर्वसमावेशक आर्थिक विकासाच्या दिशेने पुढे नेणारा आहे, असे टीजेएसबी सहकारी बँक शरद गांगल, अध्यक्ष, यांनी सांगितले.

# उत्तर भारतातील राज्यांमध्ये धुळीचे वादळ

## मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रालाही इशारा

**नवी दिल्ली, १५ मे**

उत्तर भारतापासून ते अगदी दक्षिण भारतापर्यंत सर्वत्र हवामानात मोठे बदल होत असून, बहुतांशी उत्तर भारतीय राज्यांमध्ये धुळीचे वादळ आल्याचे पाहायला मिळाले.


यादरम्यान वाऱ्याचा वेग इतका मोठा होता, की संपूर्ण आभाळ यामुळे झाकोळले गेले होते. केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार पुढील २४ तासांमध्ये ही स्थिती कायम राहणार असून, राजस्थानच्या वाळवंटी भागातून आलेली ही धूळ दिल्ली पंजाबपासून सर्व उत्तर भारतामध्ये वातावरणावर परिणाम करताना दिसणार आहे. मध्य महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राच्या बहुतांश भागांमध्ये वादळी पावसाची हजेरी असेल असा स्पष्ट इशारा हवामान विभागाने आज जारी केला आहे.

सातारा जिल्ह्यात पाऊस आणि गारपिटीचा ऑरेंज अलर्ट हवामान विभागाने जारी केला आहे. तर, पश्चिम बंगाल, रायलसीमपासून मराठवाडा, कर्नाटक आणि केरळापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्याने राज्यावर सध्या अवकाळीसह पूर्वमोसमी पावसासाठी पूरक वातावरणनिर्मिती होताना दिसत आहे. मुंबईत वादळी पावसाचा अंदाज मागील २४ तासांमध्ये मुंबईतही आकाश अंशतः ढगाळ असल्याचे दिसून आले. तर बुधवारी सायंकाळनंतर पावसाळी ढगांनी शहरातील आकाश व्यापले. परिणामी गुरुवारी मुंबईसह ठाणे, पालघर भागात वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एकिकडे अवकाळी आणि पूर्वमोसमी पावसासाठी राज्यात पूर्णतः पूरक वातावरणनिर्मिती होत असतानाच दुसरीकडे नैऋत्य मोसमी वारे अंदमानातून पुढे सरकत आहेत.

# नेपाळला हाताशी धरून बांगलादेशचा भारतावर डोळा

## ईशान्येकडील सात राज्यांवर मोहम्मद युनूस पुन्हा बरळले

◆ **काठमांडू, १५ मे**



मोहम्मद युनूस बांगलादेशात सत्तेत आल्यापासून कट्टरपंथीयांच्या हाती असलेल्या कळसूत्री बाहुलीसारखे वागत आहे. नेपाळच्या दौऱ्यावर असताना त्यांनी बांगलादेश, नेपाळ, भूतान आणि भारतातील ईशान्येकडील सात राज्यांचा उल्लेख करीत आर्थिक नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे.

बांगलादेश दौऱ्यावर असलेल्या नेपाळच्या प्रतिनिधी सभागृहाचे उपसभापती यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान मोहम्मद युनूस यांनी ऊर्जा, आरोग्य सेवा आणि वाहतूक क्षेत्रात सीमापार सहकार्य वाढविण्यावर भर दिला. यावेळी सामायिक ऊर्जा आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांद्वारे परस्पर संबंध मजबूत करण्याच्या गरजेवर देखील त्यांनी भर दिला. या बैठकीत बांगलादेश, नेपाळ आणि भारत यांच्यातील अलिकडच्या वीज विक्री करारावरही चर्चा झाली, ज्याअंतर्गत नेपाळमधून भारताच्या ग्रीडद्वारे बांगलादेशला ४० मेगावॅट जलविद्युत पुरवठा केला जात आहे. युनूस म्हणाले की, बांगलादेश केवळ ऊर्जाच नाही तर प्रादेशिक आरोग्य सेवेकडेही सामायिक दृष्टिकोनातून पाहतो. रंगपूरमध्ये बांधण्यात येणारे १००० खाटांचे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल नेपाळ आणि भूतानमधील रुग्णांसाठी देखील खुले असेल. आम्ही प्रादेशिक आरोग्य सुरक्षा आणि सामायिक समृद्धीवर भर देणार आहोत. (वृत्तसंस्था)

### चीन दौऱ्यातही भारताविरुद्ध विधान

यावेळी मोहम्मद युनूस यांच्या जुन्या व्यक्तव्यांवरही चर्चा झाली. खरं तर, चीनच्या भेटीदरम्यान, युनूस यांनी बांगलादेशला चीनसाठी उत्पादन, रसद आणि व्यापाराचे प्रादेशिक केंद्र बनवण्याची बाजू मांडली होती. ते म्हणाले होते की, ईशान्य भारतातील सात राज्ये भूपरिवेष्ठित आहेत. त्यांना समुद्रात प्रवेश नाही. आम्ही त्यांच्यासाठी समुद्राचे दार आहोत. तुम्ही बांगलादेशात उत्पादन करा, नेपाळ आणि भूतानमधून जलविद्युत घ्या आणि ती चीनमध्ये विका. त्यांच्या या विधानावर भारतातही टीका झाली.

# भारताने सुरक्षा परिषदेला दिले टीआरएफचे पुरावे

## दहशतवादी संघटना घोषित करण्याची मागणी

◆ **न्यू यॉर्क, १५ मे**

पहलगाम हल्ल्यात सहभागी असल्याच्या आरोपावरून लष्कर-ए-तोयबाची संघटना द रेझिस्टन्स फ्रंट अर्थात् टीआरएफला संयुक्त राष्ट्रांच्या यादीत समाविष्ट करून दहशतवादी संघटना घोषित करावे यासाठी भारताने प्रयत्न वाढविले. याचाच भाग म्हणून एक भारतीय तांत्रिक पथकाने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या समितीची भेट घेतली आणि त्यांना पहलगाम हल्ल्यात या संघटनेचा सहभाग असल्याचे पुरावे दिले.



भारतीय अधिकाऱ्यांनी राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या १२६७ मंजुरी समितीच्या देखरेख पथकाला पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी टीआरएफ जबाबदार असल्याचे सांगितले आणि त्यासंदर्भातील पुरावेदेखील यावेळी दिले. याशिवाय अधिकाऱ्यांनी टीआरएफला जागतिक दहशतवादी संघटना घोषित करण्याची मागणी केली. विशेष असे की, सुरक्षा परिषद १२६७ निर्बंध समिती ही १९९९ मध्ये स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रांची एक उपकंपनी आहे. ही समिती दहशतवादाविरुद्ध, विशेषतः आयएसआयएल अर्थात् इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड द लेव्हंट आणि अल-कायदाशी संबंधित निर्बंधांची अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी जबाबदार आहे. सूत्रांनी सांगितले की, हे पथक संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी कार्यालय आणि दहशतवाद विरोधी समितीच्या कार्यकारी संचालनालयासोबतही बैठका घेईल. हल्लयात टीआरएफच्या कथित सहभागाबद्दल हे पथक संयुक्त राष्ट्रांच्या संबंधित समित्यांना जप्त केलेले साहित्यदेखील देणार आहे. (वृत्तसंस्था)

# चीनचे हेरगिरी जहाज भारताच्या समुद्री हद्दीत

**नवी दिल्ली :** चीनचे हेरगिरी करणारे जहाज भारताच्या समुद्री हद्दीत आढळल्याने खळबळ उडाली आहे. चीनच्या जहाजांच्या या फ्लीटमध्ये एकूण चार जहाज आहेत. यांपैकी तीन जहाजे अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात मोक्याच्या ठिकाणी तैनात झाली आहेत. जहाजांची ही फ्लीट संशोधन करणारी असल्याचे सांगितले जात असले तरी ही जहाजे हेरगिरी जहाजे असल्याची चर्चा आहे.

माध्यमांतील वृत्तानुसार, दा यांग यी हाओ हे चीनचे जहाज सध्या मलाक्का सामुद्रधुनीतून बंगालच्या उपसागरात प्रवेश करणार आहे. यापूर्वी या जहाजावर क्षेपणास्त्र चाचण्या, नौदल जहाजे आणि प्रतिष्ठानांवर हेरगिरी करण्यासाठी ध्वजांकित करण्यात आले आहे. चीनने या जहाजाला संशोधन जहाज म्हणून संबोधले असले तरी भारत आणि इतर देश या चिनी जहाजाला गुप्तहेर जहाजे म्हणून ओळखतात.





# कोल्हापूरच्या अंबाबाई, जोतिबा मंदिरात भाविकांसाठी ड्रेस कोड लागू

◆ **कोल्हापूर, १५ मे**

कोल्हापूरच्या अंबाबाई आणि जोतिबा मंदिरात ड्रेस कोड (वस्त्र संहिता) लागू करण्यात आला आहे. आता भाविकांना दर्शनाला येताना विशिष्ट प्रकारच्या पेहरावात येणे बंधनकारक असणार आहे. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने हा निर्णय घेतला आहे.

मे महिन्याच्या मुलांच्या सुट्या सुरू झाल्या की महाराष्ट्रातील शेकडो भाविक आपल्या कुटुंबासह कोल्हापूरची अंबाबाई आणि जोतिबाच्या दर्शनाला येतात. तसेच मुंबईत स्थायिक झालेले कोल्हापूरकर देखील मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. अशावेळी भाविकांनी मंदिरात जाण्यापूर्वी ड्रेस कोडबाबत दक्ष असणे गरजेचे आहे. 'वाट्टेल तसे' कपडे घालून आता भाविक देवदर्शनाला येऊ शकणार नाहीत.

**पुणे एटीएस पथक दाखल**

करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात पुणे एटीएस पथक दाखल झालं आहे.

भारत- पाकिस्तान तणावाच्या तसेच वस्त्र संहिता लागू केल्याच्या पृष्ठभूमीवर पुणे आणि कोल्हापूर एटीएस पथकाकडून मंदिराची पाहणी करण्यात आली. करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर, मंदिराचा परिसर तसेच सीसीटीव्ही रूम मधून प्रत्येक गोष्टीची माहिती घेतली जात आहे. (वृत्तसंस्था)

### कोणत्या कपड्यांवर बंदी


अंबाबाई आणि जोतिबा मंदिरात आता ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय पश्चिम महाराष्ट्र समितीच्या वतीने घेण्यात आला आहे. मंदिरात देव दर्शनाला येताना आखूड, छोटे कपडे घालण्यास मनाई आहे. मंदिराच्या परिसरात येताना पारंपरिक कपडे आणि संपूर्ण शरीर झाकले जाईल असेच कपडे घालून प्रवेश करणे बंधनकारक आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना गुरुवार, १५ मे पासून ड्रेस कोडच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

# आता रोबोट घेणार वृद्धांची काळजी

## अंथरुणावरून उठविण्यास करणार मदत, आधारही देईल

◆ **वॉशिंग्टन, १५ मे**

भारतात, वृद्धांची सेवा करणे ही केवळ एक जबाबदारी नाही; मुलांसाठी ही संधी एखाद्या वरदानापेक्षा कमी नाही. येथे पालकांना देवाचा दर्जा दिला जातो आणि त्यांची काळजी घेणे हे आपल्या परंपरेत रुजलेले आहे. पण आज जेव्हा आयुष्य स्पीड मोडवर चालत आहे. मुले अभ्यास करण्यासाठी आणि पैसे कमवण्यासाठी बाहेर जात आहेत. अशावेळी वृद्धांना सांभाळण्याची समस्या उद्भवते.



संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे लहान मुलांना तसेच वृद्धांना सांभळण्याची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. एआय आणि ह्यूमनॉईड सारख्या गोष्टी प्रगत झाल्या आहेत. यामुळे वृद्धांना सांभाळण्याची सोडवली जाऊ शकतो. अमेरिकेतील वैज्ञानिकांनी वृद्धांच्या समस्या समजून एक रोबोट तयार केला आहे. जरी रोबोट वृद्ध पालकांची मुले किंवा नातवंडे यांच्यासारखी काळजी घेऊ शकत नसला आणि भावना व्यक्त करू शकत नसला तरीही ते मदत करू शकतात. अमेरिकन शास्त्रज्ञांनीही वृद्धांच्या समस्यांचा विचार करून ई-बार म्हणजेच एल्डर्ली बॉडीली असिसटन्स अर्थी वृद्धांसाठी शारीरिक मदत करणारा रोबोट तयार केला. हा एक असा आधार आहे जो एकटे राहणाऱ्या वृद्धांसाठी खरोखरच परिवर्तनकारी ठरू शकतो. (वृत्तसंस्था)

### भारतासाठीही ठरू शकतो फायदेशीर

भारतात ६० आणि त्यापेक्षा अधिक वयोगटातील लोकसंख्या सतत वाढत आहे. २०२१ मध्ये हा आकडा १३.८ कोटी होता आणि २०३० पर्यंत हा आकडा १९ कोटींच्या पुढे जाऊ शकतो. अनेक वृद्ध खेड्यात किंवा शहरात एकटे राहतात. त्यांची मुले नोकरीसाठी दुसऱ्या शहरात किंवा त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात व्यस्त असतात. जरी ते वृद्ध शहरात राहायला गेले तरी, काम करणारे जोडपे त्यांना पूर्ण वेळ देऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत, ई-बार सारखा आधार हा संस्कृतीच्या विरुद्ध नसून तंत्रज्ञानाद्वारे त्याच सेवाभावाला पाठिंबा देण्याचा प्रयत्न मानला जाऊ शकतो.

### रोबटची वैशिष्ट्ये

- प्रगत सेन्सर्स, कॅमेरा आणि पडणे प्रतिबंधक तंत्रज्ञान काही सेकंदात सक्रिय होतात.
- स्वच्छतागृहामध्ये घसरल्यास किंवा पायऱ्या उतरताना तोल जात असल्यास विशेष बचाव मोड सुरू होतो.
- चालणे, स्ट्रेचिंग, हलके व्यायाम करून घेतात.
- व्हॉइस कमांडवर काम करतो.
- रोबोट वृद्धांसोबत उभा राहतो.

## अग्रलेख...

# ‘व्याघ्र’ काळ!

देखण्या, रुबाबदार अशा वैदर्भीय वाघाच्या भूमीत राहण्याच्या गर्वाची अनुभूती घेत असताना, एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात २०० च्यावर वाघ असल्याचा अभिमान प्रदर्शित करताना, येथील वाघिणींना थेट ओडिशाच्या सिमलीपाल व्याघ्र प्रकल्पात स्थलांतरित करून मोठेपण मिरवताना आणि गतवर्षी विक्रमी असे पावणे चार लाख पर्यटक एकट्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आलेत म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत असतानाच, गेल्या पाच दिवसांत वाघाच्या हल्ल्यात तब्बल सहा महिलांचा बळी जाऊनही वनविभाग आणि संबंधित परिसंस्था कमालीची शांत आहे, हे मोठे धक्कादायक आहे. मानव व वन्यजीवांच्या सहजीवनाची संकल्पना मांडत २०१० मध्ये ताडोबा व्याघ्र प्रकल्पात बफर क्षेत्राची निर्मिती झाली. जवळपास ८० गावे त्यात येतात. आजही तेथील गावकऱ्यांचे जंगलावरील अवलंबन काही कमी झालेले नाही. उलट, वाघांची संख्या वाढली. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष पेटला. तसा तो येथे पाचवीलाच पूजला आहे. पण गेल्या आठवडाभरात या संपूर्ण परिसरात घडलेल्या वाघाच्या हल्ल्याच्या घटना थरकाप उडवणाऱ्या आहेत. सिंदेवाही वन परिक्षेत्रात एकाच दिवशी तीन महिलांवर हल्ला करून वाघाने त्यांना ठार केले. त्यात सासू-सुनेचा समावेश होता. अन्य एक महिला कशीबशी वाचली. सलग पुढच्या तीन दिवसांत वाघाने अन्य तीन महिलांच्या नरडीचा घोट घेतला. त्यातील एकीला तर चक्क तिच्या पतीदेखत फरफटत नेले आणि क्षणात ठार केले. कोणतेही संवेदनशील मन हळहळल्याशिवाय राहणार नाही अशा या घटना राज्याच्या एका कोपऱ्यात असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात घडल्या, नव्हे घडत आहेत. आम्ही जंगलाशेजारी राहतो, रान व रानातले जीव जपतो, आमची रोजगाराची साधनेही जंगलावरच अवलंबून आहेत, हा काय आमचा दोष आहे? असा प्रश्न जेव्हा सांत्वन करायला गेलेल्या वनाधिकाऱ्यांना, राजकीय पुढाऱ्यांना ग्रामस्थ विचारतात तेव्हा निरुत्तर होण्यापलीकडे त्यांच्याकडे पर्याय नसतो. राज्यातील ३५.२१ टक्के जंगल असलेल्या भागाची व तेथे वास्तव्य करणाऱ्या गावकऱ्यांची ही शोकांतिका आहे. जंगल जपण्याची जबाबदारी केवळ आमचीच आहे का, हा त्यांचा प्रश्न तेवढाच स्वाभाविक आणि अंतर्मुख करणारा आहे.

यंदाच्या जानेवारी महिन्यात ‘वाईल्डकॉन-२०२५’ ही भारतातील पहिली परिषद चंद्रपुरात झाली. मानव-वन्यजीव संघर्ष हा या परिषदेचा बीज विषय होता. ‘संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यप्राण्यांच्या मुबलक संख्येवर नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना’ असे गोंडस नाव देऊन या परिषदेत दोन दिवस चर्चासत्र रंगले. देश-विदेशातून आलेल्या तज्ज्ञांच्या मंथनातून मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्याचा मार्ग निघेल, अशी आशा व्यक्त केली गेली. यापूर्वी असे प्रयत्न झालेच नाही असे नाही, पण आजवर या गंभीर प्रश्नावर कुठलीच उपाययोजना प्रभावी ठरली असे ऐकिवात नाही. खरे तर, अशा परिषदा आणि संमेलनांतून या समस्येचा मार्ग सापडेल अशी भाबडी आशा करणे चुकीचे आहे. प्रत्यक्ष कृतीशिवाय तो सापडणारही नाही. मध्यंतरी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघ गावाजवळ आला की गावकऱ्यांना लगेच त्यांच्या भ्रमणध्वनीवर सावधगिरीची सूचना देणारे तंत्रज्ञान विकसित केले आणि ते ताडोबात वापरले जात गेले. किंबहुना, या उपक्रमाचे कौतुक खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा त्यांच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून केले. तेव्हा मूठभर मांस चढले होते. पण याही पद्धतीचा प्रत्यक्ष किती लाभ झाला याची आकडेवारी वनविभागाने अद्याप जाहीर केली नाही.

जंगलाशेजारी असलेल्या गावकऱ्यांनी तेंदुपत्ता वेचण्यासाठी, सरपण गोळा करण्यासाठी जंगलात जाऊ नये यासाठी वन विभाग उपाययोजना करीत असते, असे सांगितले जाते. त्यांना मोफत गॅस सिलेंडर देण्याची योजना, हिरवे बांबू उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबवला जात आहे म्हणे, पण तरीही अशा घटना घडतच आहेत ना, त्याचे काय? बरे गावकरी जंगलात गेले नाही तरी गावात शिरून वाघ, बिबटे त्यांचे मुडदे पाडतात, हेही वास्तव नाकारता येत नाही. वन्यप्राण्यांना मुबलक खाद्यान्न व पाण्याची सोय जंगलातच व्हावी यासाठी वन विभागाचे काम सुरू असेलही, पण या साऱ्यांचा परिणाम दिसत नाही, हा खरा चिंतेचा विषय आहे. वर्षभरापूर्वी तर चंद्रपूर येथील महाऔष्णिक वीज केंद्राच्या वसाहतीत शिरून वाघाने एका माउलीच्या हातचे पोर उचलून नेले होते. महानगराला लागून असलेल्या दुर्गापूर परिसरातून एका खेळणाऱ्या मुलाला अलगद उचलून बिबट्याने त्याचा जीव घेतला. या साऱ्या घटना ऐकताना, वाचताना सहज वाटत असल्या तरी त्यामागचे दुःख फार मोठे असते, हे समजून घेतले पाहिजे. अशा घटना घडल्या की, संबंधित वाघ-बिबट्याला शोधायचे, त्यांना बेशुद्ध करून जेरबंद करायचे एवढाच काय तो या समस्येवरचा उपाय आहे, असे समजणे भविष्यातील मोठी चूक ठरेल. समस्येचे मूळ शोधून त्यावर ठोस उपाय शोधला गेला पाहिजे. पर्यटनातून मिळालेल्या निधीचा काही अंश वन विभागाच्या फाऊंडेशनकडे जातो. या निधीचा वापर ज्या राजबिंड्या वाघाच्या भरवशावर ताडोबातील पर्यटन विकसित होत आहे, त्या वाघांच्या संरक्षणासाठी व परिसरातील गावकऱ्यांसाठीही केला पाहिजे. हो, वाघांचे संरक्षणही तेवढेच गरजेचे आहे, हा मुद्दा नाकारता येत नाही. मानव-वन्यजीव संघर्षाची ही दुसरी बाजूही तेवढीच महत्त्वाची असून, तीही समजून घेतली पाहिजे. वाघ जसा माणसाचा काळ बनून सध्या समोर आला आहे, तसाच वाघावरही काळाने वेळोवेळी घाला घातला आहे. २०२५ या नववर्षाची सुरुवात तर त्यांच्यासाठीही बिकट ठरली. हे वर्ष उजाडताच पहिल्या २२ दिवसांत तब्बल ११ वाघांचा मृत्यू झाला. त्यातील काही नैसर्गिक असले तरी काही मृत्यूंना वन विभागाचा निष्काळजीपणा भोवला. जंगलाच्या एका राजपुत्राला ताडोबासारख्या संरक्षित क्षेत्रातही कुजेपर्यंत पडून राहावे लागते, तर दुसऱ्याला आपल्या हक्काच्या जंगलातला रस्ता ओलांडताना रेल्वेच्या धडकेत जीव गमवावा लागतो, हे कशाचे लक्षण आहे? ६ जानेवारीला भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे एक रूपवान, रुबाबदार वाघ तीन तुकड्यात पडलेला आढळतो! ७ जानेवारीला यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा वनविभागांतर्गत येणाऱ्या उकणी कोळसा खाण परिसरात अर्धवट कुजलेल्या अवस्थेत एक वाघ सापडतो. ८ जानेवारीला नागपूरच्या देवलापार वनपरिक्षेत्रात वाघिणीला आपल्या बछड्याचा मृतदेह बघावा लागतो. असाच एक बछडा ९ जानेवारीला मूल बफरमध्ये मरण पावतो. अशा ११ वाघांच्या मृत्यूचे हे सत्र महिनाभराच्या आतच हलकल्लोळ माजवते, हे चिंताजनक नाही का? एवढे होऊनही वाघ वाढले तर मृत्यू होणारच, अशी रूक्ष प्रतिक्रिया वनाधिकारी व्यक्त करीत असतील तर या वाघांचा ‘काळ’च आला आहे, असे समजायला हरकत नाही!

एकीकडे वाघाच्या हल्ल्यात माणसाला जीव गमवावा लागतो, तर दुसरीकडे वाघही सुरक्षित नाही, ही स्थिती एकूण परिसंस्थेसाठी चिंताजनक आहे. वैदर्भीय उन्हाळा काय केवळ माणसांनाच त्रस्त करतो, वन्यजीवांना नाही? त्यांचाही जीव कासावीस होतो. त्यांच्यासाठी पाणवठे तुंबलेले असणे गरजेचे आहे. तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढवण्यावर भर दिला जाणे आवश्यक आहे. जंगलाशेजारी असलेल्या गावकऱ्यांना फाऊंडेशनच्या पैशातून मोफत सोलर यंत्रणा, सातत्याने गॅस सिलेंडरची उपलब्धता आणि तेंदुपत्ता संकलन करण्यासाठी एक सुरक्षित यंत्रणा तयार करून देणेही आवश्यक आहे. किंबहुना, शेतातच तेंदुपत्ता आणि बांबू लावण्यासाठी काही योजना करता येत असेल तर ती केली पाहिजे. लाडक्या बहिणीसारखी एखादी योजना वनांवर आधारित कुटुंबासाठी राबवली गेली पाहिजे. असे बरेच उपाय आहेत. पण खरी गरज या साऱ्या उपायांची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने होणे हाच या समस्येवरचा ठोस उपाय मानला पाहिजे. केवळ कागदी घोडे तेवढे नाचू नये म्हणजे झालं...

## प्रासंगिक

### विजय पांढरीपांडे

# हे घेऊ की ते घेऊ? बारावीनंतर काय?

नुकतेच इयत्ता बारावीचे निकाल जाहीर झाले. अन् विद्यार्थी, पालक यांची पुढे काय, या प्रश्नासह धावपळ सुरू झाली. या दरम्यान अनेकांनी आयआयटी, जेईई, नीट अशा प्रवेश परीक्षा देखील दिल्या असतील. खरे तर प्रवेश मिळेल की नाही ही चिंता करण्यासारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. राष्ट्रीय स्तरावरील सरकारी, खाजगी अशा सर्व क्षेत्रांतील संस्थांची संख्या, तसेच विविध कोर्सेसची प्रवेश संख्या कितीतरी पटीने वाढली आहे.आयआयटी, एनआयटीचा अपवाद सोडला तर अनेक राज्यांतील इंजिनीयरिंगच्या शेकडो जागा रिकाम्या राहताहेत. सायन्स, कॉमर्स, कला क्षेत्रात तर सहज प्रवेश मिळेल अशी स्थिती आहे. तरी टेन्शन आहे ते मला हवा असलेला कोर्स/ विषय, मला हव्या त्याच संस्थेत मिळेल की नाही या अट्टहासाचा. हा दुराग्रह सोडला तर मग कशाचीच अडचण नाही. आजकाल राष्ट्रीय स्पर्धा प्रवेश परीक्षेत लाखोंच्या संख्येने विद्यार्थी बसतात. ते गेली दोन चार वर्षे ट्युशनच्या चरकातून पिळून निघालेली असतात. प्रवेश परीक्षेचे निकाल पर्सेंटाईल स्वरूपात जाहीर होतात. त्यामुळे ९५ पर्सेंटाईल असले तरी हवा तो कोर्स हवा त्या संस्थेत न मिळण्याची भीती असतेच. कारण तुमच्या वरचे ५ टक्के विद्यार्थीच संख्येने इतके होतात की त्या मोक्याच्या क्रीम सीट्स संपून जातात, हे गणित समजून घेतले पाहिजे. म्हणजे नैराश्य पचवायला सोपे जाईल.

भविष्यातील गरजा, नोकरी, करीअरचे स्वरूप लक्षात घेतले तर कोणताही कोर्स घेतला, कुठेही शिक्षण घेतले तरी वाव आहे, संधी आहे. कारण तुमचे करीअर हे कुठून, कोणत्या विषयात कोणते ग्रेड्स मिळवून पदवी घेतली यावर मुळीच अवलंबून नसते. किंबहुना अनेक क्षेत्रांत तुम्ही पदवीसाठी जे काही शिकला त्याचा मुळीच उपयोग होत नाही. पदवीमुळे तुम्ही कोणकोणती इतर कौशल्ये आत्मसात केलीत, नवे काही शिकण्याचा तुमचा उत्साह कितपत दांडगा आहे, तुमची वैचारिक निर्णय क्षमता, तार्किक



विवेकाने विश्लेषण करण्याची क्षमता किती जागरूक आहे, यावर तुमचे करीअरचे भविष्य अवलंबून असते

आजकाल संगणक, आयटी, एआय, एमएल वगैरेचे नको तितके स्तोम माजले आहे. या गोष्टी कुठेही, केव्हाही शिकता येतात. त्यासाठी त्या विषयात पदवीच घ्यायला हवी असा आग्रह नको. अगदी सायन्स, कॉमर्सचे शिक्षण घेताना, घेतल्यानंतर या संगणकसंबंधी विषयातले कौशल्य आत्मसात करता येते.

याचा अर्थ सर्व प्रथम अमुकच कोर्स, अमुकच संस्था हा दुराग्रह सोडला पाहिजे. आधी आपली बौद्धिक क्षमता बघा.आपल्याला काय सोपे जाईल त्याचा विचार करा. त्याच बरोबर आपल्या घरची पालकांची आर्थिक क्षमता बघा. आजकाल खाजगी संस्था, विद्यापीठे अवाच्या सवा शुल्क घेतात. पण त्या तुलनेत शिक्षणात गुणवत्ता, दर्जा असेलच याची खात्री नसते. अनेक ठिकाणी तो नसतोच. संस्था आपल्या घरापासून, शहरापासून किती दूर आहे, तिथला होस्टेलचा खर्च, एकटे राहण्याचा मानसिक ताण आपल्याला (खास करून मुलींना) झेपणार आहे का, याचाही गांभीर्याने विचार केला पाहिजे. एरवी अशा बाबतीत घाईगर्दीने घेतलेले निर्णय पुढे पश्चात्तापास कारणीभूत ठरतात.

कोणताही कोर्स कमी दर्जाचा नाही. कोणतेही क्षेत्र कमी प्रतीचे नाही. नोकरीत मिळणारा पगार म्हणजे तुमचे एकूण उत्पन्न अन् तुमचे शिक्षण (पदवी) याचा देखील काडीमात्र संबंध नसतो. एक वकील दिवसाला आयआयटी इंजिनीयरच्या मासिक पगारापेक्षा जास्त कमाई करू शकतो हे सत्य, वास्तव आहे. तेव्हा कशाच्याही संदर्भात निराश न होता उत्साहाने, खुल्या दिलाने, काहीशा लवचीक धोरणाने या बारावीनंतरच्या निर्णय प्रक्रियेला सामोरे जा. खास करून पालकांनी मुलाची आवड, त्याची क्षमता, त्याची भावनिक जडणघडण याचा प्रामुख्याने विचार करावा. गर्दी जिकडे चालली आहे तिकडे धावणे हा शुद्ध वेडेपणा झाला. जिथे गर्दी नाही तिथे जास्त सौंदर्य, जास्त संधी असते ही आशावादी वृत्ती ठेवावी.

आता सगळीकडे नाही तरी आपल्या महाराष्ट्रात नवे शैक्षणिक धोरण राबवणे सुरू झाले आहे. यात बरीच लवचीकता आहे. वेगवेगळ्या विषयाची आवडीनुसार निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे. शिकताना वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करण्याची देखील संधी आहे. कृती शिक्षणावर, प्रॅक्टिकल अनुभवावर भर आहे. वेगवेगळ्या ठिकाणचे ऑनलाईन कोर्सेस करण्याचे अन् त्याद्वारे कमावलेले क्रेडिट पदवीसाठी ग्राह्य धरण्याचे धोरण आहे.य ाची सर्व माहिती मिळवून (जी सर्व संस्थांच्या, कॉलेज विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध असते) ती समजून घेऊन त्याचा लाभ घेतला तर कुणालाही निराश होण्याचे कारण उरणार नाही. उपलब्ध माहितीचा उपयोग आपल्या भल्यासाठी करून घेतला तर भविष्यातले अर्धे अधिक प्रश्न सहज सुटतीलअन् पुढील उच्च शिक्षण हा आनंददायी अनुभव ठरेल.

७६५९०८४५५५

## वेध

### रेवती जोशी–अंधारे

# बांधकामांचा पसारा कोणी आवरायचा?

उपराजधानी सध्या ‘अंडर कन्स्ट्रक्शन’ झाली आहे. सार्वजनिक कामांसोबत खाजगी इमारतींच्या बांधकामांची लाट आली आहे आणि या लाटेत शहरभर विकासाचा पसारा मांडलेला आहे. चौकांच्या कोपऱ्यात पडलेले सिमेंटचे गट्टू, रस्त्यावर पसरलेली गिट्टीची चुरी, गल्लीबोळांमध्ये अस्ताव्यस्त पसरलेले विटांचे तुकडे आणि रस्ता डांबराचा की वाळूचा? असा प्रश्न पडण्यासारखी स्थिती! दुचाकी आणि सायकलस्वार घसरून पडण्याची १०० टक्के हमी! बांधकामासोबतच पाडकाम सुरू असलेल्या ठिकाणांचाही विचार आहे.नागपूर शहर झपाट्याने विकसित होत आहे. नवनवीन इमारती, रस्ते आणि अन्य पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. पण, या विकास प्रक्रियेच्या उत्तरार्धातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रस्त्यावर पसरलेले बांधकाम साहित्याचे अवशेष! पाडकामात सिमेंट-विटांचे मोठे तुकडे आणि इतर घनकचरा मोठ्या प्रमाणात निघतो. हे साहित्य रस्त्याच्या कडेला टाकतात आणि काही उपद्रवींच्या कामगिरीने तिथे कचऱ्याचा ढीग आकाराला येतो. भटके कुत्रे आणि गाईंचा मुक्काम या ढीगावर जमतो. सुंदर नागपूर-स्वच्छ नागपूर संकल्पनेची वाट लागते. बांधकाम साहित्यामुळे रस्त्यांची रुंदी कमी होते. परिणामी वाहतुकीची कोंडी होते आणि नागरिकांचा वेळ-इंधन वाया जाते. काही वेळा रुग्णवाहिका किंवा अग्निशमन वाहनांसारख्या आपत्कालीन सेवांनाही याचा फटका बसतो. शहरातील काही फूटपाथवरून चालणेही पादचाऱ्यांना अशक्य झाले आहे. फूटपाथवर साठवलेले साहित्य त्यांच्यासाठी धोकादायक ठरते. धूळ, सिमेंट, रेती आणि मोठ्या अर्थ मुव्हिंग मशिन्सच्या आवाजाने ध्वनिप्रदूषणात भरच पडते. थातुरमातुर स्वच्छता होत असली तरी, बांधलेल्या रस्त्यातून गडर लाईन टाकायची राहिल्याची आठवण होते. खोदकाम सुरू आणि पुन्हा पहिले पाढे पंचावन्न! तिथला पसारा अजून आवरायचाच असताना, अगम्य अशा जाड आणि रंगीत केबल्स टाकण्यासाठी पुन्हा खोदकाम! खाजगी बांधकामाच्या ठिकाणी बोअरवेलचा उपसा, सिमेंटचे वाळलेले गोळे, टाईल्सचे लहानमोठे तुकडे, खरडे आणि पॅकिंगच्या खरड्यांसोबतच अनाकलनीय अशा कचऱ्याची निर्मिती होत असते. एकानंतर एक अशा या क्रिया सुरूच असतात आणि त्यापुढे नागरिकांची सपशेल शरणागती असते.

महानगरपालिकेने अशा प्रकारच्या अनधिकृत साठवणींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. बांधकाम व्यावसायिकांना यासाठी निश्चित जागा देण्यासह नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हायला हवी. यासाठी, नागपूर महानगरपालिकेने चांगला पुढाकार घेतला आहे. पाडकाम आणि बांधकामातून निघालेला कचरा उचलून नेण्यासाठी नागरिक महानगरपालिकेला संपर्क करू शकतात. यासाठी मनपाने हेल्पलाईन जारी केली आहे. बांधकामकर्त्याने मनपाच्या माय नागपूर ॲपवर जाऊन या सेवेसाठी नोंदणी करायची आहे. हे निरुपयोगी साहित्य उचलून नेण्यासाठी मनपा प्रति ट्रक याप्रमाणे पैसे आकारणी करते. हा घनकचरा भांडेवाडीच्या बाजूला मोकळ्या जागेवर टाकला जातो. रेती, सिमेंट, विटा, गिट्टी, चुरी अशा साहित्यावर प्रक्रीया करणारा प्रकल्प या ठिकाणी उभारण्याचे प्रस्तावित आहे. खरं तर ही खूपच प्रभावी योजना आहे. पण, लक्षात कोण घेतो? मनपाचे एनडीएस अर्थात उपद्रव शोध पथकही कार्यरत आहे. रस्त्यांसोबत गल्लीबोळात सुरू असलेल्या बांधकाम साईट्सवर हमखास दिसणाऱ्या या ‘उपद्रवा’ची जाणीव त्यांनाही आहेच. ते त्यांच्यापरीने या समस्येचा निपटारा करतात. अशा पसरलेल्या बांधकाम साहित्यासाठी ते दंड वसूल करतात आणि विटा-रेती उचलून लवकर रस्ता मोकळा करण्यास सांगतात. त्यांची पाठ फिरली की संपला विषय! पुन्हा एखाद्या अधिकाऱ्याने विचारलंच तर आधी भरलेल्या पैशांची पावती दाखवून मान सोडवून घेण्याचेही प्रकार सर्वज्ञात आहेत. अशा महाभागांची आकडेवारी मनपाकडून नियमित जारी होते, हा भाग अलहिदा!

नागपुरात जी २० परिषदेच्या वेळी आलेल्या निधीतून एकूण १२ चौकांच्या सौंदर्यीकरणाचे काम सुरू आहे. सौंदर्यीकरण म्हणजे जागोजागी गट्टू लावणे नव्हे, हे सुजाण नागरिक जाणतातच. हेमाडपंथी तंत्राने लावलेल्या त्या गट्टूपैकी एखादा निघाला की, उरलेली रांग निघालीच समजा! जमिनीतून बाहेर डोकावणाऱ्या केबल्स हा त्या सौंदर्यीकरणाचाच भाग असतील का? कृतिशील प्रशासन आणि जागरूक नागरिक यांच्या समन्वयातूनच हा प्रश्न निकाली निघणार आहे. रस्त्यावर आणि चौकांच्या कोपऱ्यांवर पडलेल्या या घनकचऱ्याचा योग्य निपटारा व्हायलाच हवा.

नागपूरसारख्या मोठ्या शहरात रस्त्यावर बांधकाम साहित्य साठवणे ही गंभीर समस्या आहे. नागरिकांनी आणि प्रशासनाने एकत्र येऊन या समस्येवर उपाययोजना केली पाहिजे, तरच सुरक्षित आणि सुरळीत वाहतूक शक्य होईल. विकास आणि व्यवस्था हातात हात घालूनच पुढे जाऊ शकतात.

९८५०३३९२४०

## दखल

### मोरेश्वर बडगे

# ठाकरेंची नाकेबंदी, काकांचा ‘दादा, मला वाचवा’

गेल्या आठवड्यात देशात युद्धाचे वातावरण होते. राजकारणातही स्फोट झाले. ‘शिल्लक राष्ट्रवादी’चे सुप्रीमो शरद पवार यांनी केलेल्या सर्जिकल हल्ल्यात ‘शिल्लक शिवसेने’चे उद्धव ठाकरे यांचे उरलेसुरले साम्राज्य तुटफूट झाले. महाराष्ट्राच्या राजकारणाची तर मोठी विचित्र परिस्थिती आहे. वैचारिक बांधिलकी तर केव्हाच संपली. विकासाच्या कामांसाठी फंड मिळत नाही असे सांगून सत्ता पक्षाशी मिठी मारण्याचे राजकारण पाहायला मिळते आहे. सध्या कुठल्याही मोठ्या निवडणुका नाहीत. तरीही फोडाफोडी सुरू आहे. सत्तेसाठीची हतबलता बड्या बड्या राजकारण्यांना अस्वस्थ करते आहे. आयुष्याच्या संध्याकाळी शरद पवारांनी मोठा डाव टाकला आहे. शरद पवारांच्या प्रेमात पडायचे नाही हा अलिखित नियम आहे. हा नियम जे मोडतात त्यांचा ‘उद्धव ठाकरे’ होतो. शरद पवार हा राजकारणातला ‘बर्म्युडा ट्रँगल’ मानला जातो. ह्या ट्रँगलच्या जवळपास येणारे गायब होतात असे मानले जाते. जहाजं, विमानंसुद्धा हा ट्रँगल गिळतो अशा कथा रंगवून सांगितल्या जातात. तरीही काहींना या ट्रँगलच्या जवळ जाण्याचा मोह होतो. शरद पवारांच्या सोबत गेलेले सारे रिकामे झाले हा इतिहास आहे.

पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे या ‘ट्रँगल’च्या सापळ्यात अडकले. ‘तुला मुख्यमंत्री करतो’ असे सांगून शरद पवारांनी उद्धव ठाकरेंना नादी लावलं. भाजपापासून तोडलं. काँग्रेसला सोबत घेऊन महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी बनवली. ती वाजणारच नव्हती. अडीच वर्षांत सरकार पडले. उद्धव यांच्या विरोधात शिवसेनेच्या आमदारांनी बंड केले. भाजपासोबत जाऊन एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सरकार बनवलं तेव्हापासून उद्धव ठाकरे फडफड करीत आहेत. चुकीच्या माणसाच्या संगतीत गेले तर काय होते याचा ठाकरे आणि त्यांची शिवसेना हा नमुना आहे. ‘काँग्रेससोबत कधीही जाणार नाही’ असे बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते. त्यांचा वारसा सांगणाऱ्या उद्धव यांनी नेमके उलटे केले. हिंदुत्व सोडले. काय मिळाले? नियती मोठी क्रूर असते. याच जन्मी हिशेब चुकवावा लागतो. हातचा पक्ष गेला, ‘धनुष्यबाण’ हे निवडणूक चिन्ह गेले, सत्ता गेली, मुलगा आदित्यचे करीअर धोक्यात आले. ‘माझा बाप चोरला’ असे ओरडत उद्धव फिरताहेत. पण कोण ऐकणार? मुंबई महापालिकेची निवडणूकही जिंकण्याची ताकद आता ठाकरे सेनेकडे उरली नाही. ज्यांच्या जोरावर उद्धव ठाकरे यांनी भाजपाला शिंगावर घेतले त्या शरद पवारांना तर भाजपासोबत जाण्याचे वेध लागले आहेत. ‘२५ वर्षे आम्ही युतीत सडलो’ असे उद्धव म्हणाले होते. आज काय म्हणणार? बोलती बंद आहे.



शरद पवारांना जाब विचारण्याची हिंमतही आता उद्धव यांच्यात उरली नाही. दोर केव्हाच कापले गेले आहेत. एकनाथ शिंदे या एकेकाळच्या कट्टर शिवसैनिकाला आवाज देता आला असता. पण उद्धव यांनी तसे संबंध ठेवलेच नाहीत. ‘गद्दार’, ‘गद्दार’ म्हणत राहिले. अजितदादा पवार यांनी दोन वर्षांपूर्वी काकांचा राष्ट्रवादी पक्ष फोडला. सुरुवातीचा काही काळ सोडला तर काका-पुतण्यात बोलचाल बंद नव्हती. संपर्क होता. कुटुंबाच्या बहाण्याने दोघांच्या गाठीभेटी सुरू होत्या. काका-पुतण्याची भांडणे म्हणजे मिलीभगत आहे असे अनेकांना आजही वाटते. उद्धव यांनी शरद पवारांवर फाजील विश्वास ठेवला. पवारांना पुन्हा चांगले दिवस येतील, ते पुन्हा आपल्याला मुख्यमंत्रिपदी बसवतील अशी आशा उद्धव बाळगून होते. मात्र सारे पत्ते उलटे पडत गेले. देवेंद्र फडणवीस यांना टोमणे मारण्यात त्यांनी दिवस काढले. आज शरद पवारांनाच ते नकोसे झाले आहेत. काँग्रेसने तर मागेच त्यांना सोडल्यासारखे आहे. एवढेच काय, त्यांचे भाऊ राज ठाकरे हेही त्यांना टाळी द्यायला तयार नाहीत.

संभ्रम, संभ्रमावस्था हे शब्द शरद पवार यांना पाहूनच शब्दकोशात आले असावे. सर्वांना संभ्रमावस्थेत ठेवून महाराष्ट्राचे राजकारण स्वतःभोवती फिरवत ठेवणारे शरद पवार आज आयुष्याच्या संध्याकाळीही कोणाचे? या प्रश्नाचे उत्तर नेमके देता येत नाही. भाजपाविरोधी राजकारण करतो असे सांगत सांगत शरद पवार भाजपाशी जमवून घेत राजकारण करत राहिले. आता अचानक पवारांनी यू टर्न मारला. त्यामुळे त्याची जोरात चर्चा आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार का? यापेक्षा पवार मोदींसोबत बसणार का? हा चर्चेचा गरमागरम विषय आहे. अजितदादा पवारांनी बंड केले तेव्हाही अनेकांना ते नाटक वाटले. पवारांनी नेमके काय केले? त्यांनी पुतण्याला पुढे पाठवले. त्यांच्यासोबत आपले आठ-दहा मंत्री सरकारमध्ये घुसवले. त्यांची बहुतेक टीम महायुतीत आधीच दाखल आहे. फक्त सुप्रिया सुळे या मुलीसोबत शरद पवार मागे राहिले. मुहूर्ताची वाट आहे. इथपर्यंत सारं शांत होतं. मात्र ‘आपल्या राष्ट्रवादीतल्या काही नेत्यांचा अजितदादांसोबत जायचा विचार आहे’ असे पवार गेल्या आठवड्यात निवडक पत्रकारांशी बोलले आणि एकच खळबळ उडाली. लोकांची कामं करायची असतील, आमदारांना सोबत ठेवायचे असेल आणि त्यासाठी सरकारी फंड मिळवायचा असेल तर सत्तेसोबत असले पाहिजे हे पवारांना छान ठावूक आहे. मात्र आता महायुतीसोबत जायचे म्हटले तर ते अप्रत्यक्ष भाजपासोबत गेल्यासारखे होणार आहे. ‘मी नाही त्यातली, काडी लावा आतली’ असा हा मामला आहे. शरद पवार थेट भाजपामध्ये जाणार नाहीत. ते पुतण्याकडे जातील. शेवटी साऱ्या ‘नद्यां’ना महायुतीतच जायचं आहे. पवार आज ८४ वर्षांचे आहेत. तरीही त्यांची हौस फ़िटलेली नाही. पुढच्या वर्षी त्यांची राज्यसभेची मुदत संपते आहे. पुन्हा राज्यसभेवर जायचे आहे. मात्र त्यासाठी पुतण्याची मदत घेतल्याशिवाय त्यांना पर्याय नाही. शरद पवार पक्षाचे फक्त ८ खासदार आणि १० आमदार आहेत. पुतण्यासोबत गेले तर महायुतीच्या मदतीने काका पुन्हा राज्यसभेवर जाऊ शकतात. अजून तसे काही ठरलेले नाही. पण काका किती दूरचा विचार फार आधी करून ठेवतात त्याचा हा नमुना आहे. ‘काका मला वाचवा’ ही किंकाळी इतिहासात गाजली. आता इतिहास बदलणार आहे. ‘काका मला वाचवा’ऐवजी ‘दादा मला वाचवा’ अशी आरोळी ऐकू येऊ शकते. त्याची सुरुवात झाली आहे. शरद पवारांनी दबक्या आवाजात भाजपाची बाजू उचलून धरणे सुरू केले आहे. पाकिस्तानशी युद्धावर लोकसभेत चर्चा करा ही विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी पवारांनी फेटाळून लावली. त्यापेक्षा सर्वपक्षीय बैठक चांगली राहील असा मधला मार्ग पवारांनी सुचवला आहे. पवारांनी सैन्याचे कौतुक केले आहे. हे पवार नव्हे, एक बाप बोलतो आहे. पवारांनी अनेकांना बनवले, अनेकांना संपवले. मात्र संधी असूनही त्यांना आपल्या मुलीचे म्हणजे सुप्रिया सुळे यांचे नेतृत्व प्रस्थापित करून देता आले नाही. सुप्रिया तीनदा लोकसभेवर बारामतीतून निवडून आल्या आहेत. लोकसभेत त्या सक्रियही आहेत. मात्र अजूनही त्यांच्याकडे ‘शरद पवारांची कन्या’ म्हणूनच पाहिले जाते. एक बाप म्हणून पवारांच्या मनात ही खंत आहे. सुप्रियाला एनडीएमध्ये ढकलायचे असे त्यांच्या मनात आहे. सध्या त्यासाठीच आवश्यक ती पार्श्वभूमी ते तयार करताना दिसत आहेत. मोदी मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच अपेक्षित आहे. त्यावेळी सुप्रिया सुळे मंत्रिमंडळात दिसतील. राजकारण खूप बदलत आहे. स्वागताला तयार राहा.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## महाराष्ट्र पोलिस दलाचे अभिनंदनीय कार्य

पोलिस दलाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे सामान्य नागरिकांना संरक्षण, न्याय आणि समाजकंटकांवर अंकुश आणि शिक्षा या तत्त्वाप्रमाणे कार्यरत राहणे हे अपेक्षित आहे. परंतु अनेक घटनांमध्ये या दलातील काही कामचुकार आणि स्वार्थी कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळे प्रामाणिक व कार्यक्षम कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊन या विभागाची नाचक्की होत असते. अपराधी प्रवृत्तीच्या लोकांना आपल्या अधिकाराचा गैरफायदा करून त्यांची अपराधी कृत्ये उघडकीस न आणणे, त्यांच्यावर गुन्हे दाखल न करणे, त्यातून आर्थिक लाभ घेणे, इत्यादी विविध प्रकरणांत गुंतलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निलंबन किंवा बडतर्फीच्या वार्ता वाचण्यात आल्या की पोलिस दलाविषयी असलेला आदर दुणावतो. तसेच या दलातील कर्तव्यदक्ष, संवेदनशील व प्रामाणिक पोलिस कर्मचाऱ्याच्या कर्तृत्वाची वार्ता पण सुखावून जाते.

वस्तुत: पोलिस दलाच्या कार्यतत्परतेच्या घटना, वार्ता या जास्त असतात. त्या वाचण्यात आल्या की सामान्य




नागरिकांना अभिमान व समाज सुरक्षिततेविषयी आत्मविश्वास वाढतो. काही घटना, गुन्हे तपास आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने इतक्या तत्परतेने पूर्ण केला जातो की गुन्हेगारांवर जरब बसते, ते पकडले जातात. अशा कर्मचाऱ्यांचे कौतुक करावेसे वाटते. उच्चस्तरीय वरिष्ठ अधिकारी यांची दखलही घेतात. पोलिस दलातील गैरकृत्य व अपराधी प्रवृत्ती कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर करडी नजर ठेवून त्यांचा शोध घेणे, त्यांचे खाते बदल करणे किंवा बदली करणे आणि अशा कृत्यांपासून प्रवृत्त करणे, हे मोठे आणि सातत्याचे आव्हान आहे. शहराचे विस्तारीकरण, वाढती लोकसंख्या आणि त्यातूनच जन्माला आलेले गुन्हेगार, समाज माध्यमातून घडणारे गुन्हे, अपुरी कर्मचारी संख्या, आवश्यक साधन अपूर्णता इत्यादींना गृहीत धरून कार्य होत आहे. हे अभिनंदनीय असून महाराष्ट्र पोलिस उच्चस्तरीय कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी हे शिवधनुष्य लीलया पेलले आहे.

**संजय पाठक**/नागपूर

## वाचक पत्रे

### बळीराजाला कोणी वाली आहे का?

विधानसभा २०२४ च्या निवडणुकीदरम्यान महायुतीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे मोठे आश्वासन दिले होते. मात्र सत्तेवर आल्यानंतर या आश्वासनाची अंमलबजावणी झाल्याचे काहीही चित्र दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी केवळ एक जुमला ठरणार का? असा सवाल सर्वत्र उपस्थित होतो आहे. महायुतीच्या प्रचारात २ लाखांपर्यंतची शेतकरी कर्जमाफी देण्याचे जाहीर आश्वासन देण्यात आले होते. परंतु २०२५ च्या मे अखेरपर्यंत कोणतीही अधिकृत योजना किंवा आदेश शासनाकडून जाहीर झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे आणि नाराजीचे वातावरण आहे. महाराष्ट्रातील काही महत्त्वाच्या आकडेवारीनुसार : सुमारे १.५ कोटी शेतकरी राज्यात सक्रिय आहेत, त्यापैकी ७० लाखांहून अधिक शेतकरी बँक कर्जदार आहेत. त्यापैकी ४० लाखांपेक्षा अधिक शेतकरी थकित कर्जदार आहेत, ज्यांना बँकांकडून पुढील कर्ज मिळणे कठीण झाले आहे.

सन २०२३-२४ मध्ये राज्यात अवकाळी पावसामुळे ८५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्राचे नुकसान झाले, ज्यामुळे हजारो कोटींचे नुकसान झाले. सोयाबीन, कांदा, बाजरी अशा पिकांना अपेक्षित बाजारभाव न मिळाल्याने शेतकऱ्यांचे उत्पादन विक्रीतच मोठे नुकसान झाले आहे. सामान्य शेतकऱ्याचा प्रति एकर उत्पादन खर्च सध्या २०-३० टक्क्यांनी वाढला असून त्यात बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचा मोठा वाटा आहे. अशा गंभीर स्थितीतही शासनाकडून कोणतीही ठोस आर्थिक मदत किंवा कर्जमाफी योजनेचा निर्णय घेतलेला नाही. उलट, काही सत्ताधारी नेत्यांची शेतकऱ्यांविषयीची वक्तव्ये अपमानास्पद ठरत आहेत. त्यामुळे बळीराजाला कोणी वाली आहे का? हा प्रश्न अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### अखंड भारत हाच पर्याय!

हीच सोनेरी संधी आहे आपला भारत पुन्हा अखंड करण्यासाठी. तेव्हा भारत सरकारने गाफील न राहता पुन्हा पाकिस्तानचे कंबरडे मोडून टाकण्यासाठी सिद्ध राहावे. आपल्या देशाचा भूभाग पाकला मिळाला तेव्हा आपल्या देशातील नेते हतबल होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजींनी म्हटले होते की, काही दिवस थांबा अखंड भारत पुन्हा आपल्या हाती येईल. पण महत्त्वाकांक्षा, सत्तालोलुपता यामुळे भारताचा काही भूभाग पाकिस्तानला मिळाला, भारताचे विभाजन झाले. पाकिस्तान नावाचे भूत उभे झाले. आता मात्र अखंड भारत हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे. पाकने जर पुन्हा वाकडे पाऊल उचलले तर पुन्हा त्याचे कंबरडे मोडावे. अखंड भारत म्हणजे हिंदूंची अस्मिता आहे, अखंड भारत म्हणजे जगाचे नेतृत्व आहे. अखंड भारत हेच आपले ध्येय असले पाहिजे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत भाविकांना मारहाणीच्या घटना वाढल्याने संताप

## पोलीस प्रशासनाला गुंडागर्दीवाले जुमानत नसल्याची शोकांतिका

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ मे -**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या परगावच्या भाविकांना स्थानिक गुंडागर्दी करणाऱ्यांकडून मारहाण करण्याच्या घटना वाढल्या असून यामुळे स्वामी भक्तांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पोलीस प्रशासनाला स्थानिक गुंडागर्दी करणारे जुमानेनात असे चित्र पहावयास मिळत आहे. अक्कलकोट शहरात भाविकांना दमदाटी करणे, मारहाणीच्या घटना वारंवार घडत असून असे प्रकार करणाऱ्या समाजकंटक गुंडांवर कारवाईची मागणी स्थानिक नागरिकांतून व स्वामीभक्तातून केली जात आहे.

अक्कलकोट तीर्थक्षेत्र नगरीत अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेण्यासाठी दररोज हजारो भाविक भक्त अक्कलकोट नगरीत येत असतात. सुट्टीच्या दिवशी तसेच पौर्णिमा , गुरुवार, शनिवार ,रविवार या दिवशी भाविक भक्तांची संख्या ही प्रचंड मोठी असते .शेकडो किलोमीटरचा



प्रवास करून परगावचे भाविक हे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोटात येत असतात. अक्कलकोट शहरात येणाऱ्या परगावच्या भाविकांना या ठिकाणी वेगळेच प्रकार पहावयास मिळत आहे. परगावच्या भाविकांना अरेरावेची भाषा , आर्थिक पिळवणूक तसेच स्थानिक समाजकंटकांकडून गुंडागिरी करून मारहाण करण्याच्या घटना वाढल्या आहेत. यामुळे भाविकांतून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. दिनांक १३ मे रोजी नाशिक येथील तिघा स्वामी भक्तांना स्थानिक गुंडागर्दी करणाऱ्यांकडून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. नाशिक येथील स्वामीभक्त उमेश पंडित साळुंके , राहुल बापू साळुंके, सुरेखा नरेंद्र साळुंके ( राहणार तळवाडे तालुका मालेगाव जिल्हा नाशिक )यांना स्थानिक टवाळखोरांकडून बेदम महारान करण्यात आल्याची घटना घडली. एक महिलेची छेड काढताना याचा जाब नाशिक येथील भक्तांनी टवाळखोर यांना विचारल्याने याचा राग आल्याने अज्ञात पाच ते सहा टवाळखोराने स्वामी भक्तांना बेदम मारहाण करून जखमी केली. ही घटना मंदिरापासून हाकेच्या अंतरावर घडली. सदरील स्वामीभक्त हे श्री स्वामी समर्थांचे दर्शन न घेताच सोलापुरातील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार घेतले. या घटनेची नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे. अशा गुंडागर्दी टवाळखोरांमुळे अक्कलकोट नगरीचे नाव खराब होत आहे .अशा घटना श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, श्री तसेच श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ परिसरात सर्रासपणे घडत आहेत. स्थानिक टवाळखोर गुंडगिरी करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाचा वचक राहिला नाही पोलीसांनी भाविकाना भिऊ नका आम्ही तुमच्या पाठिशी आहोत असे कृतीतुन दाखवणे गरजेचे आहे . एवढी मोठी घटना घडली पोलीसांची भुमीका भाविकाच संरक्षण की गुंडाची मुजरेगिरी असा संतप्त सवाल भाविकातुन व्यक्त केला जात आहे .पोलीस प्रशासनाकडून कोणतीच ठोस कारवाई होताना दिसत नाही. यामुळे राजकीय वरदहस्तांमुळे सोकाळलेले नवगुंड हे परगाव च्या भाविकांनाच मारहाण करत असल्याने अशा टवाळखोरांवर पोलीस प्रशासनाने कारवाईचा बडगा उभारावा अशी मागणी परगावच्या स्वामी भक्तातून केली जात आहे. अक्कलकोट नगरीत श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेची हमी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

## महत्वाचे...

### वांगी येथील महादेव यात्रेला सुरुवात

**मंद्रूप, दि. १५ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वांगी येथील पारंपरिक पीर-महादेव यात्रेला बुधवारी उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. महादेवाच्या मूर्तीला अभिषेक घालून संपूर्ण गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ग्रामस्थांच्या मोठ्या सहभागाने ही मिरवणूक भक्तिभावात पार पडली. मिरवणुकीनंतर महादेव मंदिर ट्रस्टच्यावतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी, गुरुवारी पीर साहेब गलिफ यांची मिरवणूक मोठ्या भक्तिभावाने पार पडली. पीर साहेब दर्ग्यावर दर्शनासाठी



सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच इतर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व जाती-धर्मांतील नागरिक एकत्र येऊन सामाजिक ऐक्याचा संदेश देत ही परंपरा जपतात. यात्रेनिमित्त वांगी गावात सध्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळत आहे.मंप्रतिनिधी - दक्षिण सोलापूर तालुक्यातील वांगी येथील पारंपरिक पीर-महादेव यात्रेला बुधवारी उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. महादेवाच्या मूर्तीला अभिषेक घालून संपूर्ण गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ग्रामस्थांच्या मोठ्या सहभागाने ही मिरवणूक भक्तिभावात पार पडली. मिरवणुकीनंतर महादेव मंदिर ट्रस्टच्यावतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी, गुरुवारी पीर साहेब गलिफ यांची मिरवणूक मोठ्या भक्तिभावाने पार पडली. पीर साहेब दर्ग्यावर दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच इतर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व जाती-धर्मांतील नागरिक एकत्र येऊन सामाजिक ऐक्याचा संदेश देत ही परंपरा जपतात. यात्रेनिमित्त वांगी गावात सध्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळत आहे.



### एसव्हीसीएस हायस्कूलचा निकाल ९५.२४ टक्के

**सोलापूर, दि. १५ मे -**

श्री.बृहन्मठ होटगी संचालित, एसव्हीसीएस हायस्कूल, होटगी येथील फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या एस.एस.सी.परीक्षेत प्रशालेचा निकाल ९५.२४ टक्के लागला.विद्यार्थ्यांनी प्रशालेच्या यशाची परंपरा कायम ठेवून घवघवीत यश संपादन केले. प्रशालेतील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थी खालील प्रमाणे नदाफ शाहबाज कासीम ८६.०० टक्के, बिराजदार पोर्णिमा महादेव ८५.६०* टक्के. जाधव वैभव मलिक. ८४.४० या यशाबद्दल काशीपिठाचे जगद्गुरु श्री. श्री. श्री.१००८ डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, होटगी मठाचे मठाधिपती श्री. चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी संचालक शशिकांत रामपूरे, शिवानंद पाटील, प्राचार्य नंदकुमार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने, तंत्रविभाग प्रमुख केदार गंगदे, सर्व शिक्षक शिक्षिका यानी यशस्वी विद्यार्थ्यांचें अभिनंदन केले.

### डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलचा निकाल ९१ टक्के

**सोलापूर, दि. १५ मे -**

फॉरेस्ट येथील डॉ. आंबेडकर मेमोरियल फंड समिती संचलित डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलचा मार्च २०२५ चा एस.एस.सी बोर्डाचा निकाल ९१ टक्के लागला आहे. यशाची ही परंपरा हायस्कूलने कायम राखली आहे. यामध्ये वैष्णवी सुभाष आयवळे ८०.४० टक्के, कु. देवयानी राम सर्जेराव ७३.२० टक्के, बीबीआयेशा गुलामरसुल शेख - ६६.२० टक्के गुण मिळविले आहेत. संस्थेचे अध्यक्ष भागवत सरवदे, सचिव प्रविण निकाळजे, स्कूल कमिटी चेअरमन बबन साबळे व संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि प्रशालेच्या मुख्याध्यापिका संतोषी साबळे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# संत साहित्य सेवा संघाचे पुरुषोत्तम पुरस्कार व सांगाती पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे -**

संत साहित्य सेवा संघातर्फे देण्यात येणाऱ्या पुरुषोत्तम पुरस्कारासाठी प्रा.डॉ श्रुती श्री वडगबाळकर तसेच सांगाती पुरस्कारासाठी ह.भ.प.श्री.सूर्यकांत लक्ष्मण धोत्रे ह्यांची निवड करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सु. स. देशमुख आणि कोषाध्यक्ष रमेश विश्वरूपे ह्यांनी दिली.

ज्येष्ठ पत्रकार आणि निरुपणकार विवेक घळसासी ह्यांच्या हस्ते बुधवार २८ मे रोजी सायंकाळी सहा वाजता ज्ञान प्रबोधिनी उपासना मंदिर, डफरिन चौक येथे पुरस्कार प्रदान समारंभ संपन्न होणार आहे. संत साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी प्रतिवर्षी संस्थेतर्फे पुरुषोत्तम पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे हे पंधरावे वर्ष आहे. मानपत्र, सन्मान निधी रु अकरा हजार आणि शाल असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेल्या प्रा.डॉ. श्रुती श्री वडगबाळकर ह्यांनी विविध वृत्तपत्रात संत साहित्य विषयक लेख लिहिले आहेत. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी स्त्री संतांच्या जीवनावर त्यांनी व्याख्याने दिली आहेत. आजपर्यंत स्त्री संत आणि अध्यात्मिक विषयांवरील त्यांची सहा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. संस्थेच्या वतीने ह्या वर्षीपासून ''संतसेवा-सातत्य -निष्ठा'' ह्यांच्या सन्मानार्थ वै दा.का.तथा भाऊ थावरे आणि वै विजयाताई दा.थावरे स्मृतिप्रीत्यर्थ सांगाति पुरस्कार देण्यात येणार असून त्यासाठी ह.भ.प. श्री सूर्यकांत लक्ष्मण धोत्रे ह्यांची निवड करण्यात आली आहे. सन्मान चिन्ह, सन्मान निधी रु अकरा हजार आणि शाल असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सूर्यकांत धोत्रे हे निवृत्त शासकीय अधिकारी असून गेली ४५ वर्षे पंढरीची महिन्याची वारी करीत आहेत.सोलापूरच्या लक्ष्मण महाराज धोत्रे घराण्याशी ते निगडीत आहेत. लेखन, पारायण माध्यमातून ते अनेक वर्षे निष्ठेने संत सेवा रुजू करीत आहेत.




# नागेश करजगी ऑर्किड स्कूलच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे -**

सोलापूर जिल्ह्यातील सीबीएसई अभ्यासक्रम शैक्षणिक क्षेत्रात सोलापूर पॅटर्न चे नाव असलेले व गुणवंताची खाण असलेल्या सोनाशंकर ज्ञान विकास ट्रस्ट च्या नागेश करजगी ऑर्किड स्कुलच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेत घवघवीत असे यश संपादन केले.यानिमित्ताने यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा गुणगौरव सत्कार सोहळा शाळेच्या वतीने पार पडला.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांना कष्टाने शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या पालकांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार करजगी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सचिवा वर्षाताई विभुते, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे, ज्यू.कॉलेजच्या प्राचार्या स्मिता कुलकर्णी, आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास शाळेतील सर्व गुणवंत विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी योग्य पालकत्व निभावून आपल्या मुलांना योग्य शिक्षण दिले,त्यांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी प्रोत्साहित केले म्हणून, या यशस्वी विद्यार्थ्यांच्या समवेत त्यांच्या पालकांचा देखील सन्मान यावेळी करण्यात आला.या उपक्रमाचे पालकवर्गातून मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले. यंदाच्या परीक्षेत शाळेतील ईश्वरी तावरे, त्रिशा भंडारी, वैष्णवी होलेपाटील, नील श्रीराम, माहीर पटेल, वरद मालानी, संकीत मखाना,सिद्धी साठे ,सुशील शिवशरण, काव्या कोठारी, रेवती भोजने, साहिल शेख, ईश्वरी वांगी, सृष्टी ढोकरे, आयुष बिराजदार, श्रीजीत कलानी,कार्तिकी गायकवाड,प्रथमेश जाधव, चैतन्या भंडारी या विद्यार्थ्यांनी ९०% च्यावर गुण घेऊन शाळेची गुणवत्ता व नावलौकिक वाढवीला. यासर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्राचार्या रुपाली हजारे यांनी अभिनंदन केले व त्यांना भविष्यातील वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील नववी व दहावीचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सोलापुरात विविध ठिकाणाहून रेस्क्यू केलेल्या जखमी घारींना मिळाले जीवदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे -**

पार्क चौक, होम मैदान व बाळे परिसरात जखमी अवस्थेत रेस्क्यू केलेल्या तीन घारींना वनविभागाच्या केंद्रात उपचारानंतर निसर्गात मुक्त करण्यात आले.




फडकुले सभागृहाजवळील शॉपिंग सेंटर येथे एक घार जखमी अवस्थेत पडली असल्याचा फोने अजित चौहान यांना आला होता, त्यांनी त्या घटनास्थळी जाऊन त्या घारीला रेस्क्यू करून वन विभागाकडे उपचारासाठी सुपूर्द केले होते. तसेच होम मैदानाजवळील श्री सिद्धेश्वर प्रशालेजवळ एक जखमी घार आढळून आली होती त्याला शिवानंद हिरेमठ यांनी रेस्क्यू करून वन विभागाकडे उपचारासाठी दाखल केले होते. तसेच बाळे परिसरात सुरेश क्षीरसागर यांनी एक जखमी झालेली घार उपचारासाठी वनविभागाच्या केंद्रात दाखल केली होती. या सर्व घारींना योग्य उपचारानंतर त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले. वनविभाग प्रादेशिक अजित शिंदे व वन्यजीव विभागाचे रोहितकुमार गांगर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या बचाव कार्यात वाहनचालक मुन्ना निरवणे व प्रवीण जेऊरे यांनी सहभाग घेतला.

# अ.भा.सफाई मजदूर कॉंग्रेसचे नूतन प्रदेशाध्यक्ष बाली मंडेपु सफाई कामगारांचा लढा राष्ट्रव्यापी करतील

## ॲड. रा.गो. म्हेत्रस, दत्ता गायकवाड यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ (प्रतिनिधी) -**

सफाई कामगारांच्या आयुष्यात अजूनही स्वातंत्र्यची पहाट उगवलेली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्यघटनेने त्यांना दिलेले अधिकार त्यांच्यापर्यंत पोहोचु दिले जात नाहीत. उलट कायद्यात बदल करून त्यांना अधिकारापासून वंचित ठेवले जात आहे, अश्या स्थितीत सोलापुरच्या बाली मंडेपु यांच्याकड़े संघटनेचे प्रदेशाध्यक्ष आले असून सफाई कामगारांच्या प्रश्नांना ते राष्ट्रीय पातळीवर मांडून हा काटेरी मुकुट लीलया सांभाळतील, असा विश्वास जेष्ठ कामगार नेते ॲड. रा. गो. म्हेत्रस आणि आंबेडकर विचारवंत दत्ता गायकवाड़ यांनी व्यक्त केला.

येथील निर्मलकुमार फड़कुले सभागृहात आयोजित केलेल्या भव्य नागरी सत्कार सोहळयात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी मंचावर जेष्ठ विचारवंत एम. आर. कांबळे, मिल्ली कौन्सिलचे राष्ट्रीय उप महासचिव निजमोद्दीन शेख, कामगार नेते अशोक इंदापुरे, अशोक जानराव, चतुर्थ श्रेणी कामगार संघटनेचे माजी अध्यक्ष आशुतोष नाटकर, अजित बनसोडे, दत्ता थोरे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.




सफाई कामगारांच्या प्रश्नांसाठी गेल्या सहा दशकांपासुन लढ़ा देणाऱ्या अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस या राष्ट्रीय संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल एड. रा. गो. म्हेत्रस यांच्या हस्ते बाली मंडेपु यांचा सोलापुर वाशियांच्या वतीने मानपत्र, शाल, हार आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

ॲड. म्हेत्रस यांनी कामगार कायद्यात केले गेलेले बदल हे कामगरांची मुस्कटदाबी आणि शोषण करणारे असल्याचा गंभीर आरोप केला. ते म्हणाले, जग सुंदर ठेवण्याचे काम करणारे सफाई कामगार हे सफाईवाले असले तरी ते आरोग्य सेवेशी संबधित आहेत. जर स्वछता बंद झाली तर जनारोग्य बिघडेल. त्यामुळे सफाई कामगारांना आरोग्यसेवक नाम देऊन आरोग्य या अत्यावश्यक सेवेचा दर्जा मिळायला हवा, अशी मागणीही त्यांनी केली.

दत्ता गायकवाड़ यांनी कॉंग्रेस काळात रेल्वेतील चतुर्थ श्रेणी ही श्रेणीच नष्ट केल्याचे सांगून कोणतीही सरकारे आली तरी कामगारांचा संघर्ष थांबणारा नसल्याचे सांगितले. यावेळी अशोक इंदापुरे यांनी एकटया सोलापुर महापालिकेत साडेतीनशे सफाई कामगारांच्या वारसांच्या नियुक्त्या प्रलंबित असून राज्यभरात हा आंकड़ा हजारोंच्या संख्येत असल्याचे सांगितले. यावेळी अशोक जानराव, निजमोद्दीन शेख, आशुतोष नाटकर आदिनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी दत्ता थोरे यांनी प्रास्ताविक केले. दशरथ अड़ाकोल्लू यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर युवराज माने यांनी आभार मानले.

श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर
६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्ताचे जाहिर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार , विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली.,सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक ०४/०३/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार केदार महादेव हदरे प्रोप्रा केदार महादेव हदरे रा.१) मु.पो. संगदरी ता. दक्षिण सोलापूर २) आय.१५४, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर व जामीनदार १) श्रीशैल शरणप्पा माळी रा.फ्लॅट न.२, गौरी अपार्टमेंट, बलदवा नगर, शेळगी, सोलापूर २) विंजय दौलप्पा बिराजदार रा.११,मित्र नगर, शेळगी, सोलपुर यांना पाठवून रक्कम रुपये २५,३६,३३२/- या वर दिनांक ०१/०८/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम ची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| अं. क्र. | कर्जदाराचे व जामीनदार यांचे नाव व पत्ता | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | ३१/०३/२०२५ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार-** **केदार महादेव हदरे प्रोप्रा केदार महादेव हदरे** रा.१) मु.पो. संगदरी ता. दक्षिण सोलापूर २) आय.१५४,श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर **जामीनदार-** **१.श्रीशैल शरणप्पा माळी** रा.फ्लॅट न.२,गौरी अपार्टमेंट,शेळगी,सोलापूर **२. विंजय दौलप्पा बिराजदार** रा.११, मित्र नगर,शेळगी,सोलपूर | केदार महादेव हदरे यांचे मालकी व वहिवाटीची मौजे बोरामणी ता. दक्षिण सोलापूर येथील गट क्र. ४४२ क्षेत्र ००.७९ हे.आर व पो.ख. ०.०१ हे.आर. आकार रु. ०.६७ | रु. ३०,८४,७६२/- | रु. ३८,११,७३८/- दि.०१.०४.२०२५ अखेर होणारे पुढील व्याज, दंडव्याज व इतर खर्च |
| | लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली.,सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक -१६/०६/२०२५ वेळ - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत निविदा उघडण्याची वेळ सायंकाळी ५:०० वाजता | | |

टिप-
१. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि.१३/०६/२०२५ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

दिनांक : १५/०५/२०२५
स्थळ : सोलापूर

सही/-
विशेष वसुली व विक्री अधिकारी
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### टीम सौदी इंग्लंडचा तज्ज्ञ सल्लागार नियुक्त

**लंडन** : न्यूझीलंडचा माजी वेगवान गोलंदाज टीम सौदीला भारताविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेच्या शेवटी इंग्लंडने तज्ज्ञ सल्लागार म्हणून नियुक्त केले आहे, अशी घोषणा इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ईसीबी) केली आहे. भारतीय संघ २० जूनपासून लीड्समधील पहिल्या कसोटीसह इंग्लंडच्या दौऱ्याची सुरूवात करेल. हा दौरा ३१ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान ओव्हल येथे पाचव्या कसोटीसह संपेल. डिसेंबर २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेला सौदी इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय सत्राच्या सलामीच्या सामन्यापूर्वी संघात सामील होईल. ३६ वर्षीय सौदीने १०७ कसोटी सामन्यात ३९१ गडी बाद केले आहेत. १६१ एकदिवसीय सामन्यात २२१ आणि १२६ टी-२० सामन्यांत १६४ गडी टिपले आहेत. ईसीबीने निवेदनात म्हटले आहे की, जगभरातील विविध परिस्थितींमध्ये आणि त्याच्या अनुभवात खेळण्याचा इंग्लंडच्या खेळाडूंना लाभ होईल.

### उन्नती हुड्डा, मालविका बन्सोडसह भारताचे आव्हान संपुष्टात

**बँकॉक** : एलिट इंटरनॅशनल बॅडमिंटन स्पर्धेमधील भारताची निराशाजनक कामगिरी चालूच राहिली आणि थायलंडमधील ओपन सुपर ५०० स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात आले. जागतिक दहाव्या क्रमांकाची महिला जोडी त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांच्यासह सर्व भारतीय खेळाडू स्पर्धेतून बाहेर पडले. दुसऱ्या फेरीत जपानची रुई हिरोकामी आणि सयाका होब्रा यांनी त्रिशा आणि गायत्री यांना पराभूत केले. लक्ष्य सेन पुरुषांच्या एकेरीत पहिल्या फेरीत बाहेर पडला. ओडिशा मास्टर्स २०२२ आणि अबू धाबी मास्टर्स २०२३ विजेती उन्नती हुड्डाला थायलंडच्या अव्वल मानांकित पोर्नपवी चोचुव्हॉंगने पराभूत केले. मालविका बनसोडला थायलंडची माजी विश्वविजेती रिचॅनोक इंटॅनोनने पराभूत केले. यावर्षी बीडब्ल्यूएफ जागतिक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतातील कोणत्याही खेळाडूने अंतिम फेरी गाठली नाही.

### २१ मे पासून राष्ट्रीय नेमबाजी निवड चाचणी

**नवी दिल्ली** : शॉटगन इव्हेंट्स (ट्रॅप आणि स्कीट) साठी निवड चाचण्या अनुक्रमे २१ मे ते १ जून या कालावधीत नवी दिल्ली आणि भोपाळ येथे होतील, असे नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया (एनआरएआय)ने गुरुवारी जाहीर केले. आयएसएसएफ विश्वचषक (इटली आणि ग्रीस), १६ व्या आशियाई चॅम्पियनशिप (कझाकस्तान), आयएसएसएफ ज्युनियर वर्ल्ड कप (भारत - सप्टेंबर) आणि तृतीय आशियाई युवा खेळ (भारत -सप्टेंबर) या दोन आयएसएसएफ विश्वचषक (इटली आणि ग्रीस) स्पर्धेसाठी भारतीय संघ निवडीसाठी या चाचण्या आयोजित केल्या जात आहेत.२१ ते २६ मे या कालावधीत डॉ. कर्णी सिंह शूटिंग रेंजमध्ये राष्ट्रीय निवड चाचणी होणार आहे. ट्रॅप स्पर्धेच्या चाचण्या २४ ते २६ मे दरम्यान आयोजित केल्या जातील. भोपाळमधील मध्य प्रदेश राज्य शूटिंग अकॅडमी येथे १ ते ८ जून या कालावधीत राष्ट्रीय निवड चाचणी ३ आयोजित केली जाईल.

### निहाल सरीन बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय स्थानी

**अल ॲन (संयुक्त अरब अमिराती)** : भारताचा अव्वल मानांकित ग्रॅण्डमास्टर निहाल सरीनन गुरुवारी एशियन वैयक्तिक ओपन बुद्धिबळ स्पर्धेत अंतिम फेरीत सलग चौथा विजय मिळविला. निहालने दानेश्वरसोबत सात गुण मिळवले, परंतु इराणी खेळाडूने भारतीय खेळाडू निहालला टायब्रेकरसह पुढे स्थान मिळवून विजेतेपद जिंकले. निहालने संथ सुरुवात करून चमकदार कामगिरी केली आणि रौप्यपदक जिंकले आणि या वर्षाच्या शेवटी नवी दिल्लीत होणाऱ्या जागतिक बुद्धिबळ चषक स्पर्धेत त्याचे स्थान मजबूत केले. एलआर श्रीहरीने आपला शेवटचा ग्रॅण्डमास्टर सर्वसाधारणपणे साध्य केला आणि तो देशाचा ८६ वा ग्रॅण्डमास्टर बनला. महिलांच्या स्पर्धेत मंगोलियाच्या मुंगुंजुल बॅट-एर्डिनला पराभूत करूनही वांटीका अग्रवालने अंतिम फेरी गमावली. इतर भारतीयांपैकी श्रीजा सेशाद्रीने रशियाच्या व्हॅलेंटिना गनिनाबरोबर बरोबरी साधली.

### बीसीसीआय बांधणार ऑलिम्पिक प्रशिक्षण केंद्रे

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळ क्रीडा मंत्रालयाच्या महत्त्वाकांक्षी योजनेत दोन ते तीन ऑलिम्पिक खेळ घेण्यास तयार आहे. त्यानुसार कॉर्पोरेट सहभागाने देशात ऑलिम्पिक केंद्रे स्थापन करण्याची योजना आहे आणि या योजनेवर या वर्षी काम सुरू होईल. गुरुवारी क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांच्यासोबत झालेल्या बैठकीत बीसीसीआयने हा प्रस्ताव मांडला. या बैठकीत कॉर्पोरेट जगतातील ५८ प्रतिनिधींनी भाग घेतला. क्रीडा मंत्रालयातील एका सूत्राने सांगितले की, ऑलिम्पिक खेळांच्या विकासासाठी कॉर्पोरेट जगताचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आयोजित एका महत्त्वाच्या बैठकीत, जपानच्या धर्तीवर देशात ऑलिम्पिक केंद्र उघडण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया येथील ऑलिम्पिक केंद्रांकडून प्रेरणा घेऊन मंत्रालयाने अनेक ऑलिम्पिक पदक विजेते निर्माण केले आहेत.

# खेलो इंडियात महाराष्ट्राची विजेतेपदाची हॅट्ट्रिक

## ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य पदकांसह १५८ पदकांची लयलूट



विजेतेपदाची हॅट्ट्रिक करणारा महाराष्ट्र संघ

**पाटणा, १५ मे**

गतविजेत्या महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत खेलो इंडिया युवा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाच्या हॅट्ट्रिकचा पराक्रम केला. ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने अव्वल स्थान पटकावले. तब्बल ९ स्पर्धा विक्रमांचा पराक्रमही महाराष्ट्राने यंदाच्या ७व्या खेलो इंडिया स्पर्धेत केला आहे.

पाटलीपुत्र क्रीडा संकुलातील समारोप समारंभात बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी व केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला विजेतेपदकाचा करंडक देऊन गौरविण्यात आले. पथकप्रमुख महादेव कसगावडे, सहायक संचालक भाग्यश्री बिले, क्रीडाधिकारी अरुण पाटील, शिवाजी कोळीसह मराठमोळ्या खेळाडूंनी विजेतेपदाचा करंडक स्वीकारला. करंडक स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राच्या जयघोषाने परिसर दुमदुमला.

खेलो इंडिया स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना राष्ट्रीय व्यासपीठ निर्माण झाले आहे असे सांगून केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाल्या की, स्पर्धेत माझ्या महाराष्ट्राने सर्वाधिक पदके जिंकली याचा मला आनंद आहे. मध्यप्रदेश, तामिळनाडू पाठोपाठ बिहारमध्येही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वाधिक पदकांचे शिखर पूर्ण करीत विजेतेपद पटकाविले. महाराष्ट्राच्या पदक विजेत्या खेळाडूंचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे, सहसंचालक सुधीर मोरे यांनी दृक्-श्राव्य प्रणालीव्दारे अभिनंदन केले.

बिहार स्पर्धेत महाराष्ट्राने ९ स्पर्धा विक्रमाची नोंद केली. वेटलिफ्टिंग अस्मिता ढोणेने २, साईराज परदेशीने ३, ॲथलेटिक्समध्ये सैफ चाफेकर, रोहित बिन्नार, आदित्य पिसाळ व रिले संघाने प्रत्येकी १ असे एकूण ९ स्पर्धा विक्रम प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या नावापुढे झळकले आहेत.

अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत अव्वल स्थान कायम राखले. हरयाणाने ३९ सुवर्ण, २७ रौप्य, ५१ कांस्य पदकांसह एकूण ११७ पदके जिंकून दुसरे स्थान प्राप्त केले. स्पर्धेतील २७ पैकी २२ क्रीडाप्रकारांमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांचा करिश्मा घडविला.

ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक १० सुवर्णपदकांना गवसणी घातली, तर जलतरणात ७ सुवर्णासह एकूण २९ पदके कमविली. जिम्नॅस्टिक्समध्ये ६, आर्चरीत ६, वेटलिफ्टिंगमध्ये ५ सुवर्णपदके महाराष्ट्राने पटकावली. कुस्ती, सायकलिंग, नेमबाजीत महाराष्ट्राने सुवर्ण चौकार झळकविला. स्पर्धेत ४३७ खेळाडूंसह १२८ प्रशिक्षक, व्यवस्थापक असे एकूण ५६५ जणांचे पथक सहभागी झाले होते. (वृत्तसंस्था)

# कुस्तीत महाराष्ट्राला सात पदके

### आयुषा, सुजयकडून सुवर्णसांगता

### २ सुवर्ण, १ रौप्य, ४ कांस्य पदके

### ७ वी खेलो इंडिया युवा स्पर्धा

**पाटणा, १५ मे**

महाराष्ट्राच्या कुस्तीगिरांनी २ सुवर्णपदकांसह ७ पदकांची लयलूट करीत ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेची सुवर्ण सांगता केली. महाराष्ट्राच्या आयुषा गाडेकर व सुजय तनपुरे यांनी सुवर्णपदक जिंकून आखाडा गाजविला. स्पर्धेत १८ पदकांची लयलूट करीत सर्वसाधारण उपविजेतेपदही महाराष्ट्राच्या संघाने पटकावले.

ज्ञानभवन सांस्कृतिक हॉलमध्ये संपलेल्या कुस्ती आखाड्यात महाराष्ट्राचा दबदबा शेवटच्या दिवशीही कायम होता. २ सुवर्ण, १ रौप्य, ४ कांस्य अशी एकूण ७ पदकांची कमाई महाराष्ट्राने केली. कुस्ती स्पर्धेला भेट देत पदकविजेत्या कुस्तीगिरांचे पथकप्रमुख महादेव कसगावडेसह अरुण पाटील, शिवाजी कोळी यांनी अभिनंदन केले.

मुलींच्या फ्रीस्टाईल ५७ किलो गटात वाशीमच्या आयुषा गाडेकरने चीतपट कुस्तीचे प्रदर्शन घडवीत सुवर्णपदक पटकावले. हरयाणाच्या अंशुलविरुद्ध सुरुवातीपासून आयुषाने आक्रमक लढत दिली. मुंबईत साईच्या कुस्ती केंद्रात सराव करणाऱ्या आयुषाने पहिल्याच खेलो इंडिया स्पर्धेत पदकाचा करिश्मा घडविला. १५ वर्षांखालील आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या आयुषाने लौकिकाला साजेसा खेळ करीत सुवर्ण कामगिरी केली.



कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्राचे पदक विजेते

फ्रीस्टाईलच्या ७१ किलो गटात अहल्यानगरच्या सुजय तनपुरेने चंदीगडच्या सुशांत वशिष्ठला ६-० गुणांनी मात करीत पदार्पणातच खेलो इंडियाच्या सुवर्णयशाला गवसणी घातली. पहिल्या फेरीत २-० गुणाने आघाडी घेत सुजयने आपले वर्चस्व दाखवले. दुसऱ्या फेरीत आक्रमण करीत एकतर्फी लढत जिंकली.

मुलांच्या ग्रीको रोमन प्रकारातील ६० किलो गटात कोल्हापूरच्या ऋषिकेश नाईक, चुरशीच्या अंतिम फेरीत दिल्लीच्या प्रांजल दाहियाकडून पराभूत व्हावे लागले. पहिल्या फेरीत ०-५ गुणांनी प्रणव मागे होता. दुसऱ्या फेरीत भारद्वाज डावावर ५-५ बरोबरी करीत ऋषिकेशने लक्षवेधी कुस्तीचे प्रदर्शन घडवले. शेवटच्या मिनिटाला प्रांजल दाहियाने तुफानी कुस्ती करीत ऋषिकेशला ५-९ गुणांनी पराभूत केले.

मुलींच्या ६५ किलो फ्रीस्टाईल गटात सृष्टी करे हिने कर्नाटकच्या प्रतीक्षा भोवीला चीतपट कर[...] कांस्यपदक पटकावले. साताऱ्याच[...] सृष्टीचे हे खेलो इंडिया स्पर्धेती[...] पहिलेच पदक आहे.

फ्रीस्टाईल ६० किलो गटाती[...] कांस्यपदकाच्या लढतीत मध्यप्रदेश[...] यश जाधव गैरहजर राहिल्याने प्रण[...] मोरेला विजयी घोषित करण्यात आ[...] ग्रीको रोमन ९२ किलो गटात सू[...] जामदारने राजस्थानच्या कुना[...] आर्चायाला चीतपट करीत कां[...] पदकावर नाव कोरले. याच गट[...] पंजाबच्या वंशदीप सिंग[...] महाराष्ट्राच्या हर्ष ठाकरेने ७-[...] गुणांनी मात करीत कांस्य पदका[...] यश संपादन केले. (वृत्तसंस्था)

# सोलापूर स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटची 'ऑर्चिड' वर मात

### किरण पवार चषक १९ वर्षांखालील क्रिकेट : गौरव गायकवाड सामन्याचा मानकरी

**सोलापूर, दि. १५ मे-**

किरण पवार चषक १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत सोलापूर स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट संघाने ऑर्चिड संघावर १६८ धावांनी मात केली. अष्टपैलू कामगिरी करणारा गौरव गायकवाड (४८ धावा व ५ बळी) सामन्याचा मानकरी ठरला. सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन व डॅनिश केक पुरस्कृत स्पर्धा जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरू आहे.

गुरुवारी झालेल्या सामन्यात सोलापूर स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटने प्रथम फलंदाजी करताना ३६.२ षटकांत सर्व बाद २९१ धावा केल्या. त्यामध्ये समर्थ कोळेकर (९४), महेंद्र गाडेकर (४८), गौरव गायकवाड (४८) व ओम जोशी (३२) यांनी फलंदाजी कामगिरी केली. गोलंदाजीत ऑर्चिडकडून प्रवीण अहिवळे याने ४७ धावांत व प्रतीक कांबळे याने ४८ धावांत प्रत्येकी तीन बळी टिपले. विजयी २९१ धावांचे लक्ष्य ऑर्चिड संघास पेलवले नाही. त्यांचा डाव सोलापूर स्पोर्ट्सने १२३ धावांत गुंडाळला. ऑर्चिडच्या दिग्विजय गवळी याने नाबाद २९ व प्रवीण अहिवळे याने ३६ धावा केल्या. सोलापूर स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटकडून गौरव गायकवाडने १७ धावांत पाच बळी टिपले. महेंद्र गाडेकर व समर्थ धोरणाल यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.




## खेलो इंडिया यूथ गेममध्ये अरणच्या सुजल रणदिवे यास ब्राँझ

**सोलापूर, दि. १५ मे-**

बिहार येथे झालेल्या ७व्या खेलो इंडिया यूथ गेम स्पर्धेत रग्बी या खेळात महाराष्ट्राने ब्राँझ पदक पटकाविले. तृतीय स्थानाच्या लढतीत महाराष्ट्राने दिल्लीचा १२ विरुद्ध ५ गुणानी पराभव केला. यात अरणच्या सुजल रणदिवे याचा समावेश होता. त्याचा सोलापूर जिल्हा रग्बी संघटना व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा क्रीडा आधिकारी नरेंद्र पवार, रग्बी संघटनेचे सचिव इक्बाल शेख, शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे सचिव दशरथ गुरव, क्रीडा शिक्षक संजय शिंदे, क्रीडाधिकारी नदीम शेख, सुप्रिया गाढवे धनंजय धेंडे,मनोज बाळगे उपस्थित होते.

# अखेर शासनाच्या खोखो व कबड्डी प्रशिक्षण शिबिरास सुरुवात

### ॲथलेटिक्स शिबिर ५ मे पासून, परंतु खेळाडूंना सकस नाश्ता १५ पासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे -**

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने २० मे पर्यंत आयोजित केलेल्या नऊ खेळाचे प्रशिक्षण शिबिर पाच मे पासून सुरू झाल्याचे जाहीर करण्यात आले होते. परंतु खो-खो व कबड्डीचे प्रशिक्षण शिबिर सुरू नव्हते. याबाबतचे वृत्त दैनिक तरुण भारत मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर ११ मे पासून खो खो चे प्रशिक्षण शिबिर जिल्हा क्रीडा कार्यालयात नुकतीच सरळ सेवेतून नियुक्ती केलेली राष्ट्रीय खेळाडू मयुरी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. कबड्डीचे प्रशिक्षण १४ मे पासून जिल्हा कबड्डी संघटनेचे प्रशिक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. तत्पूर्वी ५ मे पासून जिल्हा क्रीडा संकुल येथे दत्तात्रय वरकड व सूर्याजी लिंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मैदानी खेळाचे प्रशिक्षण शिबीर सुरू झाले. परंतु या सर्वच खेळाडूंना सकस नाश्ता मिळत नव्हता. अखेर सकस नाष्टाही गुरुवारी १५ मे पासून मैदानी, खो-खो व कबड्डीच्या खेळाडूना सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे शिबिरार्थी खेळाडू आनंदी दिसत होते. यावेळी या प्रशिक्षण शिबिराचे निरीक्षण करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार हे मैदानावर उपस्थित होते.



तरुण भारत IMPACT

# कुस्ती मैदानात अमित जगदाळेने सुनील जाधवला हरविले

**वैराग, दि १५ मे-**

ईर्ले-इर्लेवाडी (ता. बार्शी) येथे बौद्ध पौर्णिमाला ग्रामदैवत विठ्ठल बिरुदेवाची यात्रेनिमित्ताने झालेल्या कुस्ती मैदानात अमित जगदाळेने सुनील जाधवला हरविले. प्रथम क्रमांकाच्या या कुस्ती मैदानासाठी जगदाळे यास ७५ हजार रुपये व चांदीची गदा देण्यात आली .स्वप्निल देवकते, दत्तात्रय डुरे व मित्रपरिवार यांच्या सहकार्याने या कुस्ती फडाचे आयोजन केले होते.

बिरोबा हे देवस्थान जागृत देवस्थान म्हणून त्याची ख्याती आहे. इर्ले -इर्लेवाडी या दोन्ही गावात पालखी मिरवणूक निघते यात्रेची सांगता कुस्तीच्या फडाने झाली. ५१ हजार रुपयांच्या द्वितीय कुस्तीमध्ये श्रीपाद ढेकळेने (कुर्डूवाडी) कंदरच्या भैय्या धुमाळला हरविले. तृतीय



क्रमांकाच्या कुस्तीमध्ये पैलवान रणजीत सोनावणेने प्रवीण वाडेकरला नमविले. त्यास २५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. पारितोषिके वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, गोपनीय विभागाचे किसन कोलते तसेच पत्रकार बलभीम लोखंडे यांच्या हस्ते देण्यात आली.

# खुल्या गटात मानस गायकवाड विजेता



## जीएच रायसोनी मेमोरियल चषक

**सोलापूर, दि.१४ मे -**

'जीएच रायसोनी मेमोरियल चषक' बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात सोलापूरच्या मानस गायकवाड याने ६.५ गुण व सरस बोकोल्स गुणावर विजेतेपद, चषक व रोख रु ७००० चे पारितोषिक पटकाविले. पुण्याच्या ओम लामकाने याने ६.५ गुणांसह द्वितीय क्रमांक व रोख रु. ५००० प्राप्त केले. तसेच बार्शीचा शंकर साळुंकेने तिसरा, पुण्याचा आंतरराष्ट्रीय कँडिडेट मास्टर प्रथमेश शेरलाने चौथा व लातूरचा अथर्व रेड्डीने उल्लेखनीय खेळत पाचवा क्रमांक मिळविला.

जीएच रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन, कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशन व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजीतउं फाउंडेशनचे सचिव भूषण श्रीवास यांनी या स्पर्धा प्रायोजित केल्या आहेत. जुळे सोलापूर येथील टाकळीकर मंगल कार्यालय येथे झालेल्या या स्पर्धेत १५ वर्षाखालील गटात ओम चीनगुंडे याने तर खुल्या गटात मुलीत सृष्टी गायकवाड हिने अव्वल क्रमांक पटकाविला. ११ वर्षाखालील मुलांच्या गटात विहान कोंगारी, श्रेयस कुदळे तसेच मुलींच्या गटात सृष्टी मुसळे व संस्कृती जाधव यांनी उत्कृष्ट खेळ करत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त केला. चौघांचीही अकरा वर्षाखालील राज्यस्तरीय अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. ८ वर्षाखालील गटात मुलांमध्ये नमन रंगरेज व मुलीत तनवी बागेवाडी यांनी सुरेख खेळ करत जेतेपद पटकाविले.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण गायनोलॉजिस्ट डॉ. शिरीष कुमठेकर यांच्या अध्यक्षतेखाली टाकळीकर मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये, संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले. स्पर्धेत मुख्य पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, वरिष्ठ राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा, प्रशांत पिसे, भरत वडीशेरला, अभिजीत बावळे, यश इंगळे, रुपाली कोरे यांनी यशस्वीरीत्या काम पाहिले.

विजेत्या खेळाडूंना आकर्षक चषक, मेडल्स व रोख पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. विजेत्या ७५ खेळाडूंना एकूण रु. ४१ हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली. विजेत्या खेळाडूंचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, नामवंत उद्योजक रवींद्र जयवंत, नितीन काटकर, प्रशांत गांगजी, गोपाळ राठोड आदींनी अभिनंदन केले.

## विविध वयोगटात ओम, सृष्टी, विहान, मुसळे, नमन व तनवी विजेते

**अंतिम निकाल (अनुक्रमे गुण व बोकोल्स गुणांसह):**

**खुला गट :** मानस गायकवाड- ६.५(३१.५), ओम लामकाने - ६.५(३०), शंकर साळुंके ६, प्रथमेश शेरला - ५(३१), अथर्व रेड्डी - ५(२९), वरद लिमकर - ५(२९), अमोल वाघमोडे - ५(२८), प्रज्वल कोरे - ५(२८), स्वप्नील हदगल - ५(२७), सार्थक हुडे - ५(२४), हर्ष हलमल्ली- ४.५(२७.५), अरित्र दास - ४.५(२५.५), महेश कारंजकर - ४.५(२४.५), तनिष्क शहा - ४(२८.५), सागर गांधी - ४(२८)

**उत्कृष्ट मुली:** सृष्टी गायकवाड - ५(२७.५), सान्वी गोरे - ५(२४.५), श्रावणी देवनपल्ली - ४(२५.५), स्वराली हातवळणे - ४(२४), तनिष्का जाधव - ४(२३.५), कृष्णा डोंगरे - ३.५, प्राप्ती तोडकर - ३(१९), ऋतुपर्ण विजागत -३(१९), नवीना वडिशेरला- ३(१७), फराह शेख - २(२२.५)

**१५ वर्षे वयोगट:** ओम चिनगुंडे - ५(२५.५), श्रेया संदूपटला- ५(२४), वेदांत मुसळे - ५(२३), श्लेष उदगीरी- ४(२५.५), मल्हार वाघे - ४(२४.५), शंभूराज कन्हेरे - ४(२४), युवराज गायकवाड - ४(२२), अन्वय कुलकर्णी - ४(२२), श्रीवीर जिल्ला- ४(२१.५), वेद आगरकर ४ (२०.५)

**११ वर्षे मुले:** विहान कोंगारी - ५.५, श्रेयस कुदळे - ५(२३.५), शशांक जमादार - ५(२०), श्रेयस इंगळे - ४.५(२०.५), देवराज कन्हेरे - ४.५(१९.५), वेदांत पांडेकर - ४(२२), ओम राऊत - ४(२१.५), नैतिक होटकर - ४(१९.५), विवान दासरी- ४(१९), हर्ष जाधव - ४.५(१८)

**११ वर्षे मुली:** सृष्टी मुसळे - ४(१५), संस्कृती जाधव - ४(१३.५), अन्वी गर्जे - ४(१३), पृथा ठोंबरे - ४(१२), गोवर्धनी मिठ्ठा- ३(१३), हर्षिता भोसले- ३(११.५), आरोही दलाल - ३(११.५), तेजस्विनी कांबळे - ३(११), वेदिका स्वामी - ३(११), मनस्वी क्षीरसागर - २.५(१२.५)

**८ वर्षे मुले:** नमन रंगरेज ५, नियान कंदीकटला - ४(१७), विवेक स्वामी - ३(१३.५), अजिंक्य कांबळे - ३(१३), ऋषांक कंदी- ३(११), अद्विक ठोंबरे- २(११), आविष्कार दलाल - १(१५.५), विराज शेंडगे - १(११)

**८ वर्षे मुली:** तन्वी बागेवाडी - १(१२), श्रेया पैकेकरी- १(११.५), हर्षा क्षीरसागर- १(९.५)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### महात्मा फुले विद्यालयाचा दहावीचा निकाल ७५ टक्के

**सोलापूर , दि. १५ मे-**

मंद्रूप येथील महात्मा फुले विध्यालयाच्या दहावीचा निकाल ८५. ६० टक्के लागला असून शाळेत प्रथम क्रमांक बाळराजे रमेश पवार ९४. ८० टक्के, द्वितीय क्रमांक प्रथमेश अशोक रेवतगाव ८८.८० टक्के, तृतीय क्रमांक सिद्धार्थ अनिल बगले ८५. १७ टक्के गुण मिळाले आहेत. यशस्वी विध्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कोळी, सचिव महादेव कमळे, संचालक नागेश बिराजदार, प्राचार्य रेणुका दशवंत, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष इरण्णा म्हेत्रे, शिक्षक पालक संघ अध्यक्ष सुनिल व्हनमाने, आर.डी. गोसावी, मीरा मिस्त्री, किरण देशपांडे यांच्यासह शिक्षक, पालक व कर्मचारी यांनी अभिनंदन केला आहे.

### पिलीव येथे अवैध व्यावसायिकांवर पोलीसांची कारवाई

**पिलीव, १५ मे -**

पिलीव (ता.माळशिरस) येथील अवैध धंदयावर पोलीसांची करडी नजर आहे. गेल्या काही दिवसापासून पोलीसांनी अवैध धंद्याविरुध्द धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. यामध्ये जवळपास ९ दारु विक्रेते व दोघा मटका बुकीवर पोलीसांनी कारवाई केली आहे. कारवाईचे सत्र सुरू असल्याने येथील दारु, मटका, जुगार तसेच गुटखा विक्री पोलीसांची नजर चुकवुन सुरू आहे. मटका बुकी सध्या मोबाईलवरुनच ग्राहकांशी थेट संपर्क साधत आहेत.तर दारु विक्रेते आपल्या पहील्या ठिकाणाऐवजी दुसरीकडे जाऊन दारुची विक्री करीत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून अवैध धंद्यावरच उपजिवीका करणारे कितीही कारवाई झाली तरीही धंदे बंद करीतच नाहीत अशी विदारक स्थिती आहे.



### अक्कलकोट तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अध्यक्षपदी मल्लिकार्जुन कोरे

**अक्कलकोट, दि.१५ मे-**

अक्कलकोट तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेची वार्षिक बैठक जिल्हा अध्यक्ष शिवलिंगअप्पा मेडेगर, बंटी बाबर, अंबादास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राजेराय मठ अक्कलकोट येथे झाली. तालुका अध्यक्षपदी मल्लिकार्जुन कोरे, उपाध्यक्ष संतोष माशाळ, सचिव सिध्देश्वर झुंजा, सहसचिव अनिल खोबरे, खजिनदार विजय मानकर यांची निवड करण्यात आली. सभासद शरणप्पा अक्कलवाडी, महेश कोरे, मंजूनाथ कोरे, अमरीश मानकर, मल्लिकार्जुन वाले, शिवचलप्पा चोळ्ळे, गुंडप्पा पोमाजी, पटेल, बसवराज जिगजबगी, मल्लिकार्जुन अदेंवाडी, श्रीमंत बुगडे हे उपस्थित होते. विक्रेत्यांच्या अडचणी समजून घेउन त्यावर उपाय करण्यासाठी संघटना कटीबद्ध असल्याची ग्वाही अध्यक्षांनी दिली.



### चंद्रशेखर विद्यालयातून मागासवर्गीय विद्यार्थिनींचे यश

**श्रीपूर, दि.१५ मे-**

येथील चंद्रशेखर विद्यालय व नारायण काका आगाशे कनिष्ठ महाविद्यालयातून मागासवर्गीय विद्यार्थिनींनी माध्यमिक शालांत परीक्षेत नेत्रदिपक यश मिळवले यात हर्षदा राजेंद्र शिंदे ही (९१ टक्के) गुणांसह मागासर्गीयातून प्रथम, हर्षा सचिन बेंद्रे ही (९०.२० टक्के) द्वितीय, श्रेया नागनाथ काळे हि (८८ टक्के) तृतीय आली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. रामदास देशमुख, उपाध्यक्षा माजी उपसभापती शुभांगी देशमुख, सचिव भारत कारंडे, सदस्य यशराज देशमुख, प्राचार्य पां. बा. बनसोडे, पर्यवेक्षक न.ह.अधटराव, सु.मा. गवळी, पर्यवेक्षक सि. भा. गुरव, शिक्षक शिक्षकेत्तर सेवक, शिक्षक पालक संघ कार्यकारिणी, सर्व अधिकारी सदस्य शाळा व्यवस्थापन समिती यांच्या वतीने यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, जिल्हाअध्यक्ष सोमनाथ भोसले, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, श्रीपूर शाखा अध्यक्ष गणेश सावंत व सर्व मान्यवर पदाधिकारी सदस्यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### मोहन सिता



**सोलापूर, दि. १५ मे -**

अक्कलकोट रोडवरील कोंडा नगरनजीकच्या बोळकोटे नगरातील रहिवासी मोहन नारायण सिता (वय ६८) यांचे गुरुवार, दि. १५ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यंत्रमाग उद्योजक शशिकांत, श्रीकांत व प्रशांत सिता यांचे ते वडील होत.

# जिल्ह्यात पूर्वमोसमी पावसाची सर्वदूर हजेरी

## शेतकऱ्यांतून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश भागात आज दि.१५ मे रोजी सायंकाळी पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली. अनेक ठिकाणी रात्रीही पाऊस झाला. उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना त्यामुळे दिलासा मिळाला तर पेरणीपूर्व मशागत केलेल्या शेतकऱ्यांतून पावसामुळे समाधान व्यक्त होत आहे. सोलापूर शहरासह दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, अकलूज, माढा या तालुक्यातील अनेक गावातून पावसाने हजेरी लावल्याचे वृत्त आहे.



## मंगळवेढ्यात अवकाळी पावसाची दमदार हजेरी

**मंगळवेढा दि.१५ मे**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात संध्याकाळी ६ वाजता अचानक वादळी वारे सुटून आकाशात काळे ढग आल्याने दमदार पावसाने झोडपून काढले. जवळपास दोन तास पाऊस होता. मंगळवेढा शहर, जित्ती, हुलजंती, हुन्नूर, सिध्दनकेरी, अरळी, शिरनांदगी, भोसे, बावची, बोराळे, रेड्डे या गावासह अन्य गावामधून जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्याचे वृत्त आहे.

दिवसभर उष्णतेने नागरिक हैराण झाले होते. परवा पडलेल्या पावसामुळे जमीन ओली झाल्याने व सुर्यनारायण आग ओकत असल्यामुळे प्रचंड उकाडा निमाण झाल्याने याचा त्रास दिवसभर नागरिकांना सहन करावा लागला. प्रत्येक नागरिकांच्या तोंडामधून हा उकाडा सोसवेना असे शब्द ऐकावयास मिळत होते. सायंकाळी ६ वाजता अचानक मोठ्या प्रमाणात चक्रीवादळ सुटल्याने नागरिकांची प्रचंड शहरामध्ये धावपळ सुरु होती. टपरी धारक दुकानदारांनी आपल्या खुर्च्या व छोटे टेबल वाऱ्याने रस्त्यावर जावू नये याची खबरदारी घेत साहित्य एकत्र गोळा करुन ठेवले होते. मागील दोन आठवड्यापुर्वी या वादळाचा छोट्या व्यावसायिकांना मोठा तडाका बसल्यामुळे ते आजच्या वादळामुळे भयभीत झाले होते. यंदाच्या उन्हाळ्यात गतवर्षीपेक्षा मोठ्या प्रमाणात उष्णता जाणवत होती. परवा व आजच्या पडलेल्या पावसामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. हा पाऊस ऊस पिकासाठी तारक असल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.



**पंढरपूर : शहर आणि उपनगरात गुरुवारी सायंकाळी मेघगर्जनेसह सुमारे एक ते दीड तास मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. पावसाबरोबरच आकाशात विजांचे देखील तांडव सुरू होते. विजांच्या या लखलखाटमुळे सारा आसमंत प्रकाशाने उजळून निघाला होता. विजांच्या या तांडवाचे छायाचित्र टिपले आहे येथील आकाश टोमके यांनी.**

## अकलूज व परिसरात मेघगर्जनेसह पावसाच्या सरी

**अकलूज, दि. १५ मे -**

परिसरात गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास मेघग र्जनेसह पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. सुमारे १५ मिनिटांच्या सलग पावसानंतर रात्री ८ वाजेपर्यंत कमी अधिक प्रमाणात पाऊस चालू होता. या पावसाने उन्हाळी भुईमूग व चाऱ्याचे पीक कडवळ यांना फायदा होणार असला तरी काढणीस तयार असलेल्या भुईमुगास करे येण्याची पण शक्यता आहे. उन्हाळी,बाजरी, आंबा, डाळिंब आदी पिकांना फटका बसणार आहे.काढणीस आलेल्या उन्हाळी बाजरीचे मोठे नुकसान होणार आहे.शिवाय वादळी पावसाने आंबा,जांभूळ गळून पडले असण्याची शक्यता आहे.अगोदरच वाढत्या तापमानाने केळीचे घड मध्येच मोडून मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर भाजीपाला पिकातील टोमॅटो, वांगी व पालेभाज्या यांना रोगराई येऊन नुकसान होणार शेवगा पिकाची सध्या फ्लोरिंग चालू असून या पावसाने फुलांचे मोठ्या प्रमाणावर गळ होणार आहे. पालखी साठी पंढरपूरची आषाढी वारी यासाठी शेतकऱ्यांनी शेवग्याचा बहार धरलेला असल्याने पालखीपर्यंत शेंगा येण्याची चिन्हे दिसत नाहीत .

> यावर्षी यावर्षी आंबा फळास पाहिजे तसा बाजार भाव मिळाला नसल्याने आधीच तोट्याचा असलेली अंबा बाग या अवकाळी पावसाने अधिकच तोट्यात आली आहे माझी पाच एकर आंबा बाग असून शेवटचा टप्पा तोडणीचा चालू आहे
>
> **- भारत मगर निमगाव, आंबा बागायतदार**

> मी प्रथमच तीन एकर उन्हाळी बाजरीचे पिक घेतले असून तयार होत असतानाच अवकाळी पावसाने बाजरी जमीन दोस्त झाली.त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे
>
> **- ओंकार कुंभार, यशवंतनगर**

## छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बोंडलेत जनहित संस्थेतर्फे सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१५ मे-**

बोंडले येथे जनहित विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीच्या निमित्ताने सकाळी ग्रामस्थांच्या वतीने प्रतिमापूजन करण्यात आले. संध्याकाळी संस्थेमार्फत जनहित सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या माध्यमातून बोंडले पंचक्रोशीतील गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेमार्फत ट्रॉफी आणि शिवचरित्रातील शंभुराजे हे पुस्तक देऊन सत्कार व कौतुक करण्यात आले. या विद्यार्थ्यांमध्ये पीएसआय, एसओ, पाटबंधारे खाते, मंत्रालयीन क्लार्क, यांचा समावेश होता. क्षीरसागर, वैभव जाधव, शिवप्रताप पाटील, रुक्मिणी जाधव या यशस्वी विद्यार्थी तसेच मंथन, अक्षरगंगा,सारथी परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नवनाथ कोडग होते. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. संतोष जाधव यांनी केले. सूत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने नानासाहेब चव्हाण यांनी छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा या विषयावर व्याख्यान दिले. भागवत मुरलीधर पाटील, धनाजी लक्ष्मण जाधव, आनंद जाधव, ज्ञानेश्वर बिले, ऍड राजेश जाधव, ऍड अमोल कुलकर्णी, तलाठी मेजर विक्रमसिंह शिंदे, सौरभ वाघमारे सरपंच विजयसिंह माने देशमुख उपस्थित होते. उपस्थित सर्व लोकांना शिवचरित्रातील शंभुराजे या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आभार अनिल जाधव यांनी मानले.






## श्रीपूरमध्ये ज्ञानेश्वरी पारायण, अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. १५ मे-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील हनुमान भजनी मंडळाच्या माध्यमातून ज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची उत्साहात सुरुवात झाली. मंगळवार दि. १३ मे ते मंगळवार दि. २० मे २०२५ या कालावधीत हा सोहळा होत असून यामध्ये पहाटाचे काकडा, ज्ञानेश्वरी वाचन, तुकाराम महाराज गाथा भजन, हरीपाठ, प्रवचन, व किर्तन असे कार्यक्रम होणार आहेत.

यात मंगळवार दि. १३ मे रोजी रमेश महाराज शिवापूरकर (सोलापूर ) यांचे, बुधवार १४ मे रोजी श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर (पंढरपूर ), गुरुवार १५ मे रोजी सुरेश सुळ (अकलूज) यांची किर्तन सेवा पार पडली.

शुक्रवार १६ मे रोजी जगन्नाथ देशमुख (पंढरपूर), शनिवार १७ मे रोजी बालाजी कुलथे (पुणे), रविवार दि. १८ मे रोजी निवृत्ती नामदास (पंढरपूर) सोमवार दि. १९ मे रोजी माऊली टेंबूकर (पंढरपूर) यांचे किर्तन होणार आहे.

तर मंगळवार दि. २० मे रोजी बापूसाहेब देहूकर यांचे सकाळी ११ ते १ काल्याचे किर्तन होणार आहे .

यामधे सकाळी ७ ते ११ ज्ञानेश्वरी वाचन, दु १ ते ३ गाथा भजन, सायं. ४ ते ५ हरीपाठ, सायं. ६ ते ७ प्रवचन, रात्री ७. ३० ते ९. ३० किर्तन व हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत. सोहळा यशस्वी होण्यासाठी वासुदेव पाटील, तुकाराम सुमंत, भिमराव पांडुरंग जाधव, ज्ञानेश्वर सुमंत, गोविंद जाधव, भारत दगडू मोरे, रमेश व्यवहारे, महादेव थिटे, नामदेव सुमंत, विशाल जाधव, परिश्रम घेत आहेत .

# पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राचेच आरोग्य धोक्यात

## जीव मुठीत धरुन द्यावी लागते सेवा

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १५ मे -**

माळशिरस तालुक्यातील सर्वात जुने १९७८ साली बांधलेले प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीची प्रचंड दुरावस्था झाली आहे. याठिकाणी शौचालयाची तसेच पिण्याच्या पाण्याचीही सोय नाही. इमारतीला सुमारे पन्नास वर्ष पुर्ण होत आहेत. त्यामुळे सध्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचेच आरोग्य धोक्यात आले आहे.

येथील अरोग्य केंद्रात दहा- बारा खेडेगावातील नागरिकांची आरोग्य सुविधा अवलंबून आहे. ते सध्या धोकादायक मुख्य इमारत, क्वार्टर व ऑपरेशन थिएटर याचा स्लॅब पुर्णपणे निकामी झाला असुन वरुन सतत स्लॅबचे तुकडे पडत आहेत. या सगळ्याच

याठिकाणी रुगणांना सेवा कुठे द्यायची हा गंभीर प्रश्न सध्या येथील आरोग्य विभागा पुढे निर्माण झाला आहे. इमारत व स्टाफ क्वार्टरचे ऑडीट अकलुज येथील सहकार महर्षी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,सिव्हिल इंजिनिअर, बांधकाम विभागाकडुन करण्यात आले आहे. त्यांच्या अहवालामध्ये मुख्य इमारत व स्टाफक्वार्टर नष्ट करुन नवीन बांधकाम करणयात यावे असा अहवाल २०१९ मध्ये देण्यात आला आहे. याला जवळपास सात वर्षाचा कालावधी झाला आहे. पण शासनाने याची अद्याप कसल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत तांदुळवाडी उपकेंद्र, फळवणी उपकेंद्र, बचेरी उपकेंद्र, करांडेवस्ती ( पिलीव) उपकेंद्र, झिंजेवस्ती उपकेंद्र तसेच कुसमोड, काळमवाडी, सुळेवाडी ,शिंगोर्णी या गावांचा समावेश होतो. प्रचंड मोठी लोकसंख्या असणारे तालुक्यातील हे सर्वात जुने प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. याठिकाणी रात्रंदिवस पेशंटची वर्दळ असते. दररोज ७० ते ८० ओपीडी याठिकाणी असते. पिलीव येथे दोन हायस्कूल, अनेक जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडया, एक ज्युनिअर कॉलेज यासह इतर याअंतर्गत येणाऱ्या पेशंटचा कायम राबता या प्राथमिक आरोग्य केंद्रांकडे असतो. याठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे लसीकरण, गरोदर माता, पोलीओ, सर्प दंश, श्वान चावणे, अपघात, यावरचे उपचार याठिकाणी सुरू असतात. याबाबत येथील प्रशासनाने मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर, जिल्हा वैदयकीय अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे या इमारत बांधकामाबाबत सतत पाठपुरावा केला आहे. नवीन इमारतीसाठी व स्टाफ क्वार्टर साठी जवळपास दहा कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. तालुक्यातील अकलूज, नातेपुते व माळशिरस याठिकाणी असणाऱ्या रुगणालयांना कोटयावधी रुपयांचा निधी उपलब्ध होतोय मात्र याठिकाणी पंढरपूर- सातारा महामार्गावरील सर्वात जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे सध्या आरोग्य निधीवाचुन धोक्यात आले आहे. चौकट - याठिकाणी एकुण सहा स्टाफ क्वार्टर असुन त्या अतिशय धोकादायक झाल्या आहेत.याचा संपूर्ण स्लॅब खराब झाला आहे. वरचेवर याठिकाणी धलपया पडुन सळया उघडया पडल्या आहेत. यामुळे याठिकाणी स्टाफ राहत नाही. मग कुठे राहयाचा हा प्रश्न सध्या निर्माण झाला आहे.



> याबाबत माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील यांनी याठिकाणी नवीन इमारतीसाठी व स्टाफ क्वार्टर बांधणयासाठी वारंवार आवाज उठविला होता.व त्यांचे अदयापही यासाठी जोरदार प्रयत्न सुरु आहे. २४ जुन २०१९ च्या जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेत सुदधा याबाबत चर्चा झाली होती.तर सध्याचे ग्राम विकास तथा पंचायत राज मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी निधी देणयाचा शब्द जाहीर सभेत दिला आहे. पण तो निधी लवकर देणे आवश्यक आहे.

> सध्या याठिकाणी सर्व इमारत धोकादायक झाली आहे. तसेच स्टाफ क्वार्टर सुदधा धोकादायक झाले आहेत. प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन तात्काळ निधी उपलब्ध करुन दयावा .याठिकाणी वारंवार स्लॅबचे तुकडे पडत आहेत, स्लॅब फुगले आहे. तसेच प्रशासनाने या धोकादायक इमारतीचा उपयोग करु नये असा आदेश दिला आहे. ही इमारत कधीही पडु शकते अशी अवस्था आहे. यामुळे प्रशासनाने याची गंभीर दखल घयावी.
>
> **- डॉ. विलास जाधव, वैद्यकीय अधिकारी**

## महत्वाचे...

### शहर पोलीस आयुक्तालयातील १२० पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या

**सोलापूर, दि. १५ मे-**

शहर पोलीस आयुक्तालयातील १२० पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्यात आल्याचे आदेश पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी गुरुवारी सायंकाळी दिले.सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयातील आस्थापना मंडळाची बैठक १५ मे रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी बदलीसाठी अर्ज केलेली आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांना समक्ष बोलवण्यात आले होते. गुरुवारी सायंकाळी बदल्यांचे आदेश काढण्यात आली. यामध्ये ७ श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, १८ सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, ६३ पोलीस हवालदार, ७ पोलीस नाईक, ३१ पोलीस शिपाईचा समावेश आहे.

### घर नावावर करण्यासाठी पत्नीचा छळ

**सोलापूर, दि. १५ मे-**

घर नावावर करण्यासाठी पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अनिता विष्णु कोडमूर (वय ४०, रा. महापद्मा कॉम्प्लेक्स, अशोक चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पती विष्णु, सासरे रामचंद्र, दीर अरूण, जाऊ शोभा (रा. महापद्मा कॉम्प्लेक्स, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ मे २००३ पासून १४ मे २०२५ पर्यंत सासरी असताना पती विष्णु व इतरांनी अनिता यांना त्यांच्या वडीलांचे घर माझ्या नावावर कर नाही तर तुझे हात पाय तोडतो अशी धमकी देत वारंवार मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. तसेच सासरे, दीर आणि जाऊ यांनी विष्णु यास भडकावून व अनिताचा वारंवार अपमान करून शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

### एकमेकांना बघण्यावरून कुर्डूवाडीत तरुणाला बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १५ मे-**

कुर्डूवाडी येथील भिमनगर येथे एकमेकांना बघण्याच्या कारणावरून तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली. ही मारहाण बुधवारी झाली.रमाकांत बाळू मागाडे (वय २६, रा. भिमनगर, कुर्डूवाडी ता. माढा) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. रमाकांत हा कुर्डूवाडी रेल्वे स्टेशन बाहेर पडत होता. त्यावेळी एकमेकांना बघण्याच्या कारणावरून का बघतो अशी विचारणा केल्यानंतर अमीर शेख व इतर तीन यांनी दगड व काठीने मारहाण केली. या मारहाणीत रमाकांतच्या डोक्याला जखम झाल्याने कुर्डूवाडी येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून गुरुवारी दुपारी १.४० वाजता मित्र अरविंद उकरंडे याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### स्वत:च्या दुकानात गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १५ मे-**

घरासमोर असलेल्या हेअर कटिंगच्या दुकानात गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केली. हा प्रकार गुरुवारी सकाळी सातच्या सुमारास उघउकीस आला. शुभम सिध्देश्वर राऊत (वय २३, रा. विद्या नगर शेळगी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. शुभमचे शेळगी परिसरात समर्थ हेअर कटिंग नावाचे दुकान आहे. तो आणि त्याचे वडील हा व्यवसाय सांभाळायचे. बुधवारी रात्री तो मित्रांसोबत घराबाहेर गेला होता. बाहेरून पुन्हा घरी आला. सकाळी दुकान उघल्यानंतर त्याने दुकानातील कटींग करताना वापरावयाच्या कपडयाने छताच्या लोखंडी हुकाला गळफास घेतला. ही बाब वडी सिध्देश्वर यांच्या लक्षात आली, त्यांनी त्यांची गळफासातून सुटका करून डायल ११२ वर फोन करून माहिती दिली. यानंतर पोलीस हवालदार भोगशेट्टी यांनी उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या रुग्णाने पळ काढला

**सोलापूर, दि. १५ मे-**

अज्ञात कारणातून राहत्या घरात ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न करणारा रुग्ण उपचारादरम्यान रुग्णालयातून पळाला. हा प्रकार बुधवारी रात्री १० च्या सुमारास घडला. विठ्ठल भिमसिंग बंबईवाले (वय ३७, रा.बापूजी नगर) असे गळफास घेण्याचा प्रयत्न केलेल्याचे नाव आहे. बापूजी नगरातील राहत्या घरात विठ्ठल याने बुधवारी रात्री दहाच्या सुमारास ओढणीने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात येताच त्यांनी त्याला गळफासातून सोडवून उपचाराकरीता रात्री १०.३० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले. दरम्यान गुरुवार १५ मे रोजी रात्री १.३० च्या सुमारास विठ्ठल हा रुग्णालयातून पळून गेल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पैसे देत नसल्याने पेट्रोल ओतून कार पेटविली; सुनील नगर येथील प्रकार

**सोलापूर, दि. १५ मे-**

दिलेले पैसे परत देत नसल्याच्या कारणातून घरासमोर उभी केलेली कार पेट्रोल ओतून पेटवून देण्याची घटना एमआयडीसी परिसरातील सुनील नगरात गुरुवारी रात्री २.३५ च्या सुमारास घडली. या आगीच्या भडक्यात कार पेटवणारा दोन्ही हात भाजून जखमी झाला. राजेश बापू हंचाटे (वय २८, रा. आकाशवाणी, सोलापूर) असे हात भाजलेल्याचे नाव आहे. राजेश् आणि अरविंद हे दोघे पाच वर्षापासूनचे मित्र. काही महिन्यांपूर्वी अरविंद याने राजेश याच्याकडून गरज असल्याने दीड लाख रुपये घेतले होते. परंतु अनेक महिने झाले तरी परत केले नाहीत. शिवाय राजेशकडून अनेकवेळा पैशाची मागणी करूनही अरविंद पैसे देण्यास टाळाटाळ करत होता. गुरुवारी मध्यरात्री राजेश हा अरविंदच्या घराकडे गेला. तेव्हा त्याच्या घरासमोर कार उभी केलेली होती. पैसे देत नसल्याच्या कारणातून राजेशने ती कार पेट्रोल ओतून पेटवून दिली. त्यावेळी त्याचे दोन्ही हात भाजल्याने तो उपचाराकरीता गुरुवारी सकाळी ९.२५ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# तामलवाडी एमआयडीसीत ४ क्लस्टरची निर्मिती

- आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची उद्योजकांना ग्वाही
- सोलापूरच्या फडकुले सभागृहात पार पडली बैठक





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे-**

मराठवाड्याच्या प्रवेशद्वारावरील तामलवाडी येथे नव्याने उभारण्यात येणाऱ्या एमआयडीसीमध्ये ४ प्रकारच्या उद्योजकांची क्लस्टर निर्मिती करून हजारो युवकांच्या हाताला काम देण्याची ग्वाही आज (दि. १५) माजी कृषी व उद्योग मंत्री तथा आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. दरम्यान, तामलवाडीत येणाऱ्या सर्व लघु उद्योजकांना शासनस्तरावरून सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचेही आ. पाटील यांनी आवर्जुन सांगितले.

सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहात आज (दि. १५) पार पडलेल्या तामलवाडी औद्योगिक क्षेत्राच्या या बैठकीसाठी आ. पाटील यांनी सोलापूर आणि धाराशिव येथील सर्व उद्योजक संघटनांना आमंत्रित केले होते. इतकेच नाहीतर मुंबई औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विवेक घोडके, धाराशिव येथील उपविभागीय अधिकारी अरूणा गायकवाड, धाराशिव जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखील पाटील, लातूर एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता उज्वल टेंभुर्णीकर, लातूर एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी अमित भांबरे, भाजपाचे जेष्ठ नेते नितीन काळे, संतोष बोबडे, यशवंत लोंढे, सोलापूरचे जेष्ठ उद्योजक किशोर कटारे, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, सोलापूर जिल्हा यंत्रमाग संघटना अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, सोलापूर रेडिमेड असो.चे राजू खोचर, मुन्ना चोपडा, व्यंकटेश चिलका, प्रमोद दरगड, अंकित दरगड आदींची उपस्थिती होती.

या बैठकीत आ. पाटील यांनी तामलवाडी एमआयडीसीमध्ये येणाऱ्या उद्योजकांना मिळणाऱ्या मराठवाड्यातील सवलतींबाबत विस्तारीत माहिती दिली. या एमआयडीसीमध्ये लघुउद्योजकांना प्राधान्य देण्यात येणार असून, याद्वारे तामलवाडी पंचक्रोशीमधील हजारो युवकांना काम देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. तामलवाडी एमआयडीसीसाठी ही उद्योजकांची तिसरी बैठक आहे. या एमआयडीसीनंतर माळुंब्रा येथे नव्याने उभारणी करण्यात येणाऱ्या एमआयडीसीवर आमचा फोकस राहणार आहे. यामुळे सोलापुरातून तामलवाडी येथे येणाऱ्या उद्योजकांच्या काही अडचणी असतील तर त्या आम्हाला लवकर सांगाव्यात...त्या समस्यांचे पूर्ण निराकरण करणार करू ,अशी ग्वाही दिली. दरम्यान, सध्या १४६.७२ हेक्टर जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली असून, जुन्या आणि नवउद्योजकांनी प्लॉटसाठी आपली नावे नोंदविण्याचे आवाहनही शेवटी आ. पाटील यांनी केले. यावेळी विविध विभागाद्वारे आलेल्या शासकीय अधिकाऱ्यांनी प्रोजक्टरद्वारे तामलवाडी एमआयडीसीची संकल्पना उद्योजकांना विस्ताराने समजावून सांगितली. इतकेच नाहीतर तामलवाडी एमआयडीसीसाठी जमिनी भूसंपादन करताना सर्व शेतकऱ्यांना विश्वासात घेवून आणि चांगला दर देणार असल्याचेही लातूर एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी अमित भांबरे यांनी या बैठकीनंतर दै. तरूण भारतशी संवाद साधताना सांगितले.

#### पुणे-मुंबईच्या धर्तीवर ४ क्लस्टर उभारणी

पुणे, मुंबईच्या धर्तीवर मराठवाड्याच्या प्रवेशद्वारावरील एमआयडीसीमध्ये ४ क्लस्टर उभारणी करण्याचा मनोदय आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. या ४ क्लस्टरमध्ये टेक्सटाईल्स, ॲग्रो, एस.सी./एस.टी. आणि महिला उद्योजिकांसाठी स्वतंत्र क्लस्टर निर्माण केले जाणार आहे. प्रत्येक क्लस्टरमध्ये किमान १० ते १२ उद्योजकांचा समावेश राहणार आहे. या उद्योजकांना एमआयडीसीत मुलभूत सुविधा देण्यात येणार असून, त्यांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठीही शासनस्तरावरूनही मी सहकार्य करणार आहे.

**- राणाजगजितसिंह पाटील,**
माजी उद्योग मंत्री तथा आमदार

#### कटारे व राठी यांनी मांडल्या भावना

कटारे उद्योग समुहाचे किशोर कटारे, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांनीही उद्योजकांच्या वतीने मते मांडली. उद्योजकांना जमिनीबरोबर अंतर्गत रस्ते, वीज, पाणी आणि इतर मुलभूत गरजा देण्याची गरज प्रतिपादन केली. इतकेच नाहीतर शासनस्तरावरून मिळणाऱ्या सवलतीही वेळेत द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# विमानसेवा सुरू न झाल्यास विमानतळाला २६ मे रोजी प्रतिकात्मक ताळे ठोकणार

### सोलापूर विकास मंचचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे-**

२६ मे रोजी विमानसेवा सुरू न झाल्यास होटगी रोड विमानतळाला प्रतिकात्मक ताळे ठोकणार असल्याचा इशारा सोलापूर विकास मंचने दिला आहे. होटगी रोड सोलापूर विमानतळाचे उद्घाटन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नऊ महिन्यापूर्वी झाले. मात्र, आजतागायत नागरी विमानसेवा सुरू झाली नाही. हे केवळ प्रशासनाचे अपयश नसून, थेट पंतप्रधानांचा अवमान असल्याचे मत सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी व्यक्त केले आहे.

जिल्हाधिकारी यांनी घोषित केल्याप्रमाणे विमानसेवा सुरू न झाल्यास येत्या २६ मे रोजी सोलापूरकर विमानतळाला प्रतिकात्मक ताळे लावण्याचा इशारा दिला आहे. ''आम आदमी साठी नाही, तर खास लोकांसाठीसुद्धा ही सेवा उपलब्ध नाही हे दुर्दैवी आहे,'' असे सदस्यांनी सांगितले. यापुढे सोलापूरच्या सर्व लोकप्रतिनिधींना तथा मंत्री, खासदार, सर्व आमदार यांना रोज एस.एम.एस पाठवण्याचा निर्णयही मंचाने घेतला आहे. या वेळी मंचाचे सदस्य मिलिंद भोसले, केतन शहा, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर, अर्जुन रामगिर, श्रीकांत अंजुटगी, घनश्याम दायमा, रमेश माळवे, प्रसन्न नाझरे, जयश्री तासगावकर, सुहास भोसले, नरेंद्र भोसले, आनंद पाटील, वासुदेव आडके, भारत पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

### अखेर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण





**सोलापूर : उजनी- सोलापूर ११० किलोमीटर समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण, लवकरच होणार चाचणी.**

# पालकमंत्री गोरे आज सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे -**

ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे दिनांक १६ मे रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे.



शुक्रवार दिनांक १६ मे रोजी सकाळी ९.०० वाजता शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे जिल्हा नियोजन समिती पुर्वतयारी आढावा बैठकीस उपस्थिती, सकाळी १०.०० वाजता शासकीय विश्रामगृह येथून स्वातंत्रवीर सावरकर पुतळा, सोलापूरकडे प्रयाण, सकाळी १०.१० वाजता स्वातंत्रवीर सावरकर पुतळा येथे आगमन व तिरंगा पदयात्रेस उपस्थिती, सकाळी ११.०० वाजता माधवनगर, पद्मामारुती मंदिर पटांगण येथून शासकीय विश्रामगृह, सोलापूरकडे प्रयाण, सकाळी ११.१० वाजता शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे आगमन व राखीव, सकाळी ११.५५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूरकडे प्रयाण, दुपारी १२.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन व जिल्हा नियोजन समिती सभेस उपस्थिती, दुपारी २.०० वाजता टंचाई आढावा बैठकीस उपस्थिती, दुपारी ३.०० वाजता खरीप हंगाम-२०२५ नियोजन बैठकीस उपस्थिती, दुपारी ३.४५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण, दुपारी ३.५० ते ४.३० वाजता शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे आगमन व राखीव, दुपारी ४.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूरकडे प्रयाण, दुपारी ४.४० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ येथे आगमन व नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा आढावा व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक कामाचा आढावा, सायंकाळी ५.१० वाजता सोलापूर येथून सांगोलाकडे प्रयाण, सायंकाळी ६.०० वाजता सांगोला येथे आगमन व भारतीय जनता पार्टी नूतन जिल्हाध्यक्ष पदग्रहण व सत्कार समारंभास उपस्थिती, सायंकाळी ७.३० वाजता सांगोला येथून मोटारीने माळशिरस, फलटण, शिरवळ मार्गे पुणेकडे प्रयाण करतील.

# सिव्हिलमध्ये नर्सेसला मेमो दिल्याच्या पार्श्वभूमीवर संघटनेकडून रोष व्यक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे -**

> सिव्हिलमध्ये चतुर्थी श्रेणी कर्मचारी २१४, नर्सेस यांची नोकर भरती केली जाणार आहे. सात कलमी कार्यक्रम आखला असून त्यानुसार दैनंदिन काम केले जात आहे. हा उपक्रम ३० जूनपर्यंत चालणार आहे. ३२ जणांना मेमो दिलेले आहेत. काहींचे वेतनही कपात केले आहे. चांगले काम केले आहे त्याचा गौरवही केला आहे.
>
> **- डॉ. संजीव ठाकुर,** अधिष्ठाता, सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये अस्वच्छता, रुग्णांची गैरसोय यावरून मेमो दिले जात आहेत. मात्र वर्ग चार व नर्सेसची पदे रिक्त आहेत. वार्डात ३० टक्के जास्तीचा वर्क लोड नर्सेस सहन रुग्णसेवा देत आहेत. यावर ठोस प्रक्रिया न राबवता अधिष्ठातांनी नर्सेस यांना मेमो देण्यात आलेले आहेत. या कारवाईला नर्सेस संघटनेकडून गुरुवारी सकाळी गेट मिटींग घेत रोष व्यक्त केला. तसेच अधिष्ठातांनी दिलेल्या सूचनेनुसार काम करण्याच्या सुचना नर्सेस संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्याच्या नर्सेस यांना दिल्या.

खासदार प्रणिती शिंदे यांनी चार दिवसापूर्वी सिव्हिल हॉस्पिटला भेट दिली होती. अनागोंदी कारभार व रुग्णांच्या गैरसोय बद्दल सिव्हिल प्रशासन व अधिष्ठाता यांचा चांगलेच



धारेवर धरले होते. वरिष्ठ कार्यालयास लेखी तक्रारही केली आहे. त्याच दरम्यान वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. चंदनवाले यांनी हॉस्पिटलची पाहणी केली होती. त्यांनाही रुग्णांच्या हिताच्या दृष्टीने गोष्टी दिसून आल्या नाहीत. नाराजी व्यक्त करीत अधिष्ठातांच्या कामकाजावर बोट ठेवले आहे. या दोन्ही प्रकारामुळे अधिष्ठाता चांगलेच कामाला लागले आहेत. त्यांनी लागलीच हॉस्पिटलची पाहणी केली असता त्यांना नर्सेस केअर होत नाही,बाहेरील औषधे आणाला सांगितला जातात, पेशंट शिफ्ट करताना कर्मचारी नसतात, सिनिअर डॉक्टर वार्डात किंवा ओपीडीमध्ये नसतात. वार्डातील पंखे बंद असतात,रुग्णांना पोशाख दिलेला नसतो. रुग्णांशी संवाद चांगला नसतो आदी गोष्टी निदर्शनास आल्या. त्यानुसार अनेकांना मेमो दिलेले आहेत. गुरुवारीही चार जणांना तोंडी सुचना देत कामात सुधारणा करण्यास सांगितले आहे.

# 'ए. जी.पाटील' मध्ये पारितोषिक वितरण सोहळा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे -**

ए. जी. पाटील पॉलिटेक्निक येथे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांकरीता ''भरारी-२५'' हा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. या बक्षीस समारंभामध्ये शैक्षणिक वर्षातील सर्व विभागातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या व १०० पैकी १०० गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच खेळ आणि विविध तांत्रिक स्पर्धांमध्ये प्राविण्य व बक्षीस मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच यावर्षी सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील पृथ्वीराज लेंगरे, शिवानंद पटणे, मनीष मारीचेर्ला, समर्थ अनुभुले व समर्थ कलबुर्गी या विद्यार्थ्यांनी डिपेक्स-२०२५ या प्रोजेक्ट कॉम्पिटिशन मध्ये राज्यात प्रथम क्रमांक मिळविला म्हणून सर्व विद्यार्थ्यांना व प्रोजेक्ट गाईड प्राध्यापक एस ए बोगा यांना गौरवण्यात आले. याप्रसंगी प्रत्येक विभागातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी अंतर्गत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचा पृथ्वीराज लेंगरे, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाची शिफा शेख, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचा अलफान शेख, इलेक्ट्रॉनिक ॲंड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाची स्नेहा जाधव व मेकॅनिकल इंजिनिअरिंगची तृप्ती सोमनाथ; तर सर्वोत्कृष्ट विभाग म्हणून कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग व सर्वोत्तम कर्मचारी सी. एस. ढेपे यांनाही गौरवण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इंजि. जगदीश मारीचेर्ला, संस्थेचे विश्वस्त रविंद्रजी आडगे, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष एस ए पाटील, उपाध्यक्ष एस एस पाटील, कॅम्पस डायरेक्टर प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले व उपप्राचार्य एस के मोहिते यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रम प्रसंगी शैक्षणिक समन्वयक एस. एन. गवंडी, ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट ऑफिसर एम. एम. कुलकर्णी, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एन. बी. पवार, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख टी. एल. पाटील, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. एस. लिगाडे, इलेक्ट्रॉनिक्स ॲंड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. आर. बागबान, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख आर. एस. मोटगी व प्रथम वर्ष इन्चार्ज व्ही. आर. आवटे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गवंडी यांनी केले तर बक्षीस वाचन श्री पवार यांनी केले.

# वस्त्रोद्योग मंत्री सावकारे आज सोलापूर दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे -**

संजय सावकारे वस्त्रोद्योग मंत्री हे १६ मे रोजी जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा याप्रमाणे आहे.



दि.१६ मे रोजी सकाळी ६.४५ वा. सोलापूर रेल्वेस्थानक येथे आगमन. सकाळी ८.३० वा. शासकीय विश्राम गृह येथून गाणगापूरकडे रवाना. सकाळी ११.३० वा. गाणगापूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. दुपारी १२.०० वा श्री दत्त मंदिर देवस्थानकडे दर्शनासाठी रवाना. दुपारी १.०० वा गाणगापूर येथून अक्कलकोट कडे प्रयाण. दुपारी २.३० वा अक्कलकोट शसकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. दुपारी ४.३० वा. शासकीय विश्रामगृह येथून श्री स्वामी समर्थ मंदिराकडे प्रयाण व दर्शनासाठी उपस्थिती. सायं. ६.०० वा. अक्कलकोट येथून सोलापूरकडे प्रयाण व शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव.

शनिवार.१७ मे रोजी सकाळी ८.३० वा. शासकीय विश्रामगृह येथून सिध्देश्वर मंदिर दर्शनास उपस्थिती. सकाळी ९.३० वा राजेंद्र अंकम हातमाग व्हॉल हॅंगिंग, दत्त नगर येथे भेट. सकाळी १० वा. मयुरी इंडस्ट्रीज येथे चादर युनिट, स.१०.३० वा. गड्डम इंडस्ट्रीज येथे टेरी टॉवेल युनिटला भेट व ११.३० वा. सोलापूर शासकीय विश्रामगृह. दुपारी १२.०० वा. शासकीय विश्रामगृह सोलापूर येथून तुळजापूर, जि. धाराशिव कडे प्रयाण करतील.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## महत्वाचे...

### जिल्हा नियोजन समितीची आज बैठक

**सोलापूर दि.१५ मे-**



सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची व कार्यकारी समितीची बैठक नियोजन भवन सभागृह, सोलापूर येथे शुक्रवार, दि. १६ मे २०२५ रोजी सकाळी- ११.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. यावेळी खासदार, आमदार आणि जिल्हा नियोजन समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत, असे जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी कळविले आहे.

### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन

**सोलापूर दि.१५ मे-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळात छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षक मनीष बांगर, संतोष बुलबुले, नीलफोर सय्यद, सुवर्णा गुरुव, प्रभा चव्हाण, रूपाली कंची, मीनाक्षी कानडे,प्रफुल्ला कदम, सारंग अंजीखाने, ताहीर बिराजदार, अविनाश शिंदे,अमोल गायकवाड, सचिन बर्मा, ज्ञानेश्वर गरड, प्रशांत साठे, जाकीर सय्यद, भालचंद्र साखरे, सचिन साखरे, सायली ढोले, गौस रिसालदार आदी उपस्थित होते.

### महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरले

**सोलापूर, दि. १५ मे -**

सोलापूर शहरातील जुना पूना नाका परिसरातील वसंत विहार परिसरातील स्पर्श हॉस्पीटलजवळील नाल्याजवळ पायी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅम वजनाचे १ लाख ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र तिघांनी जबरदस्तीने हिसकावून नेले. याबाबत सुजाता भाऊसाहेब सुतार (वय ४८, रा. रोहिणी नगर भाग ३, ओम गर्जना चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुजाता सुतार या ६ मे रोजी वसंत विहार परिसरात कामानिमित्त गेल्या होत्या. सायंकाळी सव्वा सातच्या सुमारास त्या परत घरी येण्यासाठी पायी येत होत्या. त्यावेळी स्पर्श हॉस्पीटलजवळील नाल्याजवळ अज्ञात तीन चोरट्यानी सुतार यांच्या गळ्यातील १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पाटोळे पुढील तपास करीत आहेत.

### बाळे ब्रिजवर चारचाकी वाहनास ट्रकची धडक

**सोलापूर, दि. १५ मे -**

बाळे ब्रिजवर चारचाकी वाहनास ट्रकने पाठीमागून जोरदार धडक देऊन चारचाकी वाहनाचे ८० हजार रुपये किंमतीचे नुकसान केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत मैनोद्दीन खाजा पठाण (वय ५५, रा. खाजा नगर, एम के फंक्शन हॉलसमोर, धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ मे रोजी मैनोद्दीन पठाण हे एमएच १४ डीएक्स ९३९३ ही चारचाकी वाहन चालवित पुणे रोडवरून धाराशिवकडे जात होते. बाळे ब्रिजवर पठाण यांच्या चारचाकी वाहनास पाठीमागान येणाऱ्या एमएच २६ बीई ८७८९ क्रमांकाच्या मालट्रकच्या चालकाने ट्रक निष्काळजीपणे चालवून चारचाकी वाहनास पाठमागून जोरदार धडक दिली. यामध्ये पठाण यांच्या चारचाकी वाहनाचे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### हैद्राबाद रोडवरून ३५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १५ मे -**

हैद्राबाद रोडवरील स्वाद हॉटेलसमोरून चोरट्याने ३५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत सचिन कृष्णा शिंदे (वय ३३, रा. सोन्या मारूतीजवळ, सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ मे रोजी सचिन शिंदे याने रात्री स्वाद हॉटेलच्या बाजूस असलेल्या आनंद बिअर शॉपीसमोर त्याची एमएच १३ डीएल ५९२० क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार वाडीकर तपास करीत आहेत.

# मुद्रांक विक्रेता, नोटरीसह सहाजणांवर गुन्हा

## बनावट कागदपत्रे व व्यक्तीच्या आधारे प्लॉटचा व्यवहार प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मे -**

बनावट कागदपत्रे व व्यक्तीच्या आधारे मजरेवाडी येथील प्लॉटचा व्यवहार करून जागेवर पत्रा शेड उभारून अतिक्रमण केल्याप्रकरणी मुद्रांक विक्रेता, नोटरी यांच्यासह सहाजणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत श्रीनिवास नारायण दंडी (रा. जोडभावी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तमन्ना मळसिध्द कांबळे (रा. संत रोहिदास नगर, शांती नगर, सोलापूर), नरेश दुडम (पत्ता माहित नाही), सिध्देश्वर उर्फ मल्लप्पा माळी (वय २८, रा. भाग्यलक्ष्मी शांती नगर, मजरेवाडी, सोलापूर), प्रताप सुर्यवंशी (रा. सोलापूर), एल पी देशपांडे (रा. सोलापूर) आदींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीनिवास दंडी यांची वडीलापार्जित मालकीची मजरेवाडी येथे जुना सर्व्हे नं. २५०/१ ब व नविन सर्व्हे नं. ५७/१/ब/१,२,४ पैकी बापूजी नगर मध्ये प्लॉट नं. ४५ एकूण क्षेत्रफळ १००० स्क्वेअर फुट ही जागा आहे. श्रीनिवास दंडी यांचे वडील नारायण नरसय्या दंडी हे ३० डिसेंबर २०१० रोजी मयत झालेले आहेत. दंडी यांची जागा बळकविण्यासाठी त्यांचे वडील मयत झालेले असतानाही तमन्ना कांबळे याने १० मार्च २०१४ रोजी मुद्रांक विक्रेता प्रताप सूर्यवंशी याच्याकडून जुना पूर्व तारीखेचा १०० रूपयांचा स्टॅम्प पेपर घेऊन तो घेण्यासाठी त्यावर दंडी यांच्या वडीलांऐवजी दुसऱ्याच कोणाचा तरी अंगठ्याचा ठसा घेतला. १२ मार्च २०१४ रोजी नोटरी कब्जापावती व करारपत्र केल्याचे दाखवून दंडी यांच्या वडीलांच्या जागी दुसऱ्याच व्यक्तीचा फोटो लावला व लिहून देणार म्हणून वडीलांच्या बनावट अंगठ्याचा ठासा उमठविला. नोटरी कब्जापावतीवर मिनया राजू गुल्लापल्ली व जयप्रकाश नारायण अनलदारस यांची सही घेऊन व त्या नोटरी कब्जापावतीवर दंडी यांच्या वडीलांचे नावाचे बनावट



आधारकार्डची छायांकित प्रत जोडून त्यावर दुसऱ्याच व्यक्तीचा अंगठा घेऊन नोटरी ॲड. एल पी देशपांडे यांच्याकरवी जुन्या तारखेची नोटरी कब्जापावती व करारपत्र करून घेतले. त्या नोटरीच्या आधारे मिळकतीवर नोंद लावण्यासाठी कांबळे याने महानगरपालिकेत हस्तांतरण शुल्क भरून जागेवर शेड उभा करून अतिक्रमण केले आहे. ते शेड काढण्यासाठी सांगितल्यानंतर कांबळे याने दंडी यांस दमदाटी केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.

# पत्नीचा छळ करून मुलांना ठार मारण्याची धमकी देणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे -**

सोलापूर - पत्नीचा छळ करून मुलांना ठार मारण्याची धमकी देणाऱ्या पतीवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनुराधा निवृत्त थोरात (वय २३, रा. रमाबाई आंबेडकर नगर, आम्रपाली चौक, सिटी बस डेपो पाठीमागे, सोलापूर, कायम पत्ता - चाकण, नाणेकरवाडी, गवते वस्ती, नाशिक रोड, पुणे) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन निवृत्ती शामराव थोरात (रा. चाकण, नाणेकरवाडी, गवते वस्ती, नाशिक रोड, पुणे) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ जून २०२० पासून १५ मे २०२५ पर्यंत अनुराधा या पतीसमवेत सासरी नांदत होत्या. त्या कालावधीत पती निवृत्ती याने अनुराधा यांचा मानसिक छह करून घालून पाडून बोलून अपमानास्पद वागणूक दिली. तसेच माहेरून हुंडा आण नाही तर तुला नांदविणार नाही असे म्हणून जाचहाट केला. तसेच तुला दोन मुली कशा झाल्या, मला मुलगा हवा होता असे म्हणून मारहाण करून दोन्ही मुलींना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार शेख पुढील तपास करीत आहेत.

# कुरुल शाखेतून सीना नदीत पाणी सोडले; शेतकऱ्यांमध्ये आनंद

## आ. सुभाष देशमुख यांच्या आंदोलनाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे-**

उजनी धरणातील पाणी कुरुल शाखेतून बुधवारी सायंकाळी सीना नदीत सोडण्यात आले. दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांनी मंगळवारी केलेल्या धरणे आंदोलनाला अखेर यश आले.

जलसंपदा विभागाने यापूर्वी १२ मे रोजी सीना नदीत पाणी सोडण्यात येईल, असे लेखी पत्र नदीकाठच्या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना दिले होते. मात्र, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता सु.स. खांडेकर यांनी उजनी धरणातील पाणी पातळी घटल्याने सीना नदीत पाणी सोडण्याबाबत असमर्थता व्यक्त केली होती. ठरलेल्या वेळेत पाणी न सोडल्याने बुधवारी आ. सुभाष देशमुख यांनी शेतकऱ्यांसोबत सिंचन भवनसमोर धरणे आंदोलन केले. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी थेट बोलणी करून आ. देशमुख यांनी सीना



नदीत पाणी सोडण्याची विनंती केली होती. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यासंदर्भात अधीक्षक अभियंता सु. स. खांडेकर यांच्याशी चर्चा करत पाणी सोडण्याबाबत मध्यस्थी केली. उजनी धरणाच्या पाणीपातळीचा अहवाला अधीक्षक अभियंत्यांनी जलसंपदामंत्र्याकडे तातडीने सादर केला, त्यानंतर कुरुला कालव्यातून पाणी सोडण्याचे आदेश देण्यात आले. बुधवारी सकाळी ११ वाजता कुरुला शाखा कालव्यातून महादेव ओढ्याच्या माध्यमातून पाणी सोडले जाणार होते, काही तांत्रिक अडचणीमुळे बुधवारी सायंकाळी पाणी सोडण्यात आले.

तिऱ्हे परिसरातील शेतकऱ्यांनी महादेव ओढ्यात पाणी सोडण्याचे प्रत्यक्ष पाहिले त्यानंतरचा सुटकेचा निःश्वास सोडला. पाणी सोडल्याने सीना काठावरील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. सध्या धरणाची पाणी पातळी वजा २२.९६ टक्के असून येत्या २५ मेपर्यंत सीना नदीतील पाण्याचा प्रवाह सुरू राहील. धरणापासून १२६ किमीपर्यंतच्या कालव्यानजीकचा वीजपुरवठा केवळ चार तास करण्यात आला आहे.

# डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणी मनिषा मानेला २७ मे पर्यंत पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मे -**

एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक तथा प्रसिध्द मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोन दिवसाच्या पोलिस कोठडीत असलेल्या मनिषा माने-मुसळे या महिलेस न्यायदंडाधिकारी एस एन रथकंठवार यांनी २७ मे पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

मनिषा महेश माने उर्फ मुसळे (वय ४५, रा. ८०, बसवराज नेले नगर, जुळे सोलापूर) असे न्यायालयीन कोठडी मिळालेल्या महिलेचे नाव आहे. मेंदू विकार तज्ञ डॉ. शिरीष पद्माकर वळसंगकर (वय ७०, रा. १५८ सी, रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी १८ एप्रिल २०२५ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातील स्वतःच्या बेडरूमला अटॅच असलेल्या बाथरूममध्ये स्वतःच्या परवाना असलेल्या पिस्टलमधून कानशिलामध्ये गोळी घालून घेऊन आत्महत्या केली आहे. डॉ. वळसंगकर यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीनुसार, ज्या माणसाला मी शिकवून आज ए ओ केले आहे आणि चांगला पगार देतो आहे, त्याने खोटारडे आणि घाणेरडे आरोप करून मला धमकावले आहे, त्याचे मला आतीव दुःख आणि म्हणून मी माझे जीवन संपवत आहे, असे लिहून आत्महत्या केली. त्यामुळे याप्रकरणी डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर (वय ४५, रा. एस पी इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस, वळसंगकर हॉस्पीटल, मोदी रेल्वे क्रॉसींग,



सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मनिष माने-मुसळे हिच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी मनिषा मानेला अटक केली आहे.

मनिषा मानेला अटक केल्यानंतर पोलिसांनी न्यायालयाकडून तिची ५ दिवसाची पोलिस कोठडी घेण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांचे पोलिस कोठडीचे हक्क अबाधित ठेवत तिची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती. परंतु, सदर बझार पोलिसांनी मनिषा मानेला न्यायालयाच्या परवानगीने जेलमधून ताब्यात घेऊन दोन दिवस पोलिस कोठडी घेतली होती. त्या पोलिस कोठडीची मुदत गुरुवारी संपल्याने मनिषा मानेला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी न्यायालयाने तिला न्यायालयीन कोठडी सुनावली.

या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक अजित लकडे करीत आहेत. याप्रकरणात सरकारच्यावतीने ॲड. श्रीमती मांजरे यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. प्रशांत नवगिरे काम पाहात आहेत.

# जिजामाता नगरातील एमएसईबी ऑफीसमध्ये तोडफोड

## ७ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे-**

लाईट गेल्याने जिजामाता नगरातील एमएसईबी ऑफीसमध्ये तोडफोड करणाऱ्या ७ जणांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एमएसईबीचे कर्मचारी संतोष चंद्रकांत कुंभार (वय ३०, रा. प्रियंका नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सिध्दू वास्ते (वय २२, रा. ताई चौक, सोलापूर), नितीन सोनंद (वय ३२, रा. वेणुगोपाल नगर, सोलापूर), विनायक (वय २८, रा. स्वागत नगर, सोलापूर), नितीन पंजाबी (वय ३५), राहुल चौधरी (वय ३५), सिध्दू जवळकोटे (वय ४०), नंदकुमार शिवाजी शिंदे (वय २८, रा. स्वागत नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ मे रोजी रात्री ताई चौक, वेणूगोपाल नगर, स्वागत नगर आदी परिसरातील लाईट गेली होती. त्यामुळे चिडलेल्या वरील सर्वांनी रात्री साडेआकराच्या सुमारास जिजामाता नगरातील एमएसईबी कार्यालयात गेले होते. त्याठिकाणी मागील चार तासापासून आमच्या परिसरातील लाईट गेलेली आहे, तुम्ही काय करता, तुम्हांला दिवसा काम करून घेता येत नाही का असे म्हणून कर्मचारी संतोष कुंभार यांना दमदाटी करून शिवीगाळ केली. तसेच ऑफीसमधील कुंभार यांच्या हातातील मोबाईल घेऊन फेकून दिला व ऑफीसमधील कॉम्प्युटर, सीसीटीव्ही कॅमेरा, लाकडी शिडी, खिडकी, प्लास्टीक खुर्च्या, प्रिंटर, पाण्याचे जार या वस्तूंची तोडफोड करून नुकसान केले. म्हणून याप्रकरणी सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.

# साऱ्या जगाचा जगद्गुरु एकमेव भारतच

## काशी पिठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी : संतांचा व शिवयोगींच्या वैभवशाली इतिहासामुळे भारताला जगद्गुरुचे स्थान

### श्री संत शिवदास कृत सिद्धराम चरित्र ग्रंथाचे थाटात प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे**

आपला भारत देश हा अनेक संत महात्मे आणि जगद्गुरु यांचा बनलेला आहे. संतांची भूमी ही तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध पावते. त्यामुळे भारत हा सर्व जगाचा जगतगुरु म्हणून प्रसिद्ध झाला आहे. अष्टसिद्धी प्राप्त झालेले हे शिवयोगी श्रीसिद्धरामेश्वर आहेत. सिद्धरामेश्वर हे साक्षात शिवाचे अवतार असून त्यांची महिमा अपरंपार आहे. त्यांनी बालपणी मल्लिकार्जुन यांच्याशी संवाद साधला. मल्लिकार्जुन श्रीशैल डोंगर सोडून आपल्या भक्तासाठी सोलापुरात आले. म्हणून सोलापुर साक्षात श्रीशैल झाले आहे. मुक्तीसाठी देवदर्शनासाठी सोलापूर हे तीर्थक्षेत्र बनले आहे, असे प्रतिपादन काशी पिठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांनी केले.

श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरात महानंदा मल्लिनाथ टेंगळेस्वामी परिवार आयोजित आलेल्या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यात काशी जगद्गुरु बोलत होते. ते म्हणाले, भारत तसेच महाराष्ट्र आणि त्यामध्ये येणारे सोलापूर हे एक अनन्यसाधारण असे तीर्थक्षेत्र बनले आहे. जिथे जिथे संतांचा वास असतो ते स्थळ तीर्थक्षेत्र बनते. सोलापूरच्या पावन नगरीत श्री सिद्धरामेश्वर महाराजांचा जन्म झाला. सोलापूरकरांना साक्षात भू कैलास प्राप्त झाले. देवदर्शनासाठी लोकांना कोठे ही जाऊ नये म्हणून सिद्धरामेश्वरांनी शहरात ६८ शिवलिंगाची स्थापना केली. त्यामुळे सोलापूर हे भू कैलास म्हणून पावन झाला. श्रीसिद्धरामेश्वरांचे चरित्र कळण्यासाठी कवी शिवदास यांनी मराठीत चरित्र अनुवादन केले. कर्नाटकटातील गुंटूरमध्ये देखील श्री सिद्धरामेश्वरांचे मंदिर आहे.



**नवयुवक लोधी समाज सामुदायिक विवाह संस्थेचा सत्कार**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची प्रेरणा घेऊन शहरातील लोधी समाजाच्या वतीने २००९ सालापासून सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाते. या उत्कृष्ट कार्याबद्दल श्री काशी जगद्गुरूंच्या हस्ते नवयुवक लोधी सामुदायिक विवाह सोहळ्याचे अध्यक्ष नागनाथ शिवसिंगवाले यांचा विशेष असा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील कार्यासाठी जगद्गुरुंनी शुभशीर्वाद प्रदान केले.

सिद्धरामेश्वर महाराजांची महिमा लोकांना कळेल त्यांचे विचार प्रसिद्ध व्हावेत. सोलापूरचे ग्रामदैवत म्हणून सिमित ठेवू नका, सर्वांना वाटले पाहिजे की, सिद्धरामेश्वर हे विश्वाराध्य आहेत. सर्वदूर पोहोचले पाहिजे. श्रीसिद्धरामेश्वर यांचे महत्व कळावे, यासाठी सर्व विद्वानांना एकत्रित करून सिद्धरामेश्वर महाराजांच्या आचार विचारांचे मंथन करावे असे आदेश देत आहोत. बहुजन हिताय बहुजन सुखाय पद्धतीने कार्यक्रम संपन्न झाला असून, या ग्रंथांचे घराघरात पारायण करण्यात यावे. दिव्य सोलापुरात आणखीन असेच पवित्र कार्य घडावेत, असे आशीर्वचन काशी जगद्गुरु चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांनी ग्रंथ प्रकाशन समारंभात केले. श्री संत शिवदास कृत श्री सिद्धराम चरित्र ग्रंथ प्रकाशन समारंभास श्री काशी जगद्गुरु यांचे दिव्यसानिध्य लाभले. यावेळी व्यासपीठावर वेदमूर्ती बसवराज शास्त्री हिरेमठ, विजय महातेंश्वर शिवाचार्य महास्वामी, मनीकंठ दहिवडकर शिवाचार्य महास्वामी, सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, ग्रंथ प्रकाशक आणि आयोजक मल्लिनाथ टेंगळे स्वामी, महानंदा टेंगळे स्वामी, वीरशैव मराठी साहित्याचे अभ्यासक अनिल सर्जे, सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ सुरेश स्वामी, उर्मिला टेंगळेस्वामी, राजशेखर टेंगळेस्वामी, सुरेखा टेंगळेस्वामी, चंद्रशेखर टेंगळेस्वामी, शांता टेंगळेस्वामी, नागेश टेंगळे स्वामी व गणेचारी स्वामी परिवारातील सदस्य उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रकाशक तथा आयोजक महानंदा मल्लिनाथ टेंगळे स्वामी यांच्या श्री संत शिवदास कृत श्री सिद्धराम चरित्र या महाग्रंथाचे प्रकाशन श्रीकाशी जगद्गुरूंच्या अमृत हस्ते मोठ्या प्रसन्नतेच्या वातावरणात करण्यात आले. सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ इरेश स्वामी सिद्धरामेश्वर पुराण कथासागरचे प्रकाशन देखील जगद्गुरूंच्या हस्ते करण्यात आले. प्रकाशन समारंभ नंतर कार्यक्रमास दिव्य सानिध्य प्राप्त झालेल्या श्री काशी जगद्गुरु डॉ चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांचे विशेष सन्मान करण्यात आले. वस्त्र व मालार्पण करत टेंगळेस्वामी दाम्पत्यांनी शुभाशीर्वाद घेतले.प्रास्ताविक रेवणसिद्ध वाडकर यांनी केले तर सूत्रसंचालन बळसुरे यांनी केले.

### ग्रंथ प्रकाशनसाठी दोन वर्षांचा कार्यकाळ लागला

पुरातन काळातील श्री संत शिवदास कवी सादर श्री सिद्धराम चरित्र या ग्रंथाचे कन्नड मधील अनुवाद मराठीत करण्यासाठी दोन वर्षांचा कार्यकाळा लागला. ग्रंथाचे संपूर्ण आकलन आणि संकलन करून त्याचे अनुवाद करण्यात आले. हा ग्रंथ पुरातन काळातील असून त्याचे पावित्र्य कायम आहे. या ग्रंथाच्या पारायणाने नक्कीच अनेक माध्यम साध्य होतात. त्याचे ज्वलंत उदाहरण आमच्या परिवारात दिसून येते. त्यामुळे सर्व भक्तांना या ग्रंथाचे पारायण करण्यासाठी मराठी मध्ये अनुवाद करण्यात आलेला आहे.

**- महानंदा मल्लिनाथ टेंगळे स्वामी,**
**प्रकाशक तथा अनुवादक**

शुक्रवार, १६ मे २०२५
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १११७

**गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ ।**
**मिळाल्या वोहाळ गंगा ओघ ।।**

चांगले आणि वाईट या दोन विषयांची तुलना समाजात सातत्याने होत असते. प्रामुख्याने या तुलनेत माणूस वाईटावरच भर देत असतो. माणूस वाईटात वाईट पाहतोच, पण बहूतांश वेळा चांगल्यातही वाईट पाहतो. आपल्यासमोर किती चांगले आहे, हे पाहण्याऐवजी या चांगुलपणात कांही वाईट आहे का? याचा शोध माणूस घेत असतो. चंद्र अंधारात प्रकाश देतो, उष्णतेमध्ये थंडावा देतो याचा विचार करण्याऐवजी माणूस त्याच्या डागाकडे पाहतो. सूर्यामुळे छान प्रकाश मिळतो, जीवसृष्टी त्या प्रकाशात आपला व्यवहार करते. याचा विचार न करता माणूस सूर्य प्रखर आहे, तो आग ओकतो. त्या आगीचा जीवमात्रांना त्रास होतो, असा विचार करतो. डोंगर-दऱ्या निसर्गाचे सौंदर्य वाढवतात, वातावरण चांगले ठेवतात याचा विचार करण्याऐवजी माणूस त्यातील खाच खळग्यांचा विचार करतो. अर्थात चांगल्या गोष्टी, वस्तू, घटनांमध्ये नकारात्मकता पाहण्याची मानवी वृत्ती आहे. गाय ही अतिपवित्र मानली जाते. तेहतीस कोटी देव-देवता एका गायीमध्ये वास्तव्य करुन असल्याचे मानणारा माणूस ती तोंडाने घाण खाते, याकडे लक्ष घालतो. गंगा अतिपवित्र म्हणून तिचे तीर्थ घेतांना गंगेत, ओढे मिसळल्याची आठवण माणूस करतो. याबददल सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ । मिळाल्या वोहाळ गंगा ओघ ।।



चांगल्यात वाईट पाहण्यापेक्षा वाईटात चांगले पहायला हवे. कधी-कधी वाईटसुध्दा चांगल्यांच्या सहवासामुळे चांगला होऊ शकतो. त्यामुळे अशा चांगल्या लोकांना प्रोत्साहन द्यायला हवे. चांगल्यांना वाईटपणाची आठवण दिली तर एखाद्यावेळी पून्हा ते वाईटाकडे वळू शकतात. पण वाईटांना त्यांच्यातील चांगलेपणाची आठवण दिली तर ते चांगल्याकडे वळू शकतात. अर्थात आपली सकारात्मक दृष्टी चांगुलपणात भर घालणारी ठरु शकते. त्याचबरोबर आपण नकारात्मक दृष्टीने वागलो तर वाईटात वृध्दी होऊ शकते. वाईटात वाईट आणि चांगल्यातही वाईटच पाहणारा माणूस स्वत:च वाईट असतो, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. संत-माहत्म्यांनी कधीही कोणामध्ये वाईट पाहिले नाही. प्रत्येक वाईटातही त्यांनी चांगुलपणा पाहिला. त्या चांगुलपणाला वृध्दींगत करण्याचा त्यांचा प्रयत्न वाईटांना चांगले करण्यात यशस्वी झाला. मुळात कोणीही वाईट नसतो किंवा कोणालाही वाईट आवडत नसते. परिस्थिती, सहवास माणसाला वाईट मार्गावर नेत असतो. परिस्थितीनुरुप वाईट मार्गावर जाणाऱ्याला त्याच्यातील गुणांची, चांगुलपणाची आठवण देण्याची गरज असतांना माणूस त्याला त्याचे वाईट गुण आठवण करु देतो. त्याच्याकडे पाहण्याची आपली दृष्टी बदलतो. त्यामुळे वाईटाला कोणाबद्दल आवड राहात नाही. कसेही वागलो तर समाज नांवच ठेवणार असेल तर आपण वाईटच का वागू नये? अशी त्याची मनोवृत्ती तयार होते. त्याच्या या मनोवृत्तीला कदाचित आपणही कारणीभूत होऊ शकतो. कोणत्याही परिस्थितीत आपल्या स्वभावामुळे किंवा वर्तनामुळे कोणाच्याही वाईट वृत्तीत भर पडणार नाही, याची दक्षता आपण घ्यावी. आपल्या वर्तनामुळे एखादा वाईट व्यक्ती चांगला झाला नाही तरी चालेल पण कोणत्याही परीस्थितीत एखादा चांगला व्यक्ती वाईट होता कामा नये. यासाठी आपण कोणाकडेही नकारात्मक दृष्टीने पाहू नये.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - संकष्ट चतुर्थी |
| दि. १६ मे २०२५ | श्री बिरदेव जन्मोत्सव, |
| विक्रम संवत् २०८१ | ता.हणकणंगले, शुभ दिवस |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. तृतीया (२८.०२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मूळ (१६.०७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्द (०७.१३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१६.४१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील.

**वृषभ** : विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन** : काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क** : स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह** : लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे.

**कन्या** : चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे.

**तुळ** : मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक** : राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु** : आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर** :जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ** : आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन**: योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका.

# पीक कर्जाबाबत जिल्हाधिकारी गंभीर

● जिल्ह्याला ५ हजार २०० कोटीचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट

✔ जिल्ह्याचा संभाव्य वित्त पुरवठा आराखडा २२ हजार ४०० कोटीचा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ मे-**

सन २०२४- २५ या आर्थिक वर्षात सोलापूर जिल्ह्यातील सर्व बँकांना एकूण ४५९९ कोटी ९३ लाखाचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते तर बँकांनी ४ हजार ७५९ कोटी ६९ लाख इतका कर्ज पुरवठा करून उद्दिष्टापेक्षा अधिक काम केलेले आहे. त्याचप्रमाणेच यावर्षीही रब्बी व खरीप हंगामासाठी देण्यात आलेले पाच हजार दोनशे कोटीचे पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट सर्व बँकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. तसेच बँकांनी एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही यासाठी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय पुनर्लोकन समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमराजे निंबाळकर, आरबीआयचे जिल्हा अग्रणी बँक अधिकारी अक्षय गोंदेवार, नाबार्ड चे जिल्हा व्यवस्थापक नितीन शेळके, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे, आरसेटी संचालक दीपक वडेवाले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यस्थापक संतोष कोलते, यांचेसह सर्व शासकीय महामंडळाचे व्यवस्थापक तसेच सर्व बँकाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की सर्व बँकांनी पीक कर्ज व कृषी क्षेत्राला वित्त पुरवठा करताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. पीक कर्जाचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढावे. यावर्षीच्या हंगामात एकाही शेतकऱ्याचा बँका पीक कर्ज देत नाहीत यासाठी प्रशासनाकडे तक्रार येऊ नये यासाठी खबरदारी घ्यावी असेही त्यांनी सूचित केले.

यावर्षीच्या वार्षिक वित्तपुरवठा आराखड्यात खरीप पिकासाठी २ हजार ८५९ कोटी २१ लाख तर रब्बी हंगामासाठी २ हजार ३४० कोटी ७९ लाख रुपये जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वितरित करण्याचे बँकांना उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बँकांनी प्रयत्न करावेत असेही त्यांनी सूचीत केले. या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील सर्व बँकांची प्रत्येक महिन्याला पीक कर्ज वाटप, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम तसेच अन्य महत्वपूर्ण शासन पुरस्कार योजनांसाठी बैठका घेण्यात येतील. त्यावेळी सर्व बँकांनी त्यांना पीक कर्ज कृषी क्षेत्रात तसेच शासन पुरस्कृत योजना साठी कर्ज पुरवठा करण्याचे देण्यात आलेले उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करावेत. ज्या बँका शासन पुरस्कृत योजनांसाठी वित्त पुरवठा करणार नाहीत अशा बँकाबाबत आरबीआय कडे तसेच राज्यस्तरीय पुनर्लोकन समितीकडे अहवाल पाठवण्यात येईल असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सुचित केले.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी प्रत्येक बँकांनी व जिल्ह्यातील त्यांच्या प्रत्येक शाखेच्या दर्शनी भागात स्केल ऑफ फायनान्स चा होर्डिंग लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील एकही शेतकरी पेरणीसाठी आवश्यक पैशाची तरतूद करण्यासाठी खाजगी सावकाराकडे गेला नाही पाहिजे याची जबाबदारी बँकाची असल्याचे त्यांनी सुचित केले. या ठिकाणी अनेक बँकांचे अधिकारी चुकीची आकडेवारी सादर करत आहे तरी पुढील बैठकीला येताना सर्व बँकर्सनी अत्यंत काटेकोर माहिती समितीला सादर केली पाहिजे याबाबत दक्षता घ्यावी. राष्ट्रीयकृत बँकांनी नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या खातेदारांना व्याजदरातील सवलतीचा लाभ मिळवून देण्याबाबत मार्गदर्शन करावे यासाठी जिल्हा सहकारी संस्थांचे उपनिबंधक यांनी लक्ष घालावे असेही त्यांनी सुचित केले.आरसेटी चे संचालक दीपक वडेवाले यांनी मागील आर्थिक वर्षात जिल्ह्यातील बाराशे लोकांना प्रशिक्षण देऊन त्यांना व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आलेले आहे यातील ७० टक्के लोकांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली. सर्व बँकांनी पीक कर्ज वाटप तसेच शासन पुरस्कृत योजनांसाठी दिलेल्या उद्दिष्ट प्रमाणे वित्तपुरवठा करण्यात येईल असे सांगितले. प्रारंभी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे यांनी जिल्ह्याचा सन २०२४- २५ चा वार्षिक वित्तपुरवठा शंभर टक्के पूर्ण झाल्याची माहिती दिली. तसेच मागील वर्षी खरीप व रब्बी हंगामातील पीक कर्ज वाटप १००% पेक्षा अधिक झाल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच वार्षिक वित्तपुरवठा आराखडा उद्दिष्ट २०२७० कोटी ४२ लाख इतके होते तर २१ हजार २९७ कोटी ४८ लाख इतके उद्दिष्ट पूर्तता झालेली असून यावर्षीचा वार्षिक वित्तपुरवठा आराखडा २२ हजार ४०० कोटीचा असून खरीप व रब्बी पीक कर्जासाठी एकूण पाच हजार दोनशे कोटीची तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

# शहरातील नागरिकांना मोबाईल ॲप, वेबसाईटवर नोंदविता येणार तक्रार

✔ आयुक्त डॉ.ओम्बासे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ मे-**

सोलापूर महापालिकेच्या १ ते ८ विभागीय कार्यालयातील नागरिकांना देण्यात येणा-या रस्ता, पाणी , ड्रेनेज , स्ट्रीट लाईट , स्वच्छता , होर्डिंग या संदर्भातील तक्रारी आता प्रायोगिक तत्वावर ऑनलाईन स्वरुपात महापालिकेच्या मोबाईल ॲप , वेबसाईटवर नोंदविता येणार येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी दिली.

तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाईन स्वरुपात प्रायोगिक तत्वावर महापालिकेच्या वतीने लिंक व प उपलब्ध करण्यात आला आहे. तक्रार करण्यासाठी वेबसाईट लिंक https://complaint.solapurcorporation.org २) मोबाईल ॲप mysolapur हा आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या WWW.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर डाऊनलोड लिंक होम पेजवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या माध्यमातून सुध्दा आपण तक्रारी करु शकता. याशिवाय नागरिकांना महापालिकेच्या Toll free पे. (१८०० २३३ १९१६) ला कॉल करुन देखील तक्रार नोंदविता येणार आहे.

रस्ता, पाणी , ड्रेनेज , स्ट्रीट लाईट , स्वच्छता , होर्डिंग संदर्भातील तक्रारींची सद्यस्थिती पाहण्याकरिता त्यांच्या डॅशबोर्डवर नागरिकांना उपलब्ध केलेली आहे. नागरिकांनी दिलेली तक्रार वेळेत निराकरण केले असल्यास तक्रारींचे रेटिंग (गुण) देता येणार आहे व निराकरणाने समाधान झालेले नसल्यास वरिष्ठांकडे तक्रार पाठविता येणार आहे. सोलापूर शहरातील नागरिकांनी मोबाईल ॲप व वेबसाईटच्या माध्यमातून तक्रारी कराव्यात त्याचबरोबर या प व वेबसाईट संदर्भात काही सूचना असल्यास कळवावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

# मुस्लिम समाजातर्फे हिंदू गुणवंतांचा सत्कार

हा कार्यक्रम एकोपा बंधुभावाचा आदर्श : एम.राज कुमार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ मे-**

स्पर्धा परीक्षेतील यशस्वी गुणवंतांचा सत्कार म्हणजे हिंदू मुस्लिम एकोपा बंधुभावाचा आदर्श आहे याचा अभिमान वाटतो, असे मत पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी व्यक्त केले.

कुल जमाते तंजिम आणि छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी परीक्षेत राज्यात द्वितीय आलेले परिस सुरेश गायकवाड, मुलींमध्ये राज्यात पहिली आलेल्या वैष्णवी राम गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी अबूबकर नदाफ यांचा सत्कार केएमसी गार्डन येथे मौलाना ताहीर बेग यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांच्या झाला. यावेळी माजी प्राचार्य डॉ. एम.ए.दलाल, निवृत्त पोलिस उपअधीक्षक इक्बाल शेख, अस्मिता गायकवाड, मराठा सेवा संघाचे राम गायकवाड, जेल रोड पोलिस ठाण्याचे निरीक्षक शिवाजी राऊत, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष मतीन बागवान, माजी महापौर आरिफ शेख, युवराज पवार, याकुब मंगलगिरी, अलिम सय्यद, समिऊल्ला शेख, हासिब नदाफ, राजा बागवान, मुजीब सय्यद, अल्ताफ लिंबूवाले, अजिज कोटी, लतिफ शाब्दी, वाहिद विजापूरे, हेमंत ढवळशंक, फय्याज बागवान, इम्तियाज कमिशनर, फारुख मटगे, इलियास आदिल, काशिम बेलिफ वजाहत अ. सत्तार, म. शफीक रचभरे, राजू हुंडेकरी, मुबिन शेख, जावेद बद्दी, तन्वीर गुलजार उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांसमवेत

# असोसिएशन ऑफ सेल्फ फायनान्स इन्स्टिट्युटस्‌ची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ मे-**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या समवेत असोसिएशन ऑफ सेल्फ फायनान्स इन्स्टिट्युटस् या राज्य संघटनेच्या झालेल्या बैठकीत विविध विषयांवर समाधानकारक चर्चा झाली. संबंधित विभागाला आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ईडब्ल्यूएस आरक्षण सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना समान पद्धतीने राबविणे. अंतिम गुणवत्ता यादीनंतर राबवली जाणारी व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया एकसारखी असावी. सीईटी ची संख्या कमी करण्यात यावी. अनुसूचित जातीची पोस्ट मेट्रिक शिष्यवृत्ती (केंद्र सरकार) योजना सुलभ करावी. महा-डिबीटी वरील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सोपी करावी. सीईटीचे विद्यार्थी संपल्यानंतर रिकाम्या जागी नॉन सीईटी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची मुभा मिळावी. खाजगी विद्यापीठे व विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयांची प्रवेशाची तारीख एकच असावी. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दिल्या जाणाऱ्या वसतिगृह भत्त्यात सर्व जाती धर्मासाठी एकसमानता असावी.शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची वाहतूक करणाऱ्या बसेस यांना एक समान टॅक्स असावा यासह विविध प्रश्न आणि समस्यांवर या बैठकीत चर्चा झाली. आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना मंत्री पाटील यांनी यावेळी दिल्या, असेही प्रा. झोळ यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस डॉ. आर. वाय. पाटील, डॉ. अमोल कुलकर्णी, डॉ. जी. के. देशमुख आदी उपस्थित होते.

# अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी विभागीय चौकशी प्रशिक्षण

✔ चौकशी प्रक्रियेतील महत्वाच्या मुद्द्यांवर झाले मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे विभागीय चौकशी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महापालिकेच्या आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते विभागीय चौकशी प्रशिक्षणाचे मार्गदर्शक करणारे निवृत्त सहसंचालक वित्त विभाग प्रा. हिंदुराव पवार यांचे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी प्रमुख मार्गदर्शक हिंदुराव पवार यांचा परिचय करून दिला.

यावेळी महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी आहेत त्यांचा सक्षमीकरण करण्यासाठी व तांत्रिक ज्ञान वापरता यावा यासाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विविध विषयावरती प्रशिक्षण कार्यशाळा सोलापूर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी आयोजित करण्यात येईल, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

त्यानंतर निवृत्त सहसंचालक वित्त विभाग प्रा. हिंदुराव पवार यांनी उपस्थिती असलेल्या सर्व वरिष्ठ अधिकारी अधिकारी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. यामध्ये शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना त्यांचे कर्तव्य पार पाडताना, कर्मचाऱ्याचे वर्तन कसे असावे यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ मध्ये काही तरतुदी ठरवून दिलेल्या आहेत. कार्यालयीन कामकाज किंवा कर्तव्य बजावितांना प्रशासकीय, लेखाविषयक व तांत्रिक स्वरूपाचे नियम, मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेले आहेत, या नियमांचा माहिती दिली. विभागीय चौकशी प्रक्रियेची माहिती प्रारंभिक चौकशी, दोषरोपपत्र, अहवाल चौकशी पूर्ण झाल्यावर कारवाई, विभागीय चौकशी प्रक्रियेतील महत्वाचे मुद्दे, विभागीय चौकशी प्रक्रियेचे फायदे, प्रशासकीय कामकाजात सुधारणा इत्यादी संदर्भात मार्गदर्शन केले.यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी, मुख्य लेखा अधिकारी रत्नराज जवळगेकर, उपायुक्त तैमुर मुलाणी, उपायुक्त किरणकुमार मोरे, सायक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहायक आयुक्त मनीषा मगर, विधान सल्लागार संध्या भाकरे, आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने,कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे यांच्या सह सर्व विभागीय अधिकारी त्याचबरोबर सर्व वरिष्ठ अधिकारी या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते.

# सोलापुरात उद्या प्रथमच रशिमरथीचे सादरीकरण

▶▶ काव्य, नृत्य आणि संगीतातील अद्वितीय मिलाफ अनुभवता येणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मे-**

राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर यांच्या अजरामर महाभारताच्या महाकाव्यावर आधारित रश्मिरथी प्रयोगाद्वारे शनिवार दि. १७ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात काव्य, नृत्य आणि संगीतातील अद्वितीय मिलाफ प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे, माहिती ममता बोल्ली यांनी पत्रकार परिषदेत दिली.



प्रभाव आणि जैद हसन यांच्या संयुक्त प्रस्तुतीत हा प्रयोग साकारला जात आहे. या प्रयोगाच्या सादरीकरणाद्वारे शहरातील काही तरुण रंगकर्मी एक वैचारिक, भावनिक आणि कलात्मक प्रवास रंगमंचावर घडवून आणत आहेत. रश्मिरथी - कर्णाच्या तेजस्वी जीवनगाथेवर आधारित एक सृजनशील प्रयोग आहे. यामध्ये काव्याभिवाचन, नृत्य आणि संगीतातील समर्पकतेचा अद्वितीय मिलाफ प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. या प्रयोगाचे दिग्दर्शन जैद हसन यांनी केले असून नृत्य दिग्दर्शन मनीषा जोशी आणि रिद्धी जोशी - देशपांडे यांनी केले आहे. सोलापूरच्या रंगभूमीवर रश्मिरथीचे सादरीकरण प्रथमच घडत आहे. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून सुहासिनी शहा उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी विजयकुमार साळुंखे, डॉ. केदारनाथ काळवणे यांचे सहकार्य लाभले आहे.

**हे आहेत प्रयोग सादरकर्ते**

- **अभिवाचन:** ममता बोल्ली, जैद हसन, चिदंबर अक्कल, अनिकेत जमदाडे,
- **गायन:** सलोनी पानपाटील, श्वेता म्हेत्रे,
- **रिदम:** विश्वजीत माने ,अद्वैत खेडकर, भरतेश तडवळकर
- **नृत्य:** अवनी जोशी, पूर्वा देशमुख , समृद्धी फडके, निवेदिता देशपांडे, अपूर्वा ओक, शरयू देशमुख,
- **सितार:** चारुदत्त तडवळकर,
- **सेट डिझ़ाइन:** प्रतीक तांदळे
- **पार्श्वसंगीत:** अनुद सरदेशमुख,
- **मार्केटिंग हेड :** धनराज बगले
- **प्रकाश योजना:** उमेश बटाणे

# चर्मकार समाज विकास मंडळातर्फे १ जूनला वधू-वर परिचय संमेलन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मे-**

येथील चर्मकार समाज विकास मंडळातर्फे रविवार दि. १ जून रोजी चर्मकार समाजातील उपवर युवक-युवती , घटस्फोटीत, विधवा-विधुर तसेच दिव्यांग वधू - वर परिचय संमेलन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य निमंत्रक तथा निवृत्त उप अभियंता राजशेखर जेऊरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जगदीशश्री गार्डन अँड लॉन्स, धर्मवीर संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) जवळ, विजापूर रोड,सोलापूर येथे सकाळी ९ ते दुपारी ४ च्या या वेळेत हा मेळावा होणार आहे. या मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून रायगडचे उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, धाराशिवचे निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव हे उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यासाठी सोलापूर शहरात ५ ठिकाणी व ग्रामीण भागात ३ ठिकाणी नोंदणी कक्ष स्थापन केले आहेत. याठिकाणी परिचय पत्र भरून नोंदणी करावी. तसेच व द्वारे ही नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. हा मेळावा पूर्णतः विनामूल्य असून यांचा लाभ सर्व समाज बांधवानी घ्यावा. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी मंडळाचे निमंत्रक परशुराम शिंदे (मो.९७३०८१३०४६) व श्री वामन धुळराव (मो. ९४२३३७६२२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन राजशेखर जेऊरकर आणि जेष्ठ मार्गदर्शक हरिदास टोणपे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस वामन धूळराव, परशुराम शिंदे, सुधीर बनसोडे, श्रीकांत मब्रुखाने , शिवपुत्र तोळनुरे, पौर्णिमा बसर्गीकर आदी उपस्थित होते.

महत्वाचे...



## वैराग येथे छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि १५ मे**

वैराग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची जयंती मोठ्या प्रमाणात संपन्न झाली .सकाळी प्रतिष्ठापना व पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी वैराग पोलीस स्टेशनचे निरीक्षक कुंदन गावडे , कोलते, किशोर ताटे, सुरेश जिरंगे, प्रथमेश आरके, अविनाश मद्रे यांनी परिश्रम घेतले यावेळी पत्रकार आनंद डुरे, शरीफ शेख ,संतोष बिर्गे ,अमृत चव्हाण प्रफुल्ल भालशंकर, संतोष खडके , दत्ता राऊत ,आनंद काशीद ,जितेंद्र गरड, भाऊसो रेड्डी, राहुल भालशंकर , दिलीप खेंदाड , उदय क्षीरसागर हे उपस्थित होते सायंकाळी महिलांनी पूजन केले वर्षा अंधारे, सोनिया गुप्ता ,अनिता कोंडारे , आशा आवारे इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र नाईक निंबाळकर यांनी केले व आभार सरकार नाईक निंबाळकर यांनी मानले.



## बधिर मूक विद्यालयाचे दहावीत उज्वल यश

**बार्शी, दि.१५ मे -**

येथील इंडियन रेडक्रॉस सोसायटी उपशाखा बार्शी संचलित बधिर मूक विद्यालयात दहावीसाठी बहिस्थ म्हणून बसलेल्या १३ विद्यार्थ्यांचा ९३ टक्के निकाल लागला. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष अतुल सोनीग्रा, सचिव संतोष सूर्यवंशी व मुख्याध्यापक मुळे यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.



## बार्शीत श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**बार्शी, दि.१५ मे-**

हिंदवी स्वराज्याचे व्दितीय छत्रपती स्वराज्यरक्षक श्रीमान योगी परम आदरणीय श्रीमंत छत्रपती संभाजीमहाराज यांच्या जयंतीनिमित्त आज शिवसृष्टी येथे श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचायतराज व ग्रामविकास विभाग भाजपा बार्शी विभागप्रमुख हेमंत रातंजनकर, शहराध्यक्ष शिल्पा कांबळे आणि शहर पदाधिकारी लक्ष्मीकांत कुलकर्णी, प्रणव रणदिवे, विवेक कुलकर्णी तसेच मान्यवर नंदकुमार माळवदे यांचे उपस्थितीत जयंती साजरी करण्यात आली.

## ‘मेघदूत’ पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठवा

**बार्शी, दि. १५ मे-**

येथील कवी कालिदास मंडळाच्यावतीने कालिदास महोत्सवाचे औचित्य साधून कवीच्या पहिल्या संग्रहास ‘मेघदूत’ पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. या मेघदूत पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठविण्याचे आवाहन कवी कालिदास मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र इकारे यांनी केले आहे. जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहास यावर्षी जून मध्ये संपन्न होणाऱ्या कालिदास महोत्सवामध्ये ‘मेघदूत’ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. प्राप्त झालेल्या संग्रहातून दोन संग्रहांची निवड या पुरस्कारासाठी केली जाणार आहे. कवी कालिदास मंडळ, बार्शी हे मेघदूत पुरस्कार साहित्यिक पं. ना. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ कवी मुकुंदराज कुलकर्णी यांच्यावतीने व ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश गव्हाणे यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून कवींनी दि.१० जूनपर्यंत काव्यसंग्रहाच्या तीन प्रती, स्वतःचे छायाचित्र व अल्पपरिचय यासह प्रकाश गव्हाणे, ईश्वरी अभ्यासिका, पाटील प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी, जिल्हा सोलापूर पिन ४१३४११ येथे पाठवाव्यात. यावेळी दत्ता गोसावी, प्रा. अशोक वाघमारे, सुमन चंद्रशेखर, डॉ. कृष्णा मस्तुद, जयसिंग राजपूत, चन्नबसवेश्वर ढवण, आबासाहेब घावटे, डॉ. रविराज फुरडे, शिवानंद चंद्रशेखर, गंगाधर अहिरे आदी उपस्थित होते.



## लहुजी शक्ती सेनेच्यावतीने ग्रामीण रुग्णालयात फळे वाटप

**अक्कलकोट, दि. १५ मे-**

लहुजी शक्ती सेनेच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. डॉ. सतीश बिराजदार, डॉ. निखिल क्षिरसागर , डॉ.बागल, सिस्टर वाघमारे, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख वसंत देडे, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष नागेश जाधव, तालुका संघटक कृष्णा पाटोळे, तालुका उपाध्यक्ष अनिल झंपले, सहसंघटक शंकर हतागळे, लहुजी शक्ती सेनेचे स्टार प्रचारक ज्ञानेश्वर कांबळे, शुभम महापुरे, पृथ्वीराज नाईकनवरे, विशाल पात्रे, समर्थ देवकुळे आदी सह रुग्ण उपस्थित होते.

# सरसकट कर्जमाफीसाठी ‘छावा’ करणार आंदोलन

### छावा क्रांतिवीर सेनेचे ११ वे महाधिवेशन पंढरपूरात संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ मे -**

राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे. अन्यथा छावा क्रांतिवीर सेना महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरेल आणि हे आंदोलन केवळ निदर्शने न राहता राज्यकर्त्यांची झोप उडवेल असा सज्जड इशारा छावा क्रांतीवीर सेनेचे अध्यक्ष करण गायकर यांनी दिला.




छावा क्रांतिवीर सेनेचे ११ वे महाधिवेशन पंढरपूरात पार पडले. या वेळी श्री.गायकर बोलत होते. अध्यक्षस्थानी कामगार नेते अभिजीत राणे होते. माजी राज्यमंत्री दर्जा रविकांत तुपकर यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महामंडलेश्वर स्वामी शनिभक्त संत सुखदेव महाराज, भाजपा प्रवक्ते अजित चव्हाण, आमदार समाधान अवताडे, आमदार अभिजीत आबा पाटील, मराठा नेते गंगाधर नाना काळकुटे, शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष समाधान काळे, अक्कासाहेब मोहिते पाटील, यशराज साळुंखे पाटील, शहाजी साळुंखे, राजाभाऊ माने, शेतकरी नेते समाधान फाटे, नवनाथ माने, संतोष ननवरे आदींसह छावा क्रांतीवीर सेनेचे सर्व विभागीय, जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांसह छावासैनिक उपस्थित होते. शेतकरी आघाडी प्रदेशाध्यक्ष गणेश माने यांनी प्रास्ताविक केले. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष हर्षद भोसले यांनी आभार मानले. यावेळी प्रदेश महासचिव शिवाजी मोरे, युवक प्रदेशाध्यक्ष शिवा तेलंग, केंद्रीय कार्याध्यक्ष विजय वाहूळे, प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, प्रदेश संपर्कप्रमुख नितीन शिंदे, युवक प्रदेश सरचिटणीस नवनाथ शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष बाबा रोटे, उद्योजक आघाडी प्रदेशाध्यक्ष डॉ.किरण डोखे, प्रदेश संघटक दिनकर कोतकर, प्रदेश मुख्य संघटक नितीन सातपुते, प्रदेश उपाध्यक्ष पांडुरंग मोरे, प्रसिद्धी संपर्कप्रमुख वैभव दळवी, राज्य सदस्य धनराज लटके, सागर कदम, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष मनोरमा पाटील, प्रगती तिवारी, संगीता सूर्यवंशी, सविता वाघ, अश्विनी नरगुंदे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष संदीप राऊत, मराठवाडा अध्यक्ष रामेश्वर बावणे, उत्तर महाराष्ट्र कामगार आघाडी अध्यक्ष प्रवीण पाटी, उत्तर महाराष्ट्र युवक अध्यक्ष दिनेश जाधव, कामगार आघाडी उपाध्यक्ष योगेश पाटील, युवा संघटक महाराष्ट्र राज्य अमोल शिंदे, शेतकरी आघाडी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष हनुमंत डुबल, पश्चिम महाराष्ट्र युवक उपाध्यक्ष प्रफुल श्रीसागर, आयटी प्रदेश कार्याध्यक्ष रवी सातपुते, उमेश डरपे आदि उपस्थित होते.

**अधिवेशनात ११ ठराव एकमताने मंजूर**

शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी व शेतीमालाला हमीभाव. मराठा समाजाला ओबीसीमध्ये ५०% आरक्षण देण्यात यावे. दुधाला ६० रुपये दर मिळावा तसेच शासनातर्फे दहा रुपये अनुदान जाहीर करावे. पंढरपूरमध्ये शासनाच्या वतीने मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे. महाराष्ट्रातील वारकऱ्यांना साठ वर्षानंतर शासनातर्फे पेन्शन योजना लागू करावी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन. कामगार कायद्यांची अंमलबजावणी. भूमीहीन लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे. मराठी शाळांचा दर्जा सुधारावा. आरोग्य केंद्र व जिल्हा रुग्णालये सक्षम करावीत. शेतकरी-युवक-श्रमिकांसाठी स्वावलंबन योजना राबवाव्यात.





## दत्तकला शाळेचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१५ मे -**

केतुर नं १ (ता. करमाळा) येथील दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकला आयडियल स्कूल अँन्ड ज्यूनिअर कॉलेजचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. सलग ११ वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा कायम आहे.

प्रशालेचे गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे - खाटमोडे राज पांडुरंग ९५.४० टक्के प्रथम, बाबर आर्या अप्पासाहेब ९३.२० टक्के दव्तीय तर देशमुख प्राची प्रशांत ८८.८० टक्के तृतीय आले. वाशिंबे केंद्रात सेमी इंग्रजी माध्यमातून राज पांडुरंग खाटमोडे याने ९५.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. प्रशालेचे ७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, २ विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झाले. सलग ११ वर्षापासून या शाळेचा निकाल १०० टक्के आहे. या यशाबद्दल पालकांतून आनंद व कौतुकाचा वर्षाव होत आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामदास झोळ, प्राचार्य विजय मारकड, प्रशालेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# अक्कलकोट येथे धम्मसेवक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि .१५ मे**

अक्कलकोट येथील राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय व सांस्कृतिक भवन आणि भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान गौतम बुद्ध जयंतीनिमित्त धम्मसेवक आणि धम्मसेविका पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.



कार्यक्रमास मंगल कार्यालयाचे प्रमुख तथा रिझर्व बँकेचे माजी मॅनेजर दिलीप कदम, बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे, शिवसेना बांधकाम कामगार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष स्वामीनाथ हेगडे, डॉ. रवींद्र बनसोडे, अक्कलकोट बस आगार व्यवस्थापक संजय कांबळे, यशसिद्दी आजी माजी सैनिक असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष शिवपुत्र घटकांबळे उपस्थित होते. सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी माजी मुख्याध्यापक राजकुमार बनसोडे, डॉ. रवींद्र बनसोडे, प्रा. आबाराव सुरवसे, दहिटणेचे उपसरपंच विकीबाबा चौधरी, मेजर कमलाकर कांबळे, एसटी बस चालक सोपानराव इंगळे, पत्रकार राजेश जगताप, पत्रकार स्वामीराव गायकवाड आदींचा धम्मसेवक तर मुख्याध्यापिका सिद्धव्वा शिवशरण, शिवसेना बांधकाम कामगार सेना जिल्हा संघटक वैशाली हावनूर यांचा धम्म सेविका या पुरस्काराने शाल, पुष्पगुच्छ, पंचशील उपरणे, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक सिद्धाराम घटकांबळे, रविराज गायकवाड, श्रीशैल शिवशरण, बंटी बनसोडे, दिलीप शिवशरण, सिव्हिल इंजिनिअर शिवशरण भीमाशंकर घटकांबळे, शिवशंकर गुंजले, किनगे, रोमित मडिखांबे, यशवंत इंगळे आदिसह उपासक उपस्थित होते. सूत्रसंचालन सागर सोनकांबळे यांनी केले. आभार स्वामीराव गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमास राजमाता जिजाऊ मंगल कार्यालयाचे प्रमुख दिलीप कदम यांचे सहकार्य लाभले.

# उमरग्यात ‘चंद्राबाई’चा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा



### प्रामाणिक कामासह निरोगी आयुष्याचा केला गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**उमरगा, दि. १२ -**

येथील सय्यदबाशा गल्लीतील कष्टकरी गरीब महिला चंद्राबाई दादाराव सुरवसे यांचा सहस्रचंद्रदर्शन सोहळा जोडलेल्या नात्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला.

माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या धर्मपत्नी तथा उमरगा येथील शिवसेनेच्या नेत्या उषा गायकवाड व युवा नेते किरण गायकवाड यांच्यावतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी चंद्राबाई सुरवसे यांच्या प्रामाणिक कामासह त्यांच्या निरोगी आयुष्याचा गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख करून चंद्राबाई यांनी आरोग्यसंपन्न आयुष्याची शंभरी पार करावी, अशी सदिच्छा व्यक्त केली. कुंभारवाडा येथील आंबा भवानी देवी मंदिराचे पुजारी तुकाराम महाराज कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळ्यास औरादचे पोलीस पाटील रावण जमादार, पत्रकार नंदकुमार येच्चे, शरद येच्चे, सीताबाई कांबळे, सोजर घंटे, शकुंतला जमादार, छाया बिरादार, कल्पना धोत्रे, सरोजा अधटराव, लता सुरवसे, रेखा ढवळे, प्रतिभा जमादार, शीतल घंटे, ईश्वर जमादार, उमाकांत घंटे उपस्थित होते. यावेळी चंद्राबाई यांचा तुलाभार करण्यात आली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचेही वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरुण जमादार, बालाजी सूर्यवंशी, नेताजी सूर्यवंशी, नागेश जमादार, विशाल मोळकरे, अक्षय जमादार, महादेव सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

# अक्षता पडल्या अन् दुसऱ्याच दिवशी नवरीला देवाज्ञा

### बाभुळगावातील घटना; गावावर पसरली शोककळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१५ मे-**

जीवनातील महत्त्वाचा मानला जाणारा लग्न सोहळा पार पडला आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच नववधुला हृदयविकाराच्या धक्क्याने प्राण सोडावा लागल्याची हृदय पिळवून टाकणारी घटना बाभुळगाव (ता. माळशिरस) येथे पराडे-गळगुंडे या परिवारांत घडली. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली तसेच सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात होती.



येथील समीर हरिदास पराडे यांचे १३ में रोजी घोटी (ता. माढा) येथील जानकी बाळासाहेब गळगुंडे यांच्याशी निरा नरसिंहपूर येथील मंगल कार्यालयात मोठया दिमाखात विवाह सोहळा संपन्न झाला. लग्नानंतर नववधू सासरी आली अन दुसऱ्या दिवशी सकाळी अचानक तिच्या छातीत कळा येऊ लागल्याने तिला तात्काळ अकलूज येथील अश्विनी हॉस्पिटल येथे घेऊन जात असतानाच प्रवासा दरम्यान नववधू वर काळाने झडप घातली. सासरच्या सुनेचा व माहेरच्या लेकीचा अचानक झालेल्या मृत्युने दोन्ही कुटुंबाने टाहो फोडला होता. मृत्यू झालेल्या जानकी हिच्यावर बाभुळगाव येथे शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

# चालकास अडवून ५०० पोती सिमेंट लूटले

### पोलीसांना ३४५ पोती सिमेंट सापडले पण चोरांना पकडण्यात अपयश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि.१५ मे-**

चालकास अडवून ५०० पोती सिमेंटसह त्यातील त्याचेकडील रोकड व गाडीतील सामान लंपास केल्याप्रकरणी पाटस येथील ट्रक चालकाने अज्ञात चौघांविरुद्ध अकलूज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी यापैकी ३४५ पोती सिमेंट हस्तगत केले आहे. मात्र अद्याप गुन्हेगारांची नावे निष्पन्न झाली नसून कोणासही अटक केलेली नाही.

पाटस (ता. दौंड जि.पुणे) येथील प्रकाश कोडिंबा बिटके (वय ५० वर्षे) यांनी याप्रकरणी पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, दिनांक ९ मे रोजी रात्री १२.३० चे सुमारास ट्रकमधून अंबुजा कंपनीचे ५०० पोती सिमेंट माळीनगर येथे पोहोच करण्यासाठी घेऊन जात असताना माळीनगर येथील ब्रीजजवळील सर्विस रोडवर अज्ञात चौघांनी अडवून त्यास मारहाण करून सुमारे १ लाख ६० हजार ७०० रुपये किंमतीची अंबुजा सिमेंटची ५०० पोती, तसेच त्याचे कडील रोख रक्कम ४ हजार रुपये व १ हजार रुपये किमतीचा मोबाईल, ४ हजार ७०० रुपये किमतीचे गाडीतील टेप, साऊँन्ड, फॅन असे मिळून १ लाख ६९ हजार ७०० रुपये किमतीचे सामान चोरून नेले. याप्रकरणी अकलूज पोलिसांनी तपास करून लगतच्या सवतगाव परिसरात सापडलेले ३४५ सिमेंट गोणी १ लाख १० हजार ४०० रु.किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास कर सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी करत आहेत. मात्र अद्याप गुन्हेगारांची ओळख पटलेली नाही.

# पंचशतावरी जलसंवर्धन प्रकल्प निसर्गार्पण

### माणगंगा भ्रमणसेवा संस्थेचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१५ मे-**

जलसंवर्धन पंधरवड्यानिमित्त सांगोला येथील माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्थेने मेडशिंगी (ता.सांगोला) येथे एक अभिनव उपक्रम राबवून जनसंवर्धनाचा प्रयत्न केला. हा प्रकल्प दि.१३ मे रोजी पूर्ण झाला असून तो अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत निसर्गार्पण करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे यांनी दिली.



या कार्यक्रमास विजय सांगलीकर, राजेंद्र यादव, समाजसेवक बसवेश्वर झाडबुके, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाचे श्री सदस्य, शिवाजी दिघे, राहुल घोंगडे, तानाजी आळतेकर, शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक बोअरवेल भरल्यानंतर विविध मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक बोअरवेलचे पूजन करून निसर्ग अर्पण करण्यात आले. त्यामध्ये या संपूर्ण प्रकल्पाची शास्त्रोक्त रचना डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडाचे सदस्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक केली. या प्रतिष्ठानने आत्तापर्यंत शेकडो सिंगल बोअरवेलचे प्रकल्प उभे केले आहेत. परंतु एकाच ठिकाणी पाच बोअरवेलचा प्रकल्प हा पहिलाच असून याचे फलित काय होते हे आमच्या प्रतिष्ठानच्या सदस्याना पाहण्याची उत्कंठा असल्याचे प्रतिष्ठानचे मार्गदर्शकानी मत व्यक्त केले. या प्रकल्पासाठी राजाभाऊ वाघमारे, सरपंच प्रतापसिंह इंगवले, डॉ.मच्छिंद्र सोनलकर यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. याकामी वैजिनाथ घोंगडे व त्यांचे सर्व सहकारी तसेच प्रभाकर कांबळे, प्रभाकर कसबे, गुंडोपंत साळुंखे, संजय मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या परिसरात सिमेंट नाल्यापासून खाली सहा विहिरी व बोअर आहेत. उन्हाळ्यात म्हणजेच जानेवारीनंतर या विहिरीवर अतिशय कमी पाणी असते. पुढील वर्षाच्या जानेवारी ते मे पर्यंत विहिरी व बोअरच्या पाणी पातळीत वाढ दिसून आली तर या नवीन जलसंवर्धन प्रकल्पाचा उपयोग झाला असे म्हणता येईल व लोकसहभागातून असे प्रकल्प वाढवता येतील.

**- वैजिनाथ घोंगडे, अध्यक्ष,**
**माणगंगा भ्रमणसेवा संस्था, सांगोला**

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जिल्हा पोलीस प्रमुखांच्या विकसीत गाव मोहीमेची वैराग येथे बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १५ मे-**



जिल्हा पोलीस प्रमुखांच्या विकसित गाव उपक्रमाबाबत वैराग पोलीस स्टेशनमध्ये तालुक्यात गट शेती, डिजिटल शेती शाळा, जलतारा, विषमुक्त भाजीपाला, विविध पिकांसाठी दहा ड्रम थेअरीचा वापर हे उपक्रम कशा पद्धतीने राबवावे याबाबत चर्चा झाली.

सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये सध्या हा उपक्रम राबविण्यात येत आहे. येथे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या उपस्थितीमध्ये बैठक झाली. बार्शी लवकरच प्राथमिक स्वरूपात तीन गावांमध्ये मीटिंग आयोजित केली जाणार असल्याचे कुंदन गावडे यांनी सांगितले. यावेळी माजी पोलीस निरीक्षक नानासाहेब कदम यांनी फोन कॉल द्वारे उपस्थितीत सर्वांशी संवाद साधला. दहा ड्रम थेरीचा वापर स्वतः करून इतरांनाही त्याचे मार्गदर्शन करणारे संतोष पवार, कळंबवाडीचे पोलीस पाटील शंकर भोसले, लोकमंगल साखर कारखान्याचे शेतकी विभागाचे नारायण कापसे, पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक नितीन आतकरे व ओम कुर्डे यावेळी उपस्थित होते.



### महत्वाचे...



## लक्ष्मीबाई प्रतिष्ठानच्या वतीने शिरगापूर येथे गुणवंताचा सत्कार

**अणदूर, दि.१५ मे-**

शिरगापूर (ता.तुळजापूर) येथील लक्ष्मीबाई प्रतिष्ठानच्या वतीने इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला अध्यक्षस्थानी सरपंच डॉ.कल्पना जाधव होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा बालकल्याण समीतीचे सदस्य दयानंद काळुंके, अणदूरचे माजी सरपंच प्रबोध कांबळे, संस्थेच्या संचालिका प्रतिभा पवार, रेखा पाटील, आशा पाटील, नागनाथ पाटील, प्रशांत जाधव, मोहन पवार उपस्थित होती. यावेळी श्री. काळुंके व श्री.कांबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रेवती पवार, स्वराली पवार, प्रणिता पवार, साक्षी पाटील, नियती पाटील या गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संतोष पवार यांनी केले. तर आभार शामराव पाटील यांनी मानले. सुग्रीव जाधव, विनायक जाधव, राम सुर्डे, नवनाथ पाटील, विजय जाधव, महादेव पवार यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी पुढाकार घेतला.

## सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलचा निकाल ९८ टक्के; तनिष्का फल्ले प्रशालेत प्रथम




**बार्शी, दि.१५ मे-**

येथील के.एल.ई.सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलचा दहावी परीक्षेचा निकाल ९८.६४ टक्के लागला. तनिष्का उमेश फल्ले हिने प्रशालेत प्रथम (१०० टक्के) क्रमांक पटकावला. वृंदा अनंत सुपेकर ९८.४० टक्के गुणांसह प्रशालेत द्वितीय तर, जान्हवी शिवाजी पाटील ९८.२० टक्के गुणांसह तृतीय आली. एकूण २२१ विद्यार्थी परीक्षेला बसलेले होते. १०६ विद्यार्थ्यांनी ७५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले. ६९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ६ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले.



## पांढरीत बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना

**पांगरी :** बार्शी तालुक्यातील पांढरी येथे बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून पांढरी येथील धम्म भगिनी नंदाताई शिवाजी जानराव यांनी स्वतःच्या कष्टाच्या पैशातून बुद्ध मूर्ती व भोजनदान दिले. पांढरी येथील भीम नगर मधून बुद्ध मूर्तीची पुष्प वस्ती करत भंते सुमितजी नागसेन यांच्या हस्ते मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यावेळी बुद्ध वंदना प्रवचन धम्मदेशना देऊन कार्यक्रम पार पडला. नंदाताई यांनी स्वतःच्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ बुद्ध मूर्ती व भोजनदान नंदाताई यांच्या वतीने दान देऊन धम्मदान दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लखन जानराव ग्रामपंचायत सदस्य, बाळासाहेब जानराव सानीत संतोष, संतोष बचुटे रोहित जानराव, रोहन जानराव, राकेश जानराव, यांनी प्रयत्न सर्व. डॉक्टर बाबासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन समाजातील जेष्ठ रामभाऊ जानराव, भगवान जानराव यांनी केले सर्व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्मयोगी पब्लिक स्कूलचा निकाल १०० टक्के

**पंढरपूर, दि.१५ मे-**

कर्मयोगी पब्लिक स्कूल, शेळवे येथील सी.बी.एस.ई.च्या दहावी परीक्षेचा निकाल १००% लागला आहे. प्रताप साहेबराव नागटिळक (९६.२ टक्के) हा प्रथम, पियुष सदाशिव गाजरे (९३ टक्के ) द्वितीय तर यशराज दत्तात्रय शिरसट (९१ टक्के) हा तृतीय आला. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त रोहन परिचारक, रजिस्ट्रार गणेश वाळके, प्रशालेचे प्राचार्य सिबानारायण दाश तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन केले.

## सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलचे उज्वल यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१५ मे-**

बार्शी एज्युकेशन सोसायटी संचलित सुलाखे इंग्लिश मेडीयम स्कूल, बार्शीचे मार्च २०२५ परीक्षेत एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत घवघवीत यश १) कु.अक्षरा श्रीश्रीमाळ- ९७%, २) सेजल सावळे- ९३.४०% ३)मधुरा सरवदे- ९३%, ४) रुपेश वाघुले- ९१.२०% ५ ) बुशरा खान- ९०.२०% विद्यार्थ्यांनी स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्याचप्रमाणे विशेष प्राविण्यासह २० विदयार्थी आलेले आहेत. या सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री. .आनंद सुलाखे, सचिव श्री. अनंत कवठाळे, शाळेचे मुख्याध्यापक श्री . तुषार महाजन, मार्गदर्शक श्री. रविकिरण सुर्यवंशी, सौ. माया बेताळे, उमेश चव्हाण, वर्गशिक्षक अमोल कुलकर्णी, विनोद बडवे तसेच, कलाशिक्षक गणेश जोशी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्था व शाळेच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

# जिल्ह्यात आहेत सव्वा लाख लखपती दीदी

### महिलांच्या उन्नतीसाठी उमेदचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे -**



महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी व आर्थिक उन्नती साधण्यासाठी लखपती दीदी योजना सुरू करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखपती दीदी योजनेची घोषणा केली. या योजनेनुसार महिलांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत म्हणून बिनव्याजी एक लाख ते पाच लाख रूपये कर्ज दिले जाते. आर्थिकदृष्टया वंचित महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केली आहे.

या योजनेच्या माध्यमातून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या 'उमेद'ने एका वर्षात एक लाख १९ हजार उद्धीष्ट असताना एक लाख २५ हजार महिलांना लखपती दीदींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांना यशस्वी उद्योजिका बनविले. लखपती दीदी योजनेच्या माध्यमातून महिलांना वेगवेगळया प्रकारचे कौशल्य शिकविण्यात आले. स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी सूचना देण्यात आली. त्यामुळे महिला आत्मनिर्भर बनून व्यवसाय करण्यात तरबेज झाल्या. महिला शेतकरी अथवा शेतकरी कुटुंबातील असली तरी महिलांना मिलेट उत्पादने, मातीची भांडी, शेंगाचटणी, ब्युटी पार्लर, मका चिवडा, शिलाई मशिन, हस्तकला निर्मिती, शोभेच्या वस्तू ,सेंद्रीय निविष्ठा अन तेल निर्मिती केंद्र, मसाले, पापड, लांणचे, चटणी निर्मिती यासह बिगरशेती प्रक्रिया उद्योगासाठी कर्जपुरवठा करण्यात आला. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच त्यांची आर्थिक उलाढाल होण्यामध्ये वाढ झाली आहे.

**तालुकानिहाय लखपती दीदी**

| तालुका | लखपती दीदी |
|---|---|
| अक्कलकोट | १०,२६३ |
| बार्शी | १०,५४६ |
| करमाळा | ८,७६४ |
| माढा | ११,०१९ |
| माळशिरस | १९,८२९ |
| मंगळवेढा | ७,००६ |
| मोहोळ | १५,१५९ |
| पंढरपूर | १४,६०६ |
| सांगोला | १३,९२२ |
| उत्तर सोलापूर | ३,४८८ |
| दक्षिण सोलापूर | १०,४२८ |
| **एकूण** | १,२५,०३० |

### तीन लाख महिलांना लखपती करण्याचा संकल्प

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या 'उमेद' अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांच्या स्वयंरोजगारासाठी लखपती दीदी योजनेतून कर्जपुरवठा करण्यात येतो. एप्रिल महिनाअखेर पर्यंत एक लाख २५ हजार महिलांना लखपती दीदी करण्यात आले आहे. यापुढील काळात प्राधान्यक्रम देऊन तीन लाख महिलांना लखपती दीदी करण्यात येणार आहे.

**- डॉ. सुधिर ठोंबरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर**

### महिलांच्या पंखांना बळ

उमेद अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना रोजगार आणि उपजिविका मिळण्यासाठी प्रयत्न केला. लखपती दीदी योजनेमुळे हजारो महिला स्वतःचा व्यवसाय उभा करून आत्मनिर्भर बनल्या आहेत. उमेद ग्रामीण महिलांच्या पंखांना बळ देण्याचा काम करीत आहे.

**- सचिन चवरे, जिल्हा अभियान व्यवस्थापक, उमेद**

## दक्षिणमधील कृषी सहाय्यकांचे कामबंद आंदोलन

### कृषीमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे -**

महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेकडून तीन मे रोजी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना कृषी सहायकांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने कृषी सहायक संघटनेकडून दक्षिण सोलापूर तालुका कृषी कार्यालय येथे ७ मे पासून धरणे आंदोलन करण्यात येत आहे. तीन मे पासून आंदोलनाचा पहिला टप्पा सुरू झाला आहे. ७ मे पासून १५ मे पर्यंत धरणे आंदोलन पार पडल्यानंतर १५ मे पासून कामबंद आंदोलन सुरू करण्यात आला आहे. या आंदोलनाला तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे व बोरामणीच्या मंडळाधिकारी घोडके यांनी मार्गदर्शन करून पाठिंबा दिला आहे. संघटनेच जिल्हा सचिव उमेश कोळी , तालुकाध्यक्ष दासु राठोड व तालुका सचिव संगम कोरे यांनी आंदोलनाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी अमोल देवकर,सचिन काळे,संदिप पाटील,संतोष सूर्यवंशी, जी. एस. स्वामी, जयश्री गुरव यांचयासह इतर कृषी सहायक उपस्थित होते.



कृषी सहायक समकक्ष असणारे तलाठी व ग्रामसेवक यांच्या पदात बदल करण्यात आला आहे. परंतु कृषी सहायकांच्या पदात बदल न करता त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. शासनाच्या दुर्लक्षामुळे कृषी सहायकांवर आंदोलन करण्याची वेळ आली आहे. ही खेदाची बाब आहे. त्यामुळे १५ मे पासून कामबंद आंदोलन सुरू करण्यात आली आहे.

**-उमेश कोळी, जिल्हा सचिव , कृषी सहायक संघटना सोलापूर**

## 'जाणीव' गोशाळेसाठी १६ हजार ५०० कर्तव्य निधी

### छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त जय शिवराय प्रतिष्ठानचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१५ मे-**



दरवर्षीप्रमाणे छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने यंदाही कृतीतून जयंती साजरी करण्याच्या उद्दिष्टाने जाणीव गोशाळेसाठी १६ हजार ५०० रुपये कर्तव्य निधी दिला. मार्गदर्शक किरण कोकाटे, सचिन ललवाणी, अजय पाटील, गणेश हांडे, किरण राऊत, राजेश राऊत यांच्या उपस्थितीमध्ये जाणीव गोशाळेचे वसंत (मामा) हवलदार, दास मस्के व सर्व सदस्य यांच्याकडे तो सुपूर्द करण्यात आला.

मराठा सेवा संघ तालुकाध्यक्ष संतोष मोळवणे, सचिव रावसाहेब यादव, कार्याध्यक्ष कल्याण घळके, शहराध्यक्ष माधवराव देशमुख, शहर कार्याध्यक्ष राजभाऊ पाटील, वारकरी परिषद घोरपडे गुरुजी, महेश देशमुख यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. गोरक्षणासाठी भाकड गोधन कसायाकडे न जाता गोशाळेत सांभाळण्यासाठी जाणीव गोशाळेने परिश्रम घेऊन सातत्यात उतरवले आहेत. त्यांनी अनेक गोधन वाचवण्याचे व ते सांभाळण्याचे अवघड कार्य अखंडपणे सुरु आहे. या उपक्रमाला पाठबळ देण्याच्या उद्दिष्टाने जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने जाणीव गोशाळेसाठी खारीचा वाटा म्हणून एक कर्तव्य निधी दिला जातो. तो निधी दरवर्षी छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून दिला जातो. यंदाही जय शिवराय प्रतिष्ठानतर्फे जाणीव गोशाळेसाठी १६ हजार ५०० रुपये निधी देण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे सदस्य व जाणीव गोशाळेचे सदस्य उपस्थित होते.

## येळीवच्या एमआयडीसीसाठी उद्योजकांकडून प्रस्ताव मागवले

### आ.रणजितसिंह व खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१५ मे-**

आमदार रणजितसिंह व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नातून माळशिरस तालुक्यातील येळीव येथे नवीन सुरू होणाऱ्या एमआयडीसीमध्ये महाराष्ट्र सरकारने व एम आयडीसी कार्यालय सोलापूर यांनी सर्व नवीन उद्योजकांना औद्योगीक जमिनीसाठी अर्ज करण्यात यावे म्हणून नोटिफिकेशन काढले आहे तालुक्यातील उद्योजकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

आ.रणजितसिंह व खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी येथे एमआयडीसीसाठी वारंवार पाठपुरवा केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी तालुक्यात एमआयडीसी मजूंर केली.

यापुढील टप्पा म्हणजे या नवीन सुरू होणाऱ्या एमआयडीसीमध्ये प्रोप्रायटरशिप कंपनी, पार्टनरशिप कंपनी असो किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांनी औद्योगीक जमिनीसाठी अर्ज करण्यात यावा म्हणून नोटिफिकेशन काढले आहे. उद्योजकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मोहिते-पाटील यांनी केले आहे.

माळशिरस तालुक्यातील येळीव येथे एम आयडीसी स्थापन व्हावी व या माध्यमातून शेकडो युवकांच्या हाताला रोजगार प्राप्त व्हावा या उद्देशाने आमदार व खासदार मोहिते पाटील बंधूंनी वारंवार पाठपुरावा केला होता. त्याला यश प्राप्त झाले असून यशाचा पहिला टप्पा त्यांनी गाठला आहे. त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




## माळशिरस तालुक्यात सोळा टँकरने पाणीपुरवठा

### गट विकास अधिकारी आबासाहेब पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१५ मे-**

तालुक्यातील पश्चिम भागातील गारवाड, मगरवाडी, सुळेवाडी, बचेरी, शिगोर्णी, लोणंद, लोंढे मोहितेवाडी, कोथळे, शिवारवस्ती, निटवेवाडी, पळसमंडळ, भांब, फडतरी, कदमवाडी, जळभावी, पठाणवस्ती या सोळा गावातटँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती माळशिरसचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली. यावेळी पाणीपुरवठा उपअभियंता डी.एन.हुन्नुरे,कारंडे आदी उपस्थित होते.

तालुक्याच्या पश्चिम भागात पाऊस कमी झाल्याने या भागातील नाले, ओढे , वाहिले नाहीत. तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरले नाहीत. जळभावी तलावात काही प्रमाणात पाणी आले आहे. गावठाणाचा पाणी प्रश्न मिटला आहे. तालुक्यातील गारवाड (२४ हजार लिटर)), मगरवाडी (१२ हजार लिटर)),सुळेवाडी (२४ हजार लिटर),बचेरी (२४ हजार लिटर),शिगोर्णी(२४ हजार लिटर) या गावांना यापूर्वी टँकर सुरु झाले आहेत. लोणंद (१० हजार लिटर), लोंढे मोहितेवाडी (१० हजार लिटर), कोथळे (२४ हजार लिटर) या गावांना २६ एप्रिल तर शिवारवस्ती (२४ हजार), निटवेवाडी (२४ हजार लिटर), पळसमंडळ (२४ हजार लिटर), भांब (२४ हजार लिटर.), फडतरी(३० हजार लीटर), कदमवाडी(१० हजार लीटर), जळभावी (२४ हजार लीटर), पठाणवस्ती (२४ हजार लीटर ) या गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.

## आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा शासन दप्तरी धुळखात पडून

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.१५ मे -**

पंढरपूरात येणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरणात श्री विठ्ठलाचे दर्शन घेता यावे. त्याच प्रमाणे एरव्ही किंवा यात्रांच्या काळात गर्दीमुळे येथे एखादी अनुचित घटना घडलीच तर वेगाने मदत पोहचविता यावी या उद्देशाने पंढरपूर तिर्थक्षेत्राचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा यशदाने तयार केला. राज्यातील तीर्थक्षेत्राचा बुहधा हा पहिलाच आराखडा असुन गेल्या काही वर्षापासून लालफितीच्या कारभारामुळे तो शासन दरबारी धुळ खात पडून आहे.

आषाढी, कार्तिकी यात्रांच्या वेळी श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने वारकरी पंढरपूरला येत असतात. सुमारे एक लाख लोकसंख्या असलेल्या पंढरपूर शहरात एकाच वेळी आलेल्या दहा, बारा लाख वारकऱ्यांमुळे येथे सुरक्षेसह स्वच्छतेचा आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. शहरात गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी होवून वाहतूक ठप्प होते. नगरपालिकेने वारंवार कळवून देखील हजारो वारकरी शहरातील धोकादायक इमारतींमधून वास्तव्य करीत असतात. घाणीमुळे शहरातील शेकडो नागरिक आजारी पडतात.

यात्रांच्या काळात शहरात काही वर्षांपूर्वी छोट्या मोठ्या दुर्घटना देखील घडलेल्या आहेत. त्यामुळे भविष्यात अशा घटना घडू नयेत किंवा दुर्देवाने एखादी घटना घडलीच तर गोंधळ न उडता तातडीने मदत पोचावी या विचाराने नगरपालिकेने सुमारे आठ ते दहा वर्षांपूर्वी आपत्तीकालीन व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे काम पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीकडे (यशदा) सोपविले होते. त्या नुसार हा आराखडा तयार करण्यात आला. राज्यातील एखाद्या तीर्थक्षेत्रासाठी बनविण्यात आलेला असा हा पहिलाच आराखडा आहे. यात्रा काळात नदीच्या पाण्याची पातळी वाढली तर शेकडो लोक नदीकाठी वाळवंटातील राहुट्यांमध्येच असतात. प्रशासनाला धावपळ करुन त्यांना तेथून अन्यत्र ठिकाणी हलवावे लागते. यात्रा काळात पुरस्थिती निर्माण झाली तर मग प्रशासनावरील ताण आणखी वाढतो.

चार ते पाच वर्षापूर्वी कार्तिकी यात्रेच्या वेळीधरणात जादा झालेले पाणी नदीत सोडल्याने वाळवंटात वारकऱ्यांनी उभारलेल्या राहुट्यात पाणी शिरुन वारकऱ्यांचे हाल झाले होते. त्या वेळी प्रशासनाला त्वरीत धावपळ करुन वारकऱ्यांना अन्यत्र ठिकाणी हलवावे लागले होते. त्यामुळे असे प्रसंग आले तर कोणत्या विभागाने कोणते काम करायचे अशा सर्व गोष्टी हा अहवाल तयार करताना विचारात घेण्यात आल्या आहेत.

शासनाने या अहवालाची दखल घेऊन आवश्यक त्या साधनांची उपलब्धता करुन देणे गरजेचे होते परंतु अहवाल मिळाल्या नंतर सुध्दा अनेक आषाढी वाऱ्या होवून गेल्या तरी प्रत्यक्षात या आराखड्या संदर्भात अजून काहीही झालेले नसून हा आराखडा शासनाकडेच नुसताच धूळखात पडून आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून विविध विभागाकडील सद्यस्थिती नोंदवून शासनाकडे पाठपुरावा व्हायला हवा होता. पण अजून तरी अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रशासनाकडून साध्या हालचाली देखील झालेल्या नसल्याचे दिसत आहे.

### पंढरीत यापूर्वी घडलेल्या घटनांच्या नोंदी

१) १९८५ मध्ये चंद्रभागा नदीत होडी बुडून १७ वारकऱ्यांचा मृत्यु झाला होता. २) १९९० मध्ये गोपाळपूर पुलावर झालेल्या चेंगराचेंगरी मध्ये नऊ वारकऱ्यांचा मृत्यु झाला होता. ३) यात्रांच्या काळात शहरातील घरांची पडझड होवून भाविक दगावल्याच्या घटना घडलेल्या आहेत. ४) चंद्रभागा नदी मध्ये खड्यांचा अंदाज न आल्यामुळे दरवर्षी अनेक स्थानिक मुले तसेच भाविक दगाविल्याच्या घटना घडलेल्या आहेत. ५) चंद्रभागेच्या वाळवंटात नव्याने बांधण्यात आलेल्या दगडी घाटांची भिंत पावसात कोसळल्याने मध्यंतरी तीन, चार भाविकांना आपले प्राण गमवावे लागलेले आहेत.